इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०४ : महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व त्यात सुधारणा करणेसाठी धिनियम दिनांक १२ मार्च २०२१ मधील तरतूदीमधील कलम ४ (१) अन्वये मुदतवाढ मिळणेबाबत निर्णय घेणे.

वाचले – रचना सहाय्यक, इस्लामपूर नगरपरिषद, नगररचना विभागाकडील उक्तकामीचा प्रस्ताव

प्रस्तावना: महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियम दिनांक १२ मार्च २०२१ मधील तरतूदीमधील कलम ४ (१) अन्वये मुदतवाढ मिळणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- महाराष्ट्र शासन असाधारण दि.12 मार्च 2021 रोजीचे राजपत्र व शासन निर्णय आदेश क्र.गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवी/-30 दि.18/10/2021 अन्वये महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील गुंठेवारी भागातील अनधिकृतपणे पोटविभागणी करुन तयार केलेले भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेबाबत मार्गदर्शक सूचना पारित केलेल्या आहेत त्या अनुषंगीक कार्यप्रणाली (SOP) व कार्यालयीन टिपण्णी यांचे अवलोकन करणेत आले.

इस्लामपूर नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्रमांक 15, दि.04/02/2022 अन्वये, दि.07/04/2022 पासून पुढील 02 महिन्यापर्यंत गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी नगरपरिषदेकडे अर्ज सादर करणेस मुदतवाढ देणेत आली होती. प्रशासकीय ठराव क्रमांक 76, दि.08/04/2022 अन्वये, दि. 08/04/2022 ते दि.07/05/2022 या कालावधीसाठी गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी नगरपरिषदेकडे अर्ज सादर करणेस मुदतवाढ देणेत आली होती. तरी देखील इस्लामपूर शहरातील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेबाबतचे बरेच प्रस्ताव प्रलंबित असलेने व नागरिकांच्या मागणीनुसार प्रशासकीय ठराव क्रमांक 130, दि.08/06/2022 अन्वये, दि.08/06/2022 ते दि.07/07/2022 या कालावधीसाठी गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी नगरपरिषदेकडे अर्ज सादर करणेस मुदतवाढ देणेत आली होती व दि. 08/06/2022 पासून गुंठेवारी अर्ज सादर झालेल्या प्रस्तावामध्ये प्रशमन शुल्कामध्ये 5 % दंडाची रक्कम भरणा करुन घेऊन कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली होती. दि.08/05/2022 ते दि.07/06/2022 या कालावधीत नगरपरिषदेचा गुंठेवारी मुदतवाढ संदर्भातील ठराव आढळून आला नाही. तसेच दि.07/07/2022 नंतर अजून पावेतो मुदतवाढ घेणेबाबतचा ठराव आढळून आलेला नाही.

तथापि, सदर कालावधीमध्ये इस्लामपूर शहरातील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेबाबतचे अर्ज नगररचना विभागाकडे प्राप्त असून, सदर कालावधीत प्राप्त अर्जांवर आवश्यक कार्यवाही मान्यता द्यावयाची असल्यास मुदतवाढ घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियमातील तरतूदीमधील कलम 4 (1) अन्वये अर्ज सादर करणेस दि.08/07/2022 ते दि.31/12/2023 पर्यंत या ठरावाव्दारे मुदतवाढ देणेत येत आहे व दि.31/12/2023 पर्यंत गुंठेवारी अर्ज सादर झालेल्या प्रस्तावामध्ये प्रशमन शुल्कामध्ये 5 % दंडाची रक्कम भरणा करुन घेऊन नियमानुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.08/05/2022 ते दि.07/06/2022 या कालावधीत प्राप्त प्रस्तावावर सुध्दा उचित कार्यवाही करणेकरिता सदर प्रशासकीय ठरावान्वये प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०७ दिनांक : ११/१२/२०२३

रचना सहाय्यक, नगररचना विभागाकडील उक्तकामीच्या प्रस्तावाचे अवलोकन करता, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियम दिनांक १२ मार्च २०२१ मधील तरतूदीमधील कलम ४ (१) नुसार मुदतवाढ देणे योग्य राहिल.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये दिनांक ३१/१२/२०२३ अखेर खालील अटी व शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणेत येत आहे.

1. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 27 मधील कलम 8 (1) अन्वये कुठल्याही मिळकतीत किंवा इमारतीत
   प्रवेश करण्याचे अधिकार नियोजन प्राधिकरणाला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याहीव्यक्तीला असलेने याव्दारे कुठल्याही मिळकतीत किंवा इमारतीत प्रवेश करण्याचे अधिकार किंवा त्यासाठी प्राधिकृत करण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना राहतील.
2. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 27 मधील कलम 20 (ख) अन्वये या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नियोजन प्राधिकरण त्याच्या सर्व अधिकाराचा वापर करतील व त्याचे कर्तव्य पार पाडतील.
3. अनधिकृतपणे पोटविभागणी करुन तयार केलेले भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेबाबत मुळ चटई निर्देशांक हा 0.75 ग्राहय धरणेत यावा.
4. शासन निर्णय आदेश क्र.गुंठेवा-1021/प्र.क्र. 48/2021/नवी/30, दि.18/10/2021 अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार गुंठेवारी विकास नियमित करताना प्रशमन शुल्क व विकास शुल्क आकारणी करणेस या ठरावाव्दारे मान्यता देणेत येत आहे.
5. दि.31/12/2023 पर्यंत प्राप्त प्रस्तावामध्ये प्रशमन शुल्कामध्ये **5%** दंडाची रक्कम भरणा करुन घेऊन कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
6. दि.31/12/2023 पर्यंत गुंठेवारी अंतर्गत नगरपरिषदेकडे प्राप्त अर्जांचा नियमानुसार जलद गतीने निपटारा करणेची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रलंबित प्रस्तावांचा /अर्जांचा निपटारा झालेनंतरच नविन प्रस्ताव दाखल करुन घेणेसंदर्भात जाहीर प्रकटन करण्याची कार्यवाही नगररचना विभागाने करावी.
7. यापूर्वी मंजूर महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) कार्यप्रणाली (SOP) चा अवलंब करुन प्रस्तांवांवर नियमानुसार उचित कार्यवाही करणेस याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.
8. विहित पध्दतीने मंजूर करण्यात आलेल्या दरम्यानच्या कालावधीतील गुंठेवारी प्रकरणांस देखील सदरची मान्यता (कार्योत्तर) लागू राहिल.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 मधील तरतुदींनुसार इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील गुंठेवारी भागातील अनधिकृतपणे पोटविभागणी करुन तयार केलेले भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेबाबतच्या एकूण कार्यवाहीस याव्दारे मंजूरी देणेत येत आहे.

११.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०५ : पाणी पुरवठा विभागातील विविध कामासाठी नियुक्त ठेकेदार श्री.गणेश इलेक्ट्रिकल वर्क्स यांचेमार्फत ठेका पध्दतीने कर्मचारी (अकुशल) घेणेबाबत निर्णय घेणे.

वाचलेः (१) अभियंता पाणीपुरवठा विभाग इनपा यांचा अहवाल

(२) प्रशासकीय ठराव क्र. १८४ दिनांक ०८/०९/२०२२

(३) कार्यादेश जा.क्र./पापू /कार्या.१४/१६१६/२०२३ दिनांक २३/०३/२०२३

(४) मे. गणेश इलेक्ट्रीकल्स यांचा कार्यादेश कार्यादेश जा.क्र./पापू /कार्या.१४/१६१७/२०२३ दिनांक २३/०३/२०२३

प्रस्तावना: पाणीपुरवठा विभागातील कार्माचाऱ्यांची कमतरता, कर्माचाऱ्यांच्या रजा कालावाधिमध्ये इतर कर्मच्याऱ्यांवर पडणारा ताण, या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्माचाऱ्यांची संख्या विचारात घेता ठेकेदार श्री गणेश इलेक्ट्रिकल वर्क्स यांचे मार्फत मंजूर दराने ठेकापद्धतीने कर्मचारी (अकुशल) घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडील विविध कामकाज करणेकामी अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे शासकीय ठराव क्र.१८४, दिनांक ०८/०९/२०२२ अन्वये पाणीपुरवठा विभागाकडील पंप ऑपरेटर,जोडारी व मदतनीस कंत्राटी पद्धतीने सेवा घेणे कामी विविध पद्धतीचा अवलंब करून , करारनामा व त्यानुषंगाने कार्यादेश देणेत आला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

कामाचे नाव	कंत्राट दाराचे नाव	मंजूर दर प्रती कामगार	नियुक्त कर्मचारी संख्या
पंपिंग मशिनरी चालवणे करिता पंप ऑपरेटर नेमणे	सत्यंम स्वयमरोजगारी सहकारी संस्था मर्या मलकापूर	५२०	४
पाणीपुरवठा पंप हाउस मध्ये मदतनीस	गणेश इलेक्ट्रिकल्स वर्क्स, इस्लामपूर	५१०	५

पाणी पुरवठा विभागाकडील तिन्ही पंप हाउस मध्ये पंप चालक व मदतनीस स्वरूपातील कार्माच्याऱ्यांची कमतरता व बदली कार्मच्यारी नसलेने सदर कर्मचारी यांना अनुज्ञेय असणाऱ्या रजा देता येत नाहीत. श्री बाळासो दळवी, माणिक पाटील व संभाजी भानुदास पाटील हे कर्मचारी वारंवार आजरी पडून वैद्याकीय रजेवरती असतात त्यामुळे इतर कर्मचारी यांचे वरती कामाचा ताण पडत आहे.

तसेच इस्लामपूर नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडील कायम कर्मचारी श्री जावळे हे दिनांक 31 जून २०२३, श्री सांडगे जुलै २०२३ व श्री मोहन घोरपडे नोव्हेंबर २०२३ मध्ये नियत सेवामाना नुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच जनता विद्यालय, हत्ती तलाव व बाहे पंप हाउस येथे पाळी मध्ये व जनरल शिफ्ट मध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता भासत आहे. तसेच सध्या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यां मधील जनता विद्यालय पंप हाउस येथे कार्यरत असणारे पंप चालक संभाजी भानुदास पाटील हे ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

पाणी पुरवठा मुकादम श्री तानाजी जाधव यांनी सद्यस्थितीत असलेल्या कर्मच्याऱ्यांना सुट्टी देणे शक्य होत नसलेने तसेच ३ कर्मचारी सेवानिवृत्त झालेने पाणी पुरवठ्याची सेवा सुरळीत चालू ठेवणे कामी ३ कर्मच्याऱ्यांची मागणी केलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्र. १८४ दिनांक ०८/०९/२०२२ अन्वये शहराचा पाणीपुरवठा सुरळीत चालू ठेवणे कामी २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने कुशल कर्मचारी (पंप ऑप्रेटर) 6 व अकुशल कर्मचारी (मदतनीस) -8 अशे एकूण कुशल व अकुशल १४ कर्मचारी घेणे कामी प्रशासकीय ठरावा प्रमाणे मान्यता प्रदान केली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

कामाचे नाव	कंत्राट दाराचे नाव	मंजूर दर प्रती कामगार	नियुक्त कर्मचारी संख्या
पंपिंग मशिनरी चालवणे करिता पंप ऑपरेटर नेमणे	सत्यंम स्वयमरोजगारी सहकारी संस्था मर्या मलकापूर	५२०	४
पाणीपुरवठा पंप हौस मध्ये मदतनीस	गणेश इलेक्ट्रिकल्स वर्क्स, इस्लामपूर	५१०	५

तसेच या कामी अर्थसंकलपिय तरतुत म्हणून 20 लक्ष इतकी तरतूद करणेत आली आहे. त्यामधील आज अखेर १२ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. पुढील ४ महिन्यान करीतच खर्च विहित मर्यादेत करणे शक्य आहे.

पाणीपुरवठा या अत्यावशक सेवेचा विचार करिता, कर्मच्याऱ्यांची सुट्टी सोडविणे कामी व अनुषंगिक कामे करणेकामी मदतनीस म्हणून ३ अकुशल कर्मच्याऱ्यांची सेवा मे. श्री गणेश इलेक्ट्रिकल वर्क्स यांचेकडून घेणेकामी येणाऱ्या मासिक खर्च रक्कम रुपये ४५९००/- आणि ४ महिन्यान करिता (मार्च अखेर) येणाऱ्या खर्च रक्कम रु.१,८३,६००/- ला व सदरच्या कार्यवाहीस इस्लामपूर नगरपरिषद प्रशासक यांची मान्यता घेणेकामी प्रस्ताव प्रशासनास सदर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०२ **दिनांक : ११/१२/२०२३**

पाणी पुरवठा अभियंता यांच्या अहवालाची अवलोकन करता, पाणी पुरवठा विभागातील कर्माच्याऱ्यांची कमतरता,त्यांच्या रजा कालावादिमध्ये इतर कर्मचारी यांच्यावरती पडणारा ताण, या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कार्माच्यार्यंची संख्या विचारात घेता ठेकेदार श्री गणेश इलेक्ट्रिकल वर्क्स यांचे मार्फत ठेकापद्धतीने ३ कर्मचारी (अकुशल)घेणेत यावेत.

वरील प्रमाणे सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून करावयाच्या सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, पाणीपुरवठा विभागातील विविध कामासाठी नियुक्त ठेकेदार श्री गणेश इलेक्ट्रिकल वर्क्स यांचे मार्फत कमीची निकड व पाणीपुरवठा सुरळीत सुरु राहणे कामी ठेकापद्धतीने ३ कर्मचारी (अकुशल) घेणेस व येणाऱ्या मासिक खर्च रक्कम रुपये ४५९००/- आणि ४ महिन्यान करिता (मार्च अखेर) येणाऱ्या खर्च रक्कम रुपये १,८३,६००/- ला व या कामाचा कार्यादेश देणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.पुढील प्रमाणे

Scanned with OKEN Scanner

मंजूर ठेकेदाराचे नाव	मंजूर दर पार्टी दिन / प्रती कामगार	आवश्यक कामगार	मासिक खर्च	४ महिन्यान करिता येणारा खर्च
गणेश इलेक्ट्रिकल्स वर्क्स, इस्लामपूर	५१०	३	४५९००	१,८३,६००

सदर कामाचा खर्च सन २०२३-२०२४ या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पाणीपुरवठा विभागाने सदरच्या कामाचा कलावधी संपण्या पूर्वीच विहीत पद्धतीने ,प्रचलित नियमानुसार नवीन निविदा प्रक्रिया करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

दि. ११.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०६ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत-२ अभियान ऐवजी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अभियानाअंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) च्या मंजूरीसाठी सादर करणेबाबत निर्णय घेणे.

वाचले – १) पाणी पुरवठा अभियंता, इस्लामपूर नगरपरिषद यांचा उक्तकामीचा प्रस्ताव

२) डॉ.सुरेश खाडे (भाऊ), मंत्री तथा पालक मंत्री महोदय, सांगली यांचे दिनांक ०६/१२/२०२३ रोजीचे निर्देश

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत-२ अभियान ऐवजी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अभियानाअंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) च्या मंजूरीसाठी सादर करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजनेचे प्रकल्प अंदाजपत्रके व आराखडे तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांच्याकडे सादर केला होता. त्यावर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांनी नगरपरिषदेचा ठराव सादर करणेबाबत त्यांनी त्यांचे पत्र क्र.तांशा-३/१३०५/२०१९, दिनांक १८/०६/२०१९ ने नगरपरिषदेस कळविलेले आहे. तदनंतर नगरपरिषदेने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ६३१, दिनांक ०३/०२/२०२० ने सुधारीत इस्लामपूर नळ पाणी पुरवठा योजना मंजरूीचा व त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याचा निर्णय घेता होता. तसेच प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी देखील प्रशासकीय ठराव क्रमांक २२०, दिनांक ०१/११/२०२२ अन्वये सुधारीत इस्लामपूर नळ पाणी पुरवठा योजना मंजुरीचा व त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याचा निर्णय घेतला होता. तदनंतर प्रशासक तथा मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेचे पत्र क्र.पापु/कार्या-४/३९४७/२०२०२, दिनांक ०१/११/२०२२ ने विषयांकित प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळण्यास उप विभागीय अधिकारी, म.जी.प्र.उपविभाग, इस्लामपूर यांना विनंती केली होती.

दरम्यानच्या काळात इस्लामपूर नगरपरिषदेने इकडील कार्यादेश पत्र क्र.इनपा/कार्या-४/४५६०/२०२२, दिनांक २०/१२/२०२२ ने केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानाअंतर्गत इस्लामपूर शहराकरिता वाढीव पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी ग्लोबल इन्फ्रा आणि टेक्निकल कन्स्लटंट्स असोसिएट, नागपुर आणि मे.रे.इन्फ्रा स्ट्रक्चर प्रा.लि.गुजरात (JV) यांची तांत्रिक सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती केली होती. संबंधीत PMC ने इस्लामपूर नगरपरिषदेच्या अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेतला व दिनांक ०२/०३/२०२३ रोजी इस्लामपूर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून पुढील कार्यवाहीसाठी प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिशद यांना सादर केला होता.

प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी नगरपरिषदेचे पत्र क्र.पापु/कार्या-४/३९४७/२०२२, दिनांक ०१/११/२०२२ ने इकडील दिनांक ०३/०३/२०२३ च्या पत्रान्वये सुधारीत वाढीव पाणीपुरवठा मंजूर करणे (रू.१२३,८८,९९,०९१/-) या कामाचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., सांगली यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला होता. मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे यांनी प्रशासकीय

Scanned with OKEN Scanner

ठराव क्रमांक २२०, दिनांक ०१/११/२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक १६/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये, नगरपरिषदेच्या प्रस्तावाची तांत्रिक तपासणी करून सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता (रू.१२३,२१,२१,२२६/-) प्रदान केली आहे.

तदनंतर इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारीत वाढीव पाणीपुरवठा योजना मंजुर करणे (रू.१२३,२१,२१,२२६/-) या कामाचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत मान्यतेसाठी मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांचे पत्र क्र.इनपा/मु.का./४२२७, ४२२८, ४२३६/२०२३, दिनांक २३/०८/२०२३ ने अनुक्रमे मा.मुख्य अभियंता, म.जी.प्रा., पुणे मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई व मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि २), मंत्रालय यांना सादर केला होता. परंतू सदर प्रकरणी शासन स्तरावरून अद्यापपर्यंत काहीही कळविण्यात आलेले नाही.

मा.मंत्री तथा पालक मंत्री महोदय, सांगली यांचे दिनांक २३/१०/२०२३ रोजीचे पत्रान्वये इस्लामपूर शहरासाठी नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित वाढीव पाणी पुरवठा योजनेस केंद्र शासन पुरस्कृत अमृत २० योजनेअंतर्गत रू.१२३.८० कोटी रक्कमेस तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. मात्र, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये रू.१२३.०० कोटी रक्कमेस पूर्ण अनुदान प्राप्त होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे सदर योजनेतील आवश्यक बाबींचे दोन टप्पे करून सुधारीत तांत्रिक मान्यता घेवून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेकामी आवश्यक कार्यवाही व्हावी असे नगरपरिषदेस कळविले होते. त्यावर नगरपरिषदेने इकडील पत्र क्र.इनपा/मु.का./५०९०/२०२३, दिनांक ३०/१०/२०२३ ने इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेचा फेर प्रस्ताव दोन टप्प्यात तयार करून तांत्रिक मंजूरीसाठी सादर करण्याबाबत तांत्रिक सल्लागार (PMC) यांना कळविले होते.

अध्यक्ष, भाजपा सांगली जिल्हा (ग्रामीण) यांना त्यांचे पत्र क्र.३४५/२०२३, दिनांक ०५/१२/२०२३ ने इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारीत वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयती नगरोत्थान राज्यस्तर अभियान अंतर्गत प्रशासकीय मंजूरीसाठी शासनास सादर करावा असे आदेश मुख्याधिकारी तथा प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांना द्यावेत अशी मा.मंत्री तथा पालक मंत्री महोदय, सांगली यांना विनंती केली होती. त्यावर मा.मंत्री तथा पालक मंत्री महोदय, सांगली यांनी त्यांचे पत्र क्र.०६/१२/२०२३ ने केलेल्या विनंतीप्रमाणे प्रस्ताव सादर करावा असे मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना निर्देश दिलेले आहेत. मा.मंत्री महोदयांचे निर्देश विचारात घेता, केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाऐवजी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचा ठराव करणे व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यसतर) अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजना प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्तावित करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव प्रशासनाने प्रशासकीय मानयतेसाठी सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०३ **दिनांक : ११/१२/२०२३**

पाणी पुरवठा अभियंता, इस्लामपूर नगरपरिषद यांनी उक्त प्रस्तावनेमधील विवेचनाचे अवलोकन केले असता, मा.मंत्री तथा पालक मंत्री महोदय, सांगली यांनी दिनांक ०६/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेस दिलेल्या निर्देशानुसार केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत या योजनेकरिता निधी उपलब्ध होणेची शक्यता कमी असल्याने सदरची योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत शासनास सुधारीत प्रस्ताव पाठविणेत यावा.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत-२ अभियान ऐवजी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अभियानाअंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) च्या मंजूरीसाठी सादर करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

११.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०७ : इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांबाबत प्राणी जन्म नियंत्रण २००१ नुसार भटकी कुत्री पकडणे, त्यांचे निर्बिजीकरणे करणे व तदअनुषंगीक कामे करणेकामी एजन्सी / संस्था नेमणेबाबत निर्णय घेणे.

वाचले – १) आरोग्य विभाग प्रमुख, इस्लामपूर नगरपरिषद यांचेकडील उक्तकामीचा प्रस्ताव
२) भारतीय जीव जंतू कल्याण बोर्ड, दिल्ली यांचे दिनांक ०५/०४/२०२२ रोजीचे पत्र.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांबाबत प्राणी जन्म नियंत्रण २००१ नुसार भटकी कुत्री पकडणे, त्यांचे निर्बिजीकरणे करणे व तदअनुषंगीक कामे करणेकामी एजन्सी / संस्था नेमणेबाबत निर्णय घेणे

प्रस्ताव- इस्लामपूर शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट फार मोठया प्रमाणात झालेला असून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणेबाबत वारंवार तक्रारी येत आहेत. भटक्या कुत्र्यांकडून लहान मुले व नागरिक यांचेवर हल्ला होण्याच्या घटना घडत असून याकामी वृत्तपत्रामधून देखील बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. तसेच माजी पदाधिकारी, नागरिक यांचे रोषास सामोरे जावे लागत आहे. याकामी इस्लामपूर शहरातील भटकी कुत्री पकडणेकरिता इस्लामपूर नगरपरिषदेकडे कोणतीही निविदा नाही, तसेच सदर कामाकरिता नगरपरिषद स्तरावर कोणत्याही प्रकारचे डॉक्टर उपलब्ध नाहीत. इस्लामपूर शहरातील भटकी कुत्री पकडणे कामाकरिता त्रयस्थ संस्था किंवा एजन्सी ची नियुक्ती करणे अत्यावश्यक झालेले आहे.

श्वान प्रजनन नियम २००१ मधील तरतुदी नुसार तरतुदीचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त असून या नियमाअंतर्गत कुत्र्यांची शस्त्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे. इस्लामपूर शहरामध्ये आरोग्याच्या दृष्टीकोनातून एकुण ७ झोन असून सदर झोनकरिता नियुक्त करणेत आलेल्या मुकादमांकडून कुत्र्यांच्या संख्येबाबत सर्वेक्षण केले असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

झोन .क्र	मुकादमाचे नांव	कुत्र्यांची संख्या
१	श्री. राजाराम परसु कांबळे	२१७
२	श्री. नितिन नंदकुमार कांबळे	२१४
३	श्री. आनंदा प्रकाश कांबळे	३९५
४	श्री मदगोंडा मोहन हाळकी	२८९
५	श्री. संदिप बाबुराव कुचिवाले	२१९
६	श्री रोहित प्रकाश कांबळे	२१०
७	श्री रोहित प्रकाश कांबळे	१३८
	एकुण	१६८२

वरीलप्रमाणे इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या १६८२ असून शासनाने विहित केलेनुसार एका भटक्या कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे, त्याचेवर उपचार करणे व उपचारा दरम्यान कुत्र्यांचा खाण्यावरील खर्च या सर्व कामांकरिता भारतीय जीव जंतू कल्याण बोर्ड, दिल्ली यांचे दिनांक ०५/०४/२०२२ रोजीचे पत्रामध्ये दिलेल्या सूचनेनुसार कुत्रा पकडणे व ॲडमिशन याकरिता रू.२००/- आणि शस्त्रक्रियेपूर्वीची काळजी यामध्ये औषधे, खाणे, शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रिया पश्चात काळजी या सर्व बाबींवरील खर्च रू.१४५०/- असे एकूण रू.१६५०/- प्रति श्वान इतकी रक्कम निश्चित केलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

याकामी सदर कामाकरिता सन २०२३-२०२४ या अर्थसंकल्पामध्ये भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे १५,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. सदरचा निधी आजअखेर अखर्चित असून या निधीमधून ९०० श्वानांवर निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करणे शक्य होणार आहे. अधिकचा खर्च लागलेस पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये पुनःश्च १५,००,०००/- इतकी तरतुद करणे उचित राहिल.

सदरचे काम वर्षाकरिता न ठेवता ते द्विवार्षिक करणे योग्य राहिल. तसेच शस्त्रक्रिया करणे कामी व्यवस्था आणि जाळया अशा भौतिक सुविधा पुरविणे नगरपरिषदेचे कर्तव्य राहणार आहे. सदरचे काम करताना ठेकेदारामार्फत शासनाच्या विहीत केलेल्या धोरणानुसार काम करणे आवश्यक राहणार आहे. तरी नगरपरिषद हद्दीतील भटकी कुत्री पकडून निर्बिजीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे कामास व त्याकामी येणारा अंदाजित खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०४ **दिनांक : ११/१२/२०२३**

आरोग्य विभाग प्रमुख, इस्लामपूर नगरपरिषद यांचेकडील उक्तकामीचा प्रस्ताव व भारतीय जीव जंतू कल्याण बोर्ड, दिल्ली यांचे दिनांक ०५/०४/२०२२ रोजीचे पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांबाबत प्राणी जन्म नियंत्रण २००१ नुसार भटकी कुत्री पकडणे, त्यांचे निर्बिजीकरणे करणे व तदअनुषंगीक कामे करणेकामी एजन्सी / संस्था नेमणेत यावी.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये विषयांकित बाबींसाठी आवश्यक ती कार्यवाही करणेस (ईनिविदा प्रक्रिया राबविणे) व त्याकामी येणारा खर्च अंदाजित र.रू.१५००००००/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

सदरहू कामाच्या निविदा सन 2023-2024 व 2024-2025 या आर्थिक वर्षांकरिता लागू राहतील. आरोग्य विभागाने पुढील आर्थिक वर्षाकरिता लागणारी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात यावी. इस्लामपूर शहरात 900 पेक्षा अधिक श्वानावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच शस्त्रक्रियाकामी लागणारी जागा, त्यामध्ये करावी लागणारी भौतिक सुविधा उपलब्ध करणेची कार्यवाही बांधकाम विभागाच्या सल्ल्याने विहित पध्दतीचा अवलंब करून काम करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च सन 2023-2024 व 2024-2025 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

११.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

(१८)

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०८ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या अग्निशमन वाहन क्रमांक MH-10-P-1104 याची होजरील पाईप खरेदी करणेकामी प्राप्त निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषदेच्या अग्निशमन वाहन क्रमांक MH-10-P-1104 याची होजरील पाईप खरेदी करणेकामी प्राप्त निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषदेच्या अग्निशमन सेवेकरिता सध्या कार्यरत असणारी अग्निशामक वाहन क्रमांक MH-10-P-1104 साठी पाणी फवारणी करणेकामी असणारी होजरील पाईप खरेदी करणेकामी अंदाजित रक्कम रू.६००००/- ला प्रशासकीय ठराव क्रमांक ४८५, दिनांक ३०/१०/२०२३ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. तदअनुषंगाने जाहीर दरपत्रकाद्वारे जाहीर निविदा सूचना स्थानिक वर्तमानपत्र दैनिक पुण्यनगरीमध्ये दिनांक ०४/११/२०२३ रोजी प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये तीन दरपत्रक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरच्या तीनही निविदा सूचनांमधील वित्तीय बोलीच्या लिफाफ्यामध्ये खालीलप्रमाणे दर नमूद आहेत.

अ.क्र.	निविदाधाराचे संस्थेचे नांव	नमूद दर
०१	अर्जुन असोसिएट्स, इचलकरंजी	५८४१०/- (L2)
०२	हिंदुस्थान टीम ॲण्ड मार्केटिंग, सांगली	६३७२०/- (L3)
०३	सुर्या फायर, विटा	५४५१६/- (L1)

वरील नमूद दरांची तुलनात्मकदृष्ट्या छाननी केली असता, सुर्या फायर, विटा यांचे उक्तकामी निविदेमध्ये नमूद केलेले दर सर्वांत कमीचे असून न्यूनतम असल्याने सदरच्या दरास व पुढील कार्यवाहीस प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांची प्रस्तावास मान्यता देणेकामी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०५ **दिनांक : ११/१२/२०२३**

उक्त प्रस्तावनेमध्ये विवेचित केलेप्रमाणे व संबंधित विभागाकडील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन करता, मे.सुर्या फायर, विटा यांचे उक्तकामीचे निविदेमध्ये नमूद केलेले दर हे सर्वांत कमीचे (L1) व न्यूनतम आहेत. त्यामुळे संबंधित निविदाधारकाचे दर मंजूर करण्यात येत आहेत.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी, श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये अग्निशमन वाहन क्रमांक MH-10-P-1104 याची होजरील पाईप खरेदी करणेकामीच्या मे.सुर्या फायर, विटा यांचे दर रक्कम रू.५४५१६/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

Scanned with OKEN Scanner

मे.सुर्या फायर, विटा यांना समजपत्र देणे, बयाणा रक्कम भरून घेणे, करारनामा करणे व कार्यादेश देणे तसेच काम पूर्णत्वानंतर देयके अदा करावयाची कार्यवाही करावी. तसेच उर्वरित निविदाकारांच्या बयाणा रक्कमा परत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

-१९.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०९ : इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या विविध इमारतींना चालविलेल्या फायर एक्स्टींग्यूशर रिफीलींग करणेच्या कामाच्या प्राप्त निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या विविध इमारतींना बसविलेल्या फायर एक्स्टींग्यूशर रिफीलींग करणेच्या कामाच्या प्राप्त निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या विविध इमारतींना बसविलेल्या ८९ फायर एक्स्टींग्यूशर रिफीलींग करणेच्या कामाकरिता प्रशासकीय ठराव क्रमांक ४५७, दिनांक १५/०९/२०२३ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. तदअनुषंगाने जाहीर दरपत्रकाद्वारे जाहीर निविदा सूचना स्थानिक वर्तमानपत्र दैनिक पुण्यनगरीमध्ये दिनांक ०४/११/२०२३ रोजी प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये तीन दरपत्रक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरच्या तीनही निविदा सूचनांमधील वित्तीय बोलीच्या लिफाफ्यामध्ये खालीलप्रमाणे दर नमूद आहेत.

अ.क्र.	निविदाधाराचे संस्थेचे नांव	नमूद दर
०१	अर्जुन असोसिएट्स, इचलकरंजी	९९१५५/- (L3)
०२	हिंदुस्थान टीम ॲण्ड मार्केटिंग, सांगली	१०६९६७/- (L2)
०३	सुर्या फायर, विटा	९४१०५/- (L1)

वरील नमूद दरांची तुलनात्मकदृष्ट्या छाननी केली असता, मे.सुर्या फायर, विटा यांचे उक्तकामी निविदेमध्ये नमूद केलेले दर सर्वांत कमीचे असून न्यूनतम असल्याने सदरच्या दरास व पुढील कार्यवाहीस प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांची प्रस्तावास मान्यता देणेकामी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०६ **दिनांक : ११/१२/२०२३**

उक्त प्रस्तावनेमध्ये विवेचित केलेप्रमाणे व संबंधित विभागाकडील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन करता, मे.सुर्या फायर, विटा यांचे उक्तकामीचे निविदेमध्ये नमूद केलेले दर हे सर्वांत कमीचे (L1) व न्यूनतम आहेत. त्यामुळे संबंधित निविदाधारकाचे दर मंजूर करण्यात येत आहेत.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये नगरपरिषद मालकीच्या विविध इमारतींना चालविलेल्या फायर एक्स्टींग्यूशर रिफीलींग करणेकामीच्या मे.सुर्या फायर, विटा यांचे दर रक्कम रू. ९४१०५/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

Scanned with OKEN Scanner

मे.सुर्या फायर, विटा यांना समजपत्र देणे, बयाणा रक्कम भरून घेणे, करारनामा करणे व कार्यादेश देणे तसेच काम पूर्णत्वानंतर देयके अदा करावयाची कार्यवाही करावी. तसेच उर्वरित निविदाकारांच्या बयाणा रक्कमा परत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१९.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय १० : इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या वाहनांकरिता डिझेल व पेट्रोल खरेदी करणेकामी एजन्सी संस्था नेमणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या वाहनांकरिता डिझेल व पेट्रोल खरेदी करणेकामी एजन्सी संस्था नेमणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापन या अंतर्गत नगरपरिषद कामकाजासाठी वाहने खरेदी करणेत आलेली होती. सदरच्या वाहनाकरीता लागणारे इंधन (डिझेल / पेट्रोल) पुरवठा नगरपरिषदेमार्फत करण्यात येतो.

इस्लामपूर नगरपरिषदेकडील सद्या कार्यरत असणारी वाहने MH-10-P-1104, MH-10-P-175, MH-10-DT-1604 तसेच फॉगींग मशिन, खुले नाट्यगृह, लोकनेते राजारामबापू पाटील नाट्यगृह, नागरी सुविधा केंद्र या विभागामधील जनरेटरची आवश्यकता असल्याने या वाहनाकरीता दर माह अंदाजे रक्कम रु. 80,000/-(ऐंशी हजार रु.) इतके इंधन (डिझेल/पेट्रोल) लागत आहे. मागील तीन वर्षाच्या इंधनावरील खर्चाचा विचार करता दर वर्षा करिता अंदाजित 9,60,000/- (नऊ लाख साठ हजार रु.) इतका खर्च अपेक्षित आहे..

नगरपरिषदेने या पूर्वी थेट पद्धतीने इस्लामपूर हद्दीतील इंडीयन ऑईल पेट्रोलियम यांचेकडून वरील प्रमाणे इंधन थेट पद्धतीने खरेदी केलेले आहे. व त्यांचे मासिक देयक वेळोवेळी अदा केलेले आहे. परंतु याकामी कोणत्याही निविदेचा किवा करार पद्धतीचा अवलंब केला जात नव्हता. मात्र महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औधोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 93 मधील तरतुदीनुसार सदर कामाची आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया करून इंधन (डिझेल/पेट्रोल) पुरवठा एजन्सीची निवड करणे उचित वाटते.

तरी नगरपरिषदेच्या मालकीच्या वापरात असलेल्या वाहनाकरीता इंधन (डिझेल / पेट्रोल) खरेदी करणेस वरील प्रमाणे एजन्सी नियुक्त करून तसेच इंधनासाठीच्या लागणाऱ्या वार्षिक खर्च रक्कम रु.9,60,000/- (नऊ लाख साठ हजार रु.) एवढ्या खर्चास व वरील कामासाठीच्या निविदा प्रक्रिया राबवणे कामीचा प्रस्ताव प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांचे मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०८ **दिनांक :** ११/१२/२०२३

इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या वाहनांकरिता डिझेल व पेट्रोल खरेदी करणेकामी एजन्सी संस्था नेमणेकामी जाहीर निविदा सूचना प्रसिध्दीमध्ये नगरपरिषदेकडून अदा करावयाच्या देयकाबाबत विलंब कालावधीवर आधारीत अट नमूद करण्यात यावी.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक,

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेकडील सद्या कार्यरत असणारी वाहने MH-10-P-1104, MH-10-P-175, MH-10-DT-1604 तसेच फॉगींग मशिन, खुले नाट्यगृह, लोकनेते राजारामबापू पाटील नाट्यगृह, नागरी सुविधा केंद्र या विभागामधील जनरेटरची आवश्यकता असल्याने या वाहनाकरीता डिझेल व पेट्रोल खरेदी करणेकामी एजन्सी नेमणेच्या कामास व त्याकामी येणारा खर्च अंदाजित र.रू.९६००००/- (वार्षिक अदांजित खर्च) ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

सदर कामीचा खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार निविदा प्रक्रिया राबवावी.

..११.१२.२०२३

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०१ : डास प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून धूर फवारणीकामी लागणारी औषधे, डिझेल व तदअनुषंगिक कामे करणेच्या प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना : डास प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून धूर फवारणीकामी लागणारी औषधे, डिझेल व तदअनुषंगिक कामे करणेच्या प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव : इस्लामपूर नगरपरिषदेमध्ये धुरीकरण करणे कामी लागणारी औषधे, डिझेल व तद्अनुषंगिक कामे करणे या कामास प्रशासकीय ठराव क्र. ४९६ दि.२८/११/२०२३ ने आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावामध्ये याकामी लागणा-या धुरीकरण मशीन मे. व्ही.डी.के. फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि, पुणे हे पुरविणार असलेचे नमूद आहे.

नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रभागात डास निर्मुलन मोहिमे अंतर्गत फॉगिंग मशिनद्वारे डास प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून धूर फवारणी कामी लागणारी औषधे, डिझेल व तद्अनुषंगिक कामे करणे या कामाची जाहिर निविदा सुचना दि. ०१/१२/२०23 रोजीच्या दैनिक जनप्रवास या वृत्तपत्रामधून देणेत आलेली होती. सदर जाहिर निविदा सुचनेकरिता 3 निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रभागात डास निर्मुलन मोहिमे अंतर्गत फॉगिंग मशिनद्वारे डास प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून धूर फवारणी कामी लागणारी औषधे, डिझेल व तद्अनुषंगिक कामे करणे कामाची व्याप्ती – डास उत्पत्ती स्थाने शोधून दररोज किमान १ प्रभाग धुरीकरणाची स्वतंत्र व्यवस्था करणे या कामी परिमाण – प्रति नग फॉगिंग मशीन दैनंदिन २ तासाचे कामावर आधारित 1 मशीनचे दर मागविणेत आले असता ते खालीलप्रमाणे प्राप्त झाले आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	दाखल निविदेमधील दर
१	एस.पी.गुप्र ऑफ कंपनी, पुणे	१३५०/-
2	व्ही.डी.के. फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा.लि, पुणे	१४००/-
3	सृष्टी एंटरप्रायजेस, औरंगाबाद	१४५०/-

उपरोक्त तक्त्यानुसार निविदेमध्ये नमुद केलेल्या दरांची तुलनात्मक दृष्टया छाननी केली असता, कंत्राटदार मे. एस.पी.गुप्र ऑफ कंपनी, पुणे यांचे दर सर्वात कमीचे न्युनतम (१३५०/- प्रति २ तास प्रति मशीन) असल्याने सदरचे दर मंजुरीस व याकामी येणा-या खर्चास मा.प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांचे मान्यतेकामी प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०८ दिनांक : १३/१२/2023

उपरोक्त प्रमाणे निविदा समितीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता नगरपरिषद हद्दीतील सर्व प्रभागात डास निर्मुलन मोहिमे अंतर्गत फॉगिंग मशिनद्वारे डास प्रतिबंधात्मक उपाययोजनाम्हणून धूर फवारणी कामी लागणारी औषधे, डिझेल व तद्अनुषंगिक कामे करणे कामी प्राप्त झालेल्या निविदांमधील मे.एस.पी.गुप्र ऑफ कंपनी, पुणे यांचे निविदेमधील नमुद केलेले दर सर्वात कमीचे व न्युनतम असलेने ते मंजुर करणेत यावे.

वरीलप्रमाणे नमुद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दिनांक ३० एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावाद्वारे पुढीलप्रमाणे प्रति मशीन, प्रति दिवस २ तासाकरिता मे. एस.पी.गुप्र ऑफ कंपनी, पुणे यांचे दर (१३५०/-) यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता पुढीलप्रमाणे देणेत येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदाधारक	दर (प्रति मशीन प्रति दिवस २ तासाकरिता सर्व करांसहित)
१.	डास प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून धूर फवारणी कामी लागणारी औषधे, डिझेल व तद्अनुषंगिक कामे करणे.	एस.पी.गुप्र ऑफ कंपनी, पुणे	१३५०/-

मे. एस.पी.गुप्र ऑफ कंपनी, पुणे यांचेबरोबर करारनामा करणेस, कार्यादेश देणेस मान्यता देणेत येत आहे. उर्वरित निविदाधारक यांच्या बयाणा रक्कम परत करणेत याव्यात.

आरोग्य विभागाने कामाच्या सोयीस्तव करणेत आलेल्या झोननिहाय 1 मशीन याप्रमाणे 6 मशीन करिता १३५०x६=८१०० इतका 1 दिवसाकरिता असे महिन्याच्या २६ दिवसाकरिता रू.२,१०,६००/- इतका खर्च येणार असून दोन महिने काम करावयाच्या एकूण खर्च रक्कम रू.४,२१,२००/- इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सदरकामीचा खर्च सन २०२३-२०२४ मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीमधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच आरोग्य विभागाने डास निर्मूलन व प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून धूरीकरण व फवारणी या कामीच्या वार्षिक निविदा मागविणेच्या प्रक्रिया राबविण्यासही मान्यता देणेत येत आहे.

13.12.2023

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०२ : इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील किसाननगर रोड पश्चिम बाजूस रस्ता क्र.६ मधील रमेश शिंदे घर ते योगेश कणसे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची ४ इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणेकामी प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील किसाननगर रोड पश्चिम बाजूस रस्ता क्र.६ मधील रमेश शिंदे घर ते योगेश कणसे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची ४ इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणेकामी प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडील किसान नगर रोड पश्चिम बाजूस रस्ता क्र 6 मधील रमेश शिंदे घर ते योगेश कणसे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची 4 इंची एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणेकामी इकडील जा.क्र./कार्या.14/जानिसू/5359/2023, दिनांक 17/11/2023 दैनिक केसरी,सांगली या वर्तमानपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या प्रमाणे खालील निविदा दिनांक 04/12/2023 रोजी समक्ष उघडली असता खालील प्रमाणे दर असल्याचे निदर्शनास आले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नाव	निविदा दर
1	इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील किसान नगर रोड पश्चिम बाजूस रस्ता क्र 6 मधील रमेश शिंदे घर ते योगेश कणसे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची 4 इंची एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणेकामी	5,00,382/-	(1) सौरभ शंकर जाधव, गाताडवाडी.	अंदाजपत्रकीय दराने
			(2) जुबेर खाजासो इनामदार.कामेरी.	5.00 टक्के जादा दराची
			(3) चंद्रकांत शिवराम पाटील.कवलापूर.	3.00 टक्के जादा दराची

उपरोक्त कामी विहित मुदतीत प्राप्त निविदाची तुलनात्मक दृष्ट्या छाननी केली असलता मे.सौरभ शंकर जाधव, गाताडवाडी यांनी निविदेमध्ये नमूद केलेले दर हे अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची असलेने प्राप्त निविदा मंजूर करणेकामी प्रस्ताव प्रशासनास सदर केला आहे .

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५०९ **दिनांक :** १३/१२/२०२३

उक्त प्रस्तावनेमध्ये विवेचित केलेप्रमाणे व संबंधित विभागाकडील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन करता, मे.सौरभ शंकर जाधव.गाताडवाडी यांचे उक्तकामीचे निविदेमध्ये नमूद केलेले दर हे सर्वात कमीचे (L1) व न्यूनतम आहेत. त्यामुळे संबंधित निविदाधारकाचे दर मंजूर करण्यात येत आहेत.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी, श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील किसाननगर रोड पश्चिम बाजूस रस्ता क्र.६ मधील रमेश शिंदे घर ते योगेश कणसे घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची ४ इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणेकामीच्या मे.सौरभ शंकर जाधव.गाताडवाडी यांचे दर रक्कम रू. 5,00,382/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

मे.सौरभ शंकर जाधव, गाताडवाडी यांना समजपत्र देणे, बयाणा रक्कम भरून घेणे, करारनामा करणे व कार्यादेश देणे तसेच काम पूर्णत्वानंतर देयके अदा करावयाची कार्यवाही करावी. तसेच उर्वरित निविदाकारांच्या बयाणा रक्कमा परत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

दि. 23.12.2023

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि . सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०३ : इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर नगरपरिषद गेट समोरील १० इंची स्लूस व्हॉल्व शिफ्ट करणे व बदलणेकामी प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर नगरपरिषद गेट समोरील १० इंची स्लूस व्हॉल्व शिफ्ट करणे व बदलणेकामी प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव- इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर नगरपरिषद गेट समोरील १० इंची स्लूस व्हॉल्व शिफ्ट करणे व बदलनेकामी इकडील जा.क्र./कार्या.14/जानिसू/5359/2023, दिनांक 17/11/2023 दैनिक केसरी, सांगली या वर्तमानपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या प्रमाणे खालील निविदा दिनांक 04/12/2023 रोजी समक्ष उघडली असता खालील प्रमाणे दर असल्याचे निदर्शनास आले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	ठेकेदाराचे नाव	निविदा दर
1	इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर नगरपरिषद गेट समोरील १० इंची स्लूस व्हॉल्व शिफ्ट करणे व बदलनेकामी	2,18,089/-	(1) सौरभ शंकर जाधव, गाताडवाडी.	अंदाजपत्रकीय दराने
			(2) जुबेर खाजासो इनामदार.कामेरी.	3.00 टक्के जादा दराची
			(3) चंद्रकांत शिवराम पाटील.कवलापूर.	5.00 टक्के जादा दराची

उपरोक्त कामी विहित मुदतीत प्राप्त निविदाची तुलनात्मक दृष्ट्या छाननी केली असलता सौरभ शंकर जाधव, गाताडवाडी यांणी निविदेमध्ये नमूद केलेले दर हे अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची असलेने प्राप्त निविदा मंजूर करणेकामी प्रस्ताव प्रशासनास सदर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५१० **दिनांक :** १३/१२/२०२३

उक्त प्रस्तावनेमध्ये विवेचित केलेप्रमाणे व संबंधित विभागाकडील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन करता, मे.सौरभ शंकर जाधव.गाताडवाडी यांचे उक्तकामीचे निविदेमध्ये नमूद केलेले दर हे सर्वांत कमीचे (L1) व न्यूनतम आहेत. त्यामुळे संबंधित निविदाधारकाचे दर मंजूर करण्यात येत आहेत.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मी, श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर नगरपरिषद गेट समोरील १० इंची स्लूस व्हॉल्व शिफ्ट करणे व बदलनेकामी मे.सौरभ शंकर जाधव.गाताडवाडी यांचे दर रक्कम रू. 2,18,089/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

मे.सौरभ शंकर जाधव, गाताडवाडी यांना समजपत्र देणे, बयाणा रक्कम भरून घेणे, करारनामा करणे व कार्यादेश देणे तसेच काम पूर्णत्वानंतर देयके अदा करावयाची कार्यवाही करावी. तसेच उर्वरित निविदाकारांच्या बयाणा रक्कमा परत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

13.12.2023

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय 01' : स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर करिता घनकचरा 'व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करणे व मान्यतेसाठी सादर करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करणे व मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करणे व मान्यतेसाठी सादर करणेबाबत ----

आरोग्य विभागाकडील दिनांक १२/०१/२०२४ रोजीच्या मंजूर टिपणीनुसार. स्वच्छ भारत अभियानात सातत्य राखण्याच्या दृष्टीने व संपूर्ण नागरी भारत कचरा मुक्त करण्याच्या दृष्टीने सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांकरिताच्या गुंतवणूकीमध्ये सातत्य राखणे, वापरलेले पाणी व मैला आणी प्रक्रिया, विल्हेवाट, व पुनर्वापर करणे, सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणे व जुना साठलेला कचरा, प्लास्टिक कचरा, बांधकाम व पाडकाम कचरा इत्यादींची विल्हेवाट लावणे व व्यवस्थापन करणे व याकरिता आर्थिक बदल करणे इत्यादी गरजा विचारात घेऊन केंद्र शासनाच्या गृहनिर्माण तथा नागरी कार्य मंत्रालयाद्वारे "स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0" चा प्रारंभ करण्यात आला आहे. सदर अभियान दिनांक 2 ऑक्टोबर, 2021 ते दिनांक 1 ऑक्टोबर 2026 पर्यंत राबविले जाणार आहे. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी स्वच्छ भारत अभियान 2.0 अभियानांतर्गत सर्व मंजूर प्रकल्पासाठी घनकचरा आणि मलनिस्सारण सबंधित सर्व प्रकल्प विहित कालमर्यादेत व योग्य प्रकारे पूर्ण करणे गरजेचे आहे यासाठी या प्रकल्पांची कामे वेगाने व सक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता दिनांक १४/०२/२०२३ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

१) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या अभियानांतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यासाठी संस्थांची विभागनिहाय नामिकासूची (Empanelment) तयार करण्यात आली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर नामिकासूचीतील संस्थांकडून घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणे बाबत सूचना प्राप्त आहेत. नामिकासूची मधील पुणे विभागातील तीन संस्था यांना आरोग्य विभागाने इमेलद्वारे संपर्क केला असता मे.समर्थ इंजिनिअर्स पुणे यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करणेसाठी फक्त समर्थ इंजिनिअर्स पुणे यांच्याकडून स्वारस्य दाखविण्यात आले आहे. स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणे समर्थ इंजिनिअर्स पुणे याना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणे योग्य असल्याचे मत आरोग्य विभागाने दिनांक १२/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन मंजूर टिपणीद्वारे नमूद केले आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारसांठीचे शुल्क शासन निर्णय दिनांक १४/०२/२०२३ अन्वये प्रकल्प किंमत रक्कम रु.5 कोटीच्या आत असेल तर प्रकल्प किंमतीच्या 2.45% इतकी फी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना अदा करावी लागणार आहे. इस्लामपूर नगरपरिषदेसाठीच्या

Scanned with OKEN Scanner

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अंदाजे रक्कम रु.3.४२ क्रोटी इतक्या किंमतीचा होण्याची शव्यता असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्रकल्प किंमतीच्या 2.45% इतके शुल्क अदा करणे आवश्यक आहे. सविस्तर प्रकल्प अह्वाल सादर केलेनंतर 0.98%, सर्व मान्यता मंजुरी घेउन निविदा प्रक्रिया राबविले नंतर 0.25%, प्रकल्प अंमलबजावणी वेळी व्यवस्थापन केलेनंतर 1.23% असे 3 टप्प्यात सदर शुल्क अदा करणेचे आहे. सदर शुल्क नगरपरिषद निधी अथवा इतर उपलब्ध शासन निधीमधून अदा करणे आवश्यक राहील.

इस्लामपूर नगरपरिषद प्रकल्पास शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घेणे गरजेचे आहे. सदर तांत्रिक मान्यता घेणेसाठीची मंजुरी शुल्काची रक्कम प्रकल्प किंमतीमध्ये समावेश करणेत येणार आहे. संबंधित प्रकल्प व्यवस्थापक यांच्याशी करार करताना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काच्या 3% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम नगरपरिषदेकडे संस्थेने जमा करावयाची आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या कामाची व्याप्ती खालील प्रमाणे असेल.

- पुनर्सर्वेक्षणाची कामे व विविध शक्यतादर्शक अहवाल तयार करणे.
- सविस्तर सर्वेक्षण करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे व विविध विभागांकडून आवश्यक मान्यता प्राप्त करणे इत्यादी.
- निविदा कागदपत्रे तयार करणे, विविध आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त करणे व निविदा प्रक्रिया व चालू कामावर देखरेख करणे व त्या कामांच्या दररोज अभिलेख/नोंदी ठेवणे.
- देखभाल-दुरुस्तीच्या कामावर देखरेख करणे व त्यांच्या दररोज अभिलेख/नोंदी ठेवणे

वरील सर्व कामे विहित वेळेत पूर्ण होणेकारिता तसेच प्रकल्पांची सक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी करार करून घेऊन तसेच अंदाजित प्रकल्प किमतीच्या 3% अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव जमा करून घेऊन समर्थ इंजिनिअर्स पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करणेस हरकत नाही असे मत आरोग्यउ विभागाने नोंदविले आहे.

२) मे.समर्थ इंजिनिअर्स पुणे यांचेकडून स्थळ पाहणी करून डीपीआरचा तपशील दिनांक २२/०८/२०२३ तसेच दिनांक १२/१२/२०२३ रोजी सादर केला होता. दिनांक २१/१२/२०२३ रोजी मे.समर्थ इंजिनिअर्स पुणे यांच्या प्रतिनिधी समवेत प्रत्यक्ष झालेल्या चर्चेनुसार नगरपरिषदेकडे उपलब्ध सर्व संसाधनाचा विचार करून व सन २०२६ पर्यंतची लोकसंख्या विचारात धरून सुधारित प्रकल्प अहवाल समर्थ इंजिनिअर्स पुणे यांनी दिनांक १२/०१/२०२४ रोजी सादर केला आहे.

दिनांक १२/०१/२०२४ रोजीच्या आरोग्य विभागाकडील मंजूर टिपणीनुसार मे.समर्थ इंजिनिअर्स, पुणे प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूकीस, त्यांना अदा करावयाच्या प्रकल्प व्यवस्थापन फी (शुल्क), व अनुषंगिक कामे करणेकामी कार्योत्तर मान्यता आणि त्यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५११ दिनांक : १५/०१/२०२४

वरीलप्रमाणे प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे व संबंधित विभागाकडील कार्यालयीन टिपणीचे विवेचन करता नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून नगरपरिषद स्तरावरून कार्यवाही प्रस्तावित करावी.

वरीलप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मी श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये मे.समर्थ कार्पोरेशन, इस्लामपूर यांना स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करणे व तांत्रिक मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे व त्याकामी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांना अदा करावयाच्या शुल्क (फी) बाबत नगरपरिषद निधी अथवा इतर उपलब्ध शासन निधीमधून प्रकल्प किंमतीच्या २.४५ टक्केने अदा करणेस कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

तसेच मे.समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प जागा, उपलब्ध साधनसामुग्री / यंत्रसामुग्री, भविष्यातील यंत्रसामुग्रीची गरज व भविष्यातील लोकसंख्या वाढ विचारात घेऊन,स्वच्छ भारत अभियान नागरी २.० अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषदेस दिनांक १२/०१/२०२४ रोजी सादर केलेला घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवालास मान्यता देणेत येत आहे. सदर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर करणेस व तदनंतर प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर प्रस्तावाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार नगरपरिषदेच्या स्वःहिस्सा भरणे बंधनकारक असल्याने सदर स्वःहिस्सा नगरपरिषद फंडातून किंवा अन्य निधीतून भरण्यास देखील मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार आरोग्य विभागाने स्वःहिस्सा भरण्याचा व सदर रक्कम राखीव (मुदत ठेव स्वरूपात) ठेवण्याचा प्रस्ताव लेखा विभागास सादर करण्याची कार्यवाही करावी.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१५.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, जि.सांगली
प्रशासकीय स्थायी समिती सभा ठराव

विषय – मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी शिफारस केलेले सन २०२३-२०२४ सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (२) (अ) मधील तरतूदीनुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारामध्ये मंजूर करून मान्यता देणेबाबत.

प्रस्तावना -- मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी शिफारस केलेले सन २०२३-२०२४ सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (२) (अ) मधील तरतूदीनुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारामध्ये मंजूर करून मान्यता देणे आवश्यक आहे.

प्रस्ताव – इस्लामपूर नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असल्याने नगरपरिषदेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष / सदस्य / परिषद सदस्य व मुख्याधिकारी, सर्वसाधारण सभा, स्थायी सभा, विषय समिती सभा अस्तित्वात नसलेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चा सुधारणा २०२१ मध्ये कलम ३१७ नुसार नगरपरिषदेकामी सर्व अधिकारांचा बापर करणेसाठी आणि तिची सर्व कार्यकर्तव्ये पार पाडणेसाठी राज्य निवडणूक आयोगाद्वारे विनंती करण्यात येईल अशा कालावधीसाठी शासकीय अधिका-याची किंवा अधिकारांची नियुक्ती करता येईल, असे नमूद आहे.

तदअनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ रोजी प्रशासक म्हणून मला मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना अधिकार देणेत आलेले आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०२ (२) (अ) नुसार स्थायी समितीचे अधिकारातील निर्णय घेण्याचे अधिकार मा.प्रशासक यांच्याकडे निहित केलेले असल्याने लेखापाल व लेखापरीक्षक सेवा, इस्लामपूर नगरपरिषद यांनी मान्यतेकामी इस्लामपूर नगरपरिषदेच्या सन २०२३-२०२४ चा सुधारीत व सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पाबाबत प्रशासकीय ठरावान्वये शिफारस करणे आवश्यक असल्याचा प्रसताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक –५९२ **दिनांक** १५/०१/२०२४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (२) (अ) मधील तरतूदीनुसार इस्लामपूर नगरपरिषदेच्या सन २०२३-२०२४ चा सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अर्थसंकल्प नगरपरिषदेकडील लेखाविभागाकडून प्राप्त झाला आहे. यावर सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीमध्ये वाचन करून प्रस्तावामध्ये विवेचित केलेप्रमाणे अर्थसंकल्प आवश्यक असणा-या दुरूस्त्यांसह मंजूर करण्यात येत आहे.

नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असल्याने नजीकच्या कालावधीमध्ये कोणत्याच नगरपरिषद सभेचे (स्थायी / सर्वसाधारण / विशेष) आयोजन करण्यात येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

०२

त्यामुळे वरीलप्रमाणे करावयाच्यां सर्व आवश्यक त्या कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहूल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या सन २०२३-२०२४ चा सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अर्थसंकल्पास उक्त अधिनियमाचे कलम १०१ (२) (अ) नुसार मान्यता प्रदान करणेत येत आहे.

त्यापुढील कार्यवाही लेखाविभागाने उक्त अधिनियमातील कलम १०१ (४) नुसार प्रस्तावित करणेसही मान्यता देणेत येत आहे.

१५.९.२०२४

(राहूल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०१ : इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील मंत्री कॉलनी ते झेंडा चौक ते शुभम अपार्टमेंटपर्यंत पिण्याच्या पाण्याची ४ इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील मंत्री कॉलनी ते झेंडा चौक ते शुभम अपार्टमेंटपर्यंत पिण्याच्या पाण्याची ४ इंची एच.डी.पी.ई.पाईप लाईन टाकणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील मंत्री कॉलनी ते झेंडा चौक ते शुभम अपार्टमेंट पर्यंत सध्या अस्तित्वात असणारी पाईप लाईन ए.सी.पाईप असून सदर पाईप लाईन गटारी शेजारून जात आहे. सदर ठिकाणी गटारीचे काम सुरु असलेने गटारीचे पाणी पाणीपुरवठा करणाऱ्या लाईन ठिकाणी साठत आहे. तरी सदर पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन लिकेज झालेस गटारीचे अशुद्ध पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये मिसळून आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मंत्री कॉलनी परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ध्यानी घेवून व चालू असणारे गटारीचे काम लक्षात घेता सध्या अस्थित्वात असणारी ए.सी. पाईप लाईन शिफ्ट करून त्या ठिकाणी नवीन ४ इंची एच.डी.पी.ई पाईप लाईन टाकलेस सदर भागात सुरळीत पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे. सदर ठिकाणी सध्या असणारी ए.सी.पाईप शिफ्ट करून नवीन ४ इंची एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणेस तेथील नागरिकांकडून मागणी होत आहे. तरी सदर ठिकाणी नवीन ४ इंची एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकून पाण्याची व्यवस्था करणेकरिता निधी आवश्यक आहे. याकामी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आलेली आहे. सदर कामाकरिता इस्लामपूर नगरपरिषदेचे प्रशासक यांचे आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्ताव प्रशासनास सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५१३ **दिनांक : १९/०१/२०२४**

उक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेने मंत्री कॉलनी ते झेंडा चौक ते शुभम अपार्टमेंट पर्यंत असणारी ए.सी. पाईप लाईन शिफ्ट करून त्या ठिकाणी नवीन ४ इंची एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणेची कार्यवाही करावी.

वरील प्रमणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे .

याकामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाराची तांत्रिक मान्यता घेवून, निविदा प्रक्रिया प्रचलित नियमानुसार करावी. सदर कामीचा खर्च सन २०२३-२०२४ या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

१९.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०२ : इस्लामपूर नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडील पाण्याच्या टाक्या व जलशुध्दीकरण केंद्रावरील निवळण टाकी इत्यादींची स्वच्छता करणेकामी प्राप्त झालेल्या निविदेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडील पाण्याच्या टाक्या व जलशुध्दीकरण केंद्रावरील निवळण टाकी इत्यादींची स्वच्छता करणेकामी प्राप्त झालेल्या निविदेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडील पाण्याच्या टाक्या व जलशुद्धीकरण केंद्रांवरील निवळण टाकी इत्यादींची स्वछता करणेकामी इकडील जा.क्र./पापू/जानिसू/5159/2023, दिनांक 02/11/2023 दैनिक प्रतिध्वनी, सांगली या वर्तमानपत्रातून जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे खालील निविदा दिनांक 05/01/2024 रोजी समक्ष उघडली असता खालीलप्रमाणे दर असल्याचे निदर्शनास आले आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	ठेकेदाराचे नाव	निविदा दर
1	इस्लामपूर नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडील पाण्याच्या टाक्या व जलशुद्धीकरण केंद्रावरील निवळण टाकी इत्यादींची स्वछता करणे.	(1) आकाश अर्जुन जाधव, पलूस	०.५० पैसे / लिटर
		(2) आदिनाथ रविंद्र बोगर, पलूस	०.६० पैसे / लिटर
		(3) अभिनव अजित पाटील, कृषिनगर, पलूस	०.३० पैसे / लिटर

उपरोक्त कामी विहित मुदतीत प्राप्त निविदाची तुलनात्मक दृष्ट्या छाननी केली असलता **मे.अभिनव अजित पाटील. कृषिनगर, पलूस** यांनी निविदेमध्ये नमूद केलेले दर हे **०.३० पैसे / लिटर** दराने सर्वात कमी दराची असलेने प्राप्त निविदा मंजूर करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सदर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५१४ **दिनांक : १९/०१/२०२४**

उक्त प्रस्तावनेमध्ये विवेचित केलेप्रमाणे व संबंधित विभगाकडील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन करता, मे.अभिनव अजित पाटील, कृषिनगर, पलूस यांचे उक्तकामीचे निविदेमध्ये नमूद केलेले दर हे सर्वात कमीचे (L1) व न्यूनतम असलेने संबंधित निविदाधारकाचे दर मंजूर करणेस येत आहेत.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) व 317 अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, यांनी **मे.अभिनव अजित पाटील, कृषिनगर, पलूस** यांची निविदा ही **०.३० पैसे / लिटर** दराने सर्वात कमी दराची असलेने निविदा मंजूर करणेस प्रशासकीय निविदा समितीने मान्याता दिलेनुसार त्यास या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

Scanned with OKEN Scanner

(२) मे.अभिनव अजित पाटील, कृषिनगर, पलूस यांना समजपत्र देणे, बयाणा रक्कम भरून घेणे, करारनामा करणे व कार्यादेश देणे तसेच काम पुर्णत्वानंतर देयके अदा करावयाची कार्यवाही करावी. तसेच, उर्वरित नामंजूर निविदाधारकांची बयाणा रक्कम परत करणेस मान्यता देणेत येत आहे. (३) सदर कामाचा खर्च सन २०२३-२०२४ या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदरची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१९.९.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०३ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन घटकांमधील जुन्या साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी (२०२३_DMA_९५३६००_IRFP) प्राप्त ई-निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन घटकांमधील जुन्या साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी (२०२३_DMA_९५३६००_IRFP) प्राप्त ई-निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन घटकांमधील जुन्या साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना दै.महाराष्ट्र टाईम्स, पुढारीमध्ये दि.१४/१०/२०२३ नुसार करणेत आलेली होती. त्यानुसार सदर कामास ५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर ई-निविदांचा तांत्रिक लिफाफा छाननी केलेनंतर मे.साईप्रो इन्फ्रास्ट्रक्चर यांचे अपूर्ण कागदपत्रांमुळे अपात्र करणेत आलेले आहे. त्यामधील उर्वरित ३ निविदाधारकांना बायोमायनिंग निविदेच्या अनुषंगाने अपूर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेकामी दि. १२/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निविदाधारकांना कळविणेत आलेले होते. सदर निविदाधारकांमधून मे. आदर्श फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी नगरपरिषदेने नेमून दिलेल्या मुदतीत कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. एस आर ग्रीनवे एम्पायर, नाशिक, व एस आर टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मुदतीत कागदपत्रे नगरपरिषदेमध्ये सादर केलेले असलेने एकुण ३ निविदाधारक पात्र होत असलेने दि.१२/०१/२०२४ रोजी वित्तिय बोलीचा लिफाफा उघडलेस निविदा समितीने मान्यता दिलेली आहे.

सदर निविदेचा लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) मधील कागदपत्रांची छाननी केली असता निविदेमधील अटी व शर्तीनुसार 3 निविदांच्या कागदपत्रांची पुर्तता होत असलेचे निदर्शनास येत असलेने प्राप्त 3 ई-निविदा पात्र असलेने निविदांचा लिफाफा क्र.२ (वित्तिय लिफाफा) उघडणेत आला त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे /संस्थेचे नांव	दर सर्व करांसहित
1.	इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन घटकांमधील जुन्या साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी 2023_DMA_953600_1 RFP	१,१०,००,०००/-	एस आर ग्रीनवे एम्पायर, नाशिक	+२.३३०
2.			पॉवर डिझेल इंजिन सर्व्हिसेस, अहमदनगर	+०.९५०
3.			एस आर टेक्नॉलॉजी, पुणे	-९.९९९

उपरोक्त प्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता, उपरोक्त कामाकरिता निविदाधारकांनी निविदेमध्ये नमुद केलेले दराचे तुलनात्मक दृष्टया छाननी केली असता, मे.एस आर टेक्नॉलॉजी, पुणे यांचे दर (अंदाजित रक्कमेपेक्षा) -९.९९९ कमीचे (र.रु. १०,९९,८९०/-) असून ते न्युनतम आहेत. सबब, मे.एस आर टेक्नॉलॉजी, पुणे यांनी इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन घटकांमधील जुन्या साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी (2023_DMA_953600_1 RFP) नमुद दरास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी व त्यांचेबरोबर निविदा स्विकृती, उर्वरित बयाणा रक्कम भरुन घेणेस, करारनामा व कार्यादेश देणेस मान्यतेकामी प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५१५ दिनांक : १९/०१/२०२४

वरीलप्रमाणे प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे व संबंधित विभगाकडील कार्यालयीन टिपणीचे विवेचन करता नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून नगरपरिषद स्तरावरून कार्यवाही प्रस्तावित करावी.

वरीलप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन घटकांमधील जुन्या साठलेल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी (२०२३_DMA_९५३६००_IRFP) प्राप्त निविदांपैकी न्यूनतम दराची निविदा मे.एस आर टेक्नॉलॉजी, पुणे यांचे दर (अंदाजित रक्कमेपेक्षा) -९.९९९ कमीचे (र.रु. १०,९९,८९०/-) यांची असल्याने त्यांनी नमूद केलेल्या दरास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत आहे.

तसेच निविदा स्विकृती, उर्वरित बयाणा रक्कम भरुन घेणेस, करारनामा व कार्यादेश देणेस मान्यता देणेत येत आहे. उर्वरित बयाणाकारांच्या रक्कमा परत करणेसही मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१९.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०४ : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील चंदननगर येथील बगीचा विकसीत करणे.

प्रस्तावना: महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील चंदननगर येथील बगीचा विकसीत करणे.

प्रस्ताव:- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-12/निविदा सुचना/4420/2023 दिनांक 11/09/2023 अन्वये दि 29/092023 रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक सकाळ या वृत्तपत्रातून दि.12/09/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर कामासाठी एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या असून प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम 93 चे पोट कलम (2) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
1	इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील चंदननगर येथिल बगीचा विकसित करणे.	48,62,929.00	1) शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा.सर्जेराव जाधव	-19.444% कमी दराने
			2) सचिनकुमार रघुनाथ पाटील, रा.येलूर	-13.555% कमी दराने
			3) ओंकार मोहन पाटील रा. तांदुळवाळी	- 10.000% कमी दराने
अभिप्राय:– विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये **शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव यांची -19.444%** कमी दराची निविदा सर्वात कमी दराची आहे.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 15% पेक्षा कमी दराचा असलेने सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2, दि.27/09/2018 मधील मुद्दा क्र. 4.6.3 मध्ये नमूद केलेप्रमाणे निविदाधीन किंमतीच्या 16% एवढया किंमतीची निविदाधारकाकडून बॅकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढया रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/राष्ट्रीयकृत/शेड्युल बॅकेची ठेव पावती घेवून योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणे प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५७६ दिनांक : १९/०१/२०२४

नगरपरिषद हद्दीतील चंदननगर येथिल बगीचा विकसित करणे या कामासाठी प्राप्त एकूण 03 निविदापैकी शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव यांची -19.444% कमी दराची निविदा सर्वात कमी दराची असलेने मंजूर करणेत येत आहे. सदर कामाच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 15% पेक्षा कमी दराचा असलेने सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/2017/प्र.क्र.08 /इमा-2, दि.27/09/2018 मधील मुद्दा क्र.4.6.3 मध्ये नमूद केलेप्रमाणे निविदाधीन किंमतीच्या 16% एवढया किंमतीची निविदाधारकाकडून बॅकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढया रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/राष्ट्रीयकृत /शेड्युल बॅकेची ठेव पावती घेवून योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम नियमानुसार कागदपत्रांची पडताळणी करुन नगर अभियंता, बांधकाम विभाग यांचे स्तारावरून केल्यानंतरच परत करणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मधील कलम 316 (ब) व 317 अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14, दि.27 डिसेंबर 2021 अन्वये मी, राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामी खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पिय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१९.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०५ : इस्लामपूर नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.४६९, विषय क्र.०३, दिनांक ३०/१०/२०२३ मधील प्रस्तावनेमध्ये नजरचुकीने अन्य विषयाचा उल्लेख व त्याप्रमाणे संगणकीकृत टंकलेखन संदोष झाल्याने त्यामध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ८१ नुसार सुधारणा करून दुरूस्तीचा प्रस्ताव मंजूर करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: इस्लामपूर नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.४६९, विषय क्र.०३, दिनांक ३०/१०/२०२३ मधील प्रस्तावनेमध्ये नजरचुकीने अन्य विषयाचा उल्लेख व त्याप्रमाणे संगणकीकृत टंकलेखन सदोष झाल्याने त्यामध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ८१ नुसार सुधारणा करून दुरूस्तीचा प्रस्ताव मंजूर करणेबाबत निर्णय घेणे,

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्रमांक ४६९, विषय क्रमांक ०३, दिनांक ३०/१०/२०२३ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील सिव्हील अपील डायरी नं.(S) २५२२/२०२३ मध्ये इस्लामपूर नगरपरिषदेस दिलेल्या निर्देशानुसार सांडपाण्यावर तात्पुरत्या उपाययोजना करणेबाबत निर्णय घेणे धोरण ठरविण्यात आलेले आहे. सदरचे धोरण ठरविण्यात येत असताना प्रस्तावनामध्ये पुढीलप्रमाणे संगणक मुद्रण दोषामुळे नोंद झालेली आहे. सदरच्या नोंदीचा आणि त्या प्रशासकीय ठरावाचा अर्थाअर्थी संबंध नाही. दोन्हीही परस्पर भिन्न विषय आहेत. त्याखाली (प्रस्ताव, प्रशासकीय ठराव) उल्लेखीत केलेल्या सर्व बाबी अचूक आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतूदीनुसार लेखनप्रमादामुळे झालेली चूक दुरूस्त करणेबाबत नमूद आहे. तदअनुषंगाने प्रशासकीय ठराव क्र.४६९, दिनांक ३०/१०/२०२३ मधील प्रस्तावनामध्ये संगणक मुद्रण दोषामुळे चुकीची पुढीलप्रमाणे दुरूस्त करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक व दिनांक	प्र.ठ.४६९, दिनांक ३०/१०/२०२३
मुद्रण दोष (लेखन प्रमाद)	प्रस्तावना -- इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये आकाशचिन्हे, होर्डिंग व जाहिरात प्रसिध्द करण्याचे नियमन आणि नियंत्रण मार्गदर्शक तत्वे २०२३ लागू करणे व जागावापर फी आणि जाहिरात शुल्क दर निश्चित करणे तसेच इस्लामपूर नगरपरिषद ठराव क्र.१८२, दि.०९/०२/२०१८ यामध्ये नवीन मार्गदर्शक तत्वे २०२३ नुसार बदल करणे, काही तरतुदी रद्द करणे आवश्यक आहे.
करावयाची दुरूस्ती	प्रस्तावना -- मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील सिव्हील अपील डायरी नं.(S) २५२२/२०२३ मध्ये इस्लामपूर नगरपरिषदेस दिलेल्या निर्देशानुसार सांडपाण्यावर तात्पुरत्या उपाययोजना करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्याकामी प्रस्तावनेतील लेखनप्रमाद दुरूस्त करणेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५१७ दिनांक : १९/०१/२०२४

वरीलप्रमाणे प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये प्रशासकीय सभा ठराव क्रमांक ४६९, दिनांक ३०/१०/२०२३ मधील नमूद प्रस्तावनेऐवजी पुढीलप्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. उक्त प्रशासकीय ठरावातील इतर सर्व नोंदीमध्ये कोणताहीं बदल करणेत येत नाही.

प्रस्तावना -- इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये आकाशचिन्हे, होर्डिंग व जाहिरात प्रसिध्द करण्याचे नियमन आणि नियंत्रण मार्गदर्शक तत्वे २०२३ लागू करणे व जागावापर फी आणि जाहिरात शुल्क दर निश्चित करणे तसेच इस्लामपूर नगरपरिषद ठराव क्र.१८२, दि.०९/०२/२०१८ यामध्ये नवीन मार्गदर्शक तत्वे २०२३ नुसार बदल करणे, काही तरतुदी रद्द करणे आवश्यक आहे.

ऐवजी –

प्रस्तावना -- मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील सिव्हील अपील डायरी नं.(S) २५२२/२०२३ मध्ये इस्लामपूर नगरपरिषदेस दिलेल्या निर्देशानुसार सांडपाण्यावर तात्पुरत्या उपाययोजना करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

पुढील आवश्यक ती कार्यवाही संबंधित विभागाने प्रचलित नियमानुसार करावी.

१९.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०१ : नगरपरिषदेची वेबसाईट विकसीत करणेबाबत प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: नगरपरिषदेची वेबसाईट विकसीत करणेबाबत प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव:- इस्लामपूर नगरपरिषदेने नगरपरिषद संचालनालय यांचेकडील आदेशानुसार uran-islampur.in ही वेबसाईट सन २०१२ पासून कार्यान्वित करण्यात आलेल्या मात्र सन २०१८ पासून मायनेट कंपनीचा कार्यकाल समाप्त झाल्याने कंपनीकडून कोणत्याही पध्दतीचा सिस्टीम सपोर्ट मिळत नाही. तसेच यामध्ये काही बिघाड झालेस नगरपरिषद स्तरावरून दुरूस्ती करणेत आलेली नसल्यामुळे या वेबसाईटमध्ये ऑक्टोंबर २०२३ पासून वारंवार तांत्रिक समस्या उद्भवत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीला नगरपरिषदेची वेबसाईट ही दैनंदिन कामकाजाची माहिती व ठराव प्रसारीत करणेसाठी तसेच निवडणूकीकामी खूप महत्वाची आहे. त्यामुळे सध्याची वेबसाईट बंद करून नवीन वेबसाईट खरेदी करणे गरजेचे असल्याने अंदाजे खर्च रक्कम रू.२,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लक्ष मात्र) एवढ्या अपेक्षित खर्चाकामी नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्रमांक ५००, दिनांक ११/१२/२०२३ अन्वये जाहीर निविदा सूचना संबंधित विभागाकडून दैनिक सकाळ या स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक ०३/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली होती. त्याप्रमाणे विहित मुदतीमध्ये ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्रापत झालेल्या निविदा मे.सक्षम निविदा समितीसमोर उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे,

अ.क्र	निविदादाराचे नाव	प्रती नग दर	शेरा
१	टेक युनाईट सॉफ्टवेअर सोल्युशन, इस्लामपूर	१,६५,०००/-	L1
२	इनसाईट सिक्युरिटी सोल्युशन, अहमदनगर	१,९०,०००/-	L 3
३	कियाज एंटरप्राईजेस, पुणे	१,८०,०००/-	L 2

उपरोक्त प्रमाणे वित्तीय बोली लिफाफ्याची तुलनात्मकदृष्टया छाननी केली असता टेक युनाईट सॉफ्टवेअर सोल्युशन, इस्लामपूर या निविदाधारकाचे दर हे सर्वात कमीचे म्हणजे प्रती नग दर रू.१,६५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक लक्ष पासष्ट हजार मात्र) इतके न्युनतम आहेत. त्यामुळे टेक युनाईट सॉफ्टवेअर सोल्युशन, इस्लामपूर यांचे निविदेमध्ये नमूद केलेले दरास मान्यता देणे व अनुषंगीक कार्यवाही करणे आवश्यक असल्याने इस्लामपूर नगरपरिषदेचे प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५७८ **दिनांक :** २५/०१/२०२४

उक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे इस्लामपूर नगरपरिषदेस प्राप्त आदेशानुसार सध्याची बंद अवस्थेत असणारी वेबसाईट बंद करून नवीन खरेदी करणेकामी यापूर्वीच्या प्रशासकीय ठरावान्वये दिलेल्या मान्यतेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीनंतर प्राप्त झालेल्या निविदेमधील टेक युनाईट सॉफ्टवेअर सोल्युशन, इस्लामपूर या कमी दराच्या निविदाधारकाकडून पुढील कार्यवाही करून घेण्यात यावी. त्याप्रमाणे संबंधितांना कामाचे कार्यादेश पारीत करणे, करारनामा करून घेणे, व तदअनुषंगीक कामकाज करणेत यावे.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये मे.टेक युनाईट सॉफ्टवेअर सोल्युशन, इस्लामपूर यांचे निविदेमधील नमूद केलेले दर रक्कम रू.१,६५,०००/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर निविदाकाराबरोबर निविदा स्विकृती, उर्वरित बयाणा रक्कम भरून घेणेस, करारनामा व कार्यादेश देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच उर्वरित बयाणाकारांच्या रक्कमा परत करणेसही मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च अर्थसंकल्पिय तरतुदीमधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

-१२५.१.२०२२

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, जि. सांगली
प्रशासकीय ठराव

विषय-२ इस्लामपूर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्वच्छता / सफाई कर्मचारी व आस्थापनेवरील सफाई कर्मचारी वगळता इतर सर्व कर्मचारी यांचा १ जानेवारी २०२४ पासून १ वर्षाकरिता आरोग्य विमा प्रक्रिया राबविणेस HDFC ERGO General Insurance Company Limited यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे

संदर्भ – १) नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांची मागणी व हमीपत्र.

२) दि.१७/०१/२०२४ रोजीची मंजूर कार्यालयीन टिप्पणी

३) प्रशासकीय ठराव क्र.२५९ दि.२०/१२/२०२२

४) निविदा मंजुरीकामीचा प्रशासकीय ठराव क्र.२७५ दि.३१/१२/२०२२

प्रस्ताव - इस्लामपूर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्याना कामाच्या स्वरूपानुसार काही शारीरिक व्याधी निर्माण होत असतात. त्यातच काहीना मोठ्या रोगाला बळी पडावे लागते. त्यातूनच काहींची शस्त्रक्रिया करावी लागते. याबाबी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील असोत किंवा त्यांच्या कुटुंबातील (उदा. आई, वडील, पती, पत्नी, मुलगा, मुलगी) अन्य सदस्य असोत; अशा वेळी या आरोग्यविषयक बाबी अचानक उद्भवल्याने खर्चाचा बोजा पडतो. तसेच जागतिक महामारी कोविड-१९ सारख्या अचानक उद्भवणाऱ्या मोठ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीला बळी पडावे लागते. त्यावेळी कर्जासारखा पर्याय निवडावा लागतो. सद्यस्थितीला नगरपरिषद कर्मचाऱ्याना वैद्यकीय प्रतिपूर्ती सारखा कोणताही लाभ मिळत नाही. त्यामुळे शासनाकडील वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचणेनुसार कोणत्याही शासकीय – निमशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्याना आरोग्य विमा उतरविल्यास त्यांना त्याचा चांगला आर्थिक फायदा व मानसिक आधार मिळणार आहे.

०२. त्यामुळे संदर्भ क्र. १ येथील प्रशासकीय ठरावान्वये तत्कालीन प्रशासक दिलेल्या निर्देशानुसार इस्लामपूर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील कार्यरत कर्मचारी व त्यांचे कुटुंबातील सदस्य (पत्नी व २ अपत्ये) यांचा वैद्यकीय विमा उतरविणे बाबतचे धोरण नगरपरिषदेने पुढीलप्रमाणे अंगिकारले आहे.

१) *नगरपरिषद आस्थापनेवरील सफाई कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा हा* ***महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे प्रकरण ३ मधील कलम ४९ (अ) मधील तरतुदीप्रमाणे व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-१०८५/९३/सीआर८/८५/नवि-१०, दि.०२ फेब्रुवारी,१९८८*** *मधील तरतुदींनुसार नगरपरिषदेमार्फत उतरविणेत यावा. याचा खर्च* ***दुर्बल घटकांकरिता राखीव ५% निधीतून*** *करणेत यावा, असे नमूद आहे.*

२) *नगरपरिषद आस्थापनेवरील सफाई कर्मचारी वगळून इतर सर्व कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा हा* ***महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे प्रकरण ३ मधील कलम ४९ (३) (न)*** *मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उतरविण्यात यावा. याचा खर्च* ***नगरपरिषद निधीतून*** *करणेत यावा.*

याकामी आवश्यक असणारी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच,

अ) आरोग्य विमाछत्राच्या हप्त्याचा सदर खर्च यापुढे प्रतिवर्षी उपरोक्त निधीमधून करणेत यावा. मात्र कर्मचाऱ्यांना स्व-जबाबदारीची जाणीव रहावी याकरिता किमान रु.१० लक्ष /वर्ष इतका Super top up

Scanned with OKEN Scanner

Health Insurance किंवा अन्य कोणत्याही Health Insurance असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे विमाछत्र Renewal (पुर्ननविकरण) करण्यात यावे.

ब) प्रतिवर्षी सेवानिवृत्त / सेवेत असताना मृत्यू झालेल्या / स्वेच्छानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याना पुढील वर्षीच्या विमाछत्र Renewal मधून वगळावे व नव्याने भरती झालेल्या कर्मचाऱ्याला व त्याच्या पत्नी व २ अपत्यांना आरोग्य विमा लागू करणेत यावा.

क) प्रतिवर्षी नवीन निविदा प्रक्रिया राबवून नव्याने विमा उतरविणे संयुक्तिक नसल्याने तसेच यामुळे खर्चात वाढ आणि सुविधांमध्ये विलंब होणारा असलेने प्रतिवर्षी नवीन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक राहणार नाही.

०३. गतवर्षी १ जानेवारी,२०२३ ते पुढील वर्षाकरिता इस्लामपूर नगरपरिषद आस्थापनेवर १२० कर्मचारी कार्यरत असून त्यांचे कुटुंबातील सदस्य (पत्नी व २ अपत्ये) यांचा HDFC ERGO General Insurance Company Limited यांचेकडून प्राप्त Renewal Quotation मधील यादी व दरानुसार आरोग्य विमाछत्र देणेत आलेले होते. त्यानुसार नगरपरिषदेमार्फत इतकी रक्कम कर्मचारी विम्यापोटी भरणेत आलेली होती. सदर योजनेमधून एकूण ७ कर्मचारी यांनी र.रु.८,८२,१०५/- इतका आरोग्य विमा लाभ घेतला आहे.

०४. प्रशासकीय ठराव क्र.२५९ दि.२०/१२/२०२२ मध्ये ***प्रतिवर्षी नवीन निविदा प्रक्रिया राबवून नव्याने विमा उतरविणे संयुक्तिक नसल्याने तसेच यामुळे खर्चात वाढ आणि सुविधांमध्ये विलंब होणारा असलेने प्रतिवर्षी नवीन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक राहणार नाही असे नमूद असलेने*** HDFC ERGO General Insurance Company Limited यांचेकडून नगरपरिषदेमध्ये ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत आरोग्य विमा काढणेकामी नगरपरिषदेकडील कर्मचाऱ्यांची संख्या व त्याकामी येणाऱ्या खर्चाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

अ.क्र.	विम्याचा तपशील	कर्मचारी संख्या	कंपनीला अदा करावयाची रक्कम	खर्च
१	नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्वच्छता / सफाई कर्मचारी यांचा १ जानेवारी २०२४ पासून १ वर्षाकरिता आरोग्य विमा काढणे.	२२३ (पत्नी व २ अपत्यसहित)	रु.८,१०,८३९/-	दुर्बल घटकांकरिता राखीव ५% निधी
२	आस्थापनेवरील सफाई कर्मचारी वगळता इतर सर्व कर्मचारी यांचा १ जानेवारी २०२४ पासून १ वर्षाकरिता आरोग्य विमा	८३ (पत्नी व २ अपत्यसहित)	रु.३,५७,९५९/-	नगरपरिषद निधी
एकूण				रु. ११,६८,७९८/-

तरी, इस्लामपूर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्वच्छता / सफाई कर्मचारी व आस्थापनेवरील सफाई कर्मचारी वगळता इतर सर्व कर्मचारी यांचा १ जानेवारी २०२४ पासून १ वर्षाकरिता आरोग्य विमा प्रक्रिया राबविणेस HDFC ERGO General Insurance Company Limited यांना र.रु.११,६५,९९८/- जमा करणेस, सेवानिवृत्त झालेले कर्मचारी कमी करणेस व नव्याने नियुक्त झालेले कर्मचारी म्हणजे १ जानेवारी,२०२४ रोजी कार्यरत कर्मचारी यांची यादी व आरोग्य विमा Renewal (पुनर्नविकरण) निश्चित करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

तसेच याकामाची पुन्हा निविदा प्रक्रिया राबविणेची आवश्यकता नसलेबाबत संदर्भीय प्रशासकीय ठरावामध्ये नमूद असलेने HDFC ERGO General Insurance Company Limited यांचेसोबत करारनामा करून आरोग्य विमा Renewal (पुनर्नविकरण) करणेकामी असा प्रस्ताव आस्थापना विभागाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक – ५।७ **दिनांक – २५/०१/२०२४**

नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार व यापूर्वीचे प्रशासकाने निश्चित केलेल्या धोरणाबरहुकूम हा प्रश्न कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा असलेने. तसेच स्वच्छ सर्वेहक्षण मध्ये देखील आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्याना वैद्यकीय सुविधा (सुरक्षा कवच) देण्याचे निर्देश असलेने आरोग्य विमा राबविणे हा एकप्रकारे वैद्यकीय सुविधा देणेचा भाग आहे. त्यामुळे इस्लामपूर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्वच्छता / सफाई कर्मचारी व आस्थापनेवरील सफाई कर्मचारी वगळता इतर सर्व कर्मचारी यांचा (पत्नी व दोन अपत्यांसाहित) असे एकूण १२० कर्मचारी व कुटुंब मिळून ३०६ जणांना HDFC ERGO General Insurance Company Limited यांचेमार्फत १ वर्षाकरिता लाभ मंजूर करणे योग्य राहील.

याबाबतची सर्व कार्यवाही महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, श्री. राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेमधील आस्थापनेवरील १२० कर्मचारी कार्यरत असून त्यांचे कुटुंबातील सदस्य (पत्नी व २ अपत्ये) यांचा HDFC ERGO General Insurance Company Limited या कंपनीमार्फत वैद्यकीय आरोग्य विमा उतरविणेस व त्याकामी नुतनीकरण करणेस या सर्व प्रक्रीयेकरीता येणारा खर्च रु. ११,६८,७९८/- साठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	विम्याचा तपशील	कर्मचारी संख्या	कंपनीला अदा करावयाची रक्कम	खर्च
१	नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्वच्छता / सफाई कर्मचारी यांचा १ जानेवारी २०२४ पासून १ वर्षाकरिता आरोग्य विमा काढणे.	२२३ (पत्नी व २ अपत्यसहित)	रु.८,१०,८३९/-	दुर्बल घटकांकरिता राखीव ५% निधी
२	आस्थापनेवरील सफाई कर्मचारी वगळता इतर सर्व कर्मचारी यांचा १ जानेवारी २०२४ पासून १ वर्षाकरिता आरोग्य विमा	८३ (पत्नी व २ अपत्यसहित)	रु.३,५७,९५९/-	नगरपरिषद निधी
एकूण				रु. ११,६८,७९८/-

आस्थापना विभागाने भविष्यात या संदर्भात काही लेखा आक्षेप आल्यास याकामीची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कर्मचारी यांची असलेबाबत लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

२५.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०३ : नगरपरिषद आस्थापनेवरील नियुक्त कर्मचा-यांच्या समाप्त झालेल्या परिविक्षाधीन कालावधीनंतर त्यांना नगरपरिषद सेवेत कायम करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना:- नगरपरिषद आस्थापनेवरील नियुक्त कर्मचा-यांच्या समाप्त झालेल्या परिविक्षाधीन कालावधीनंतर त्यांना नगरपरिषद सेवेत कायम करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्ताव:- नगरपरिषद आस्थापनेवर अनुकंपा तत्वानुसार खालीलप्रमाणे कार्यरत कर्मचा-यांचा नियुक्ती आदेशांमध्ये नमूद केलेप्रमाणे परिविक्षाधीन कालावधी समाप्त झालेला आहे.

अ.क्र.	कर्मचा-याचे नांव	पदनाम	कामकाज विभाग	नियुक्ती दिनांक	परिविक्षाधीन कालावधी समाप्त दिनांक	शेरा
०१	राजेंद्र सर्जेराव गुजले	लिपीक	कर विभाग	३०/१२/२०२१	३०/१२/२०२३	काम समाधानाकरक केलेबाबतचा दिनांक १८/०१/२०२४ रोजीचा विभागांचा अहवाल
०२	अजिंक्य अरूण वाळवेकर	लिपीक	प्रशासन	३१/१२/२०२१	३०/१२/२०२३	
०३	संदीप गुणवंत पाटील	शिपाई	पाणी पुरवठा	३१/१२/२०२१	३०/१२/२०२३	

वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेशाप्रमाणे त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीमध्ये समाधानकारक कामकाज असल्याचा अहवाल प्राप्त झालेला असल्याने संबंधितांना नगरपरिषद आस्थापनेवरील सेवेमध्ये कायम करणेची कार्यवाही करणेकामी प्रशासक यांच्या मान्यतेसाठी प्रशासकीय ठरावान्वये मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५२० **दिनांक :** २५/०१/२०२४

वरीलप्रमाणे प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे व संबंधित विभगाकडील कार्यालयीन टिपणी व अहवालाचे अवलोकन करता नगरपरिषद आस्थापनेवरील ०३ कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक असल्याचा विभागाने दिलेल्या अहवालानुसार संबंधितांना नगरपरिषद सेवेमध्ये नियुक्ती दिनांकापासून कायम करणे योग्य राहील.

वरीलप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-

Scanned with OKEN Scanner

२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये प्रस्तावनेमध्ये नमूद तक्त्यातील कर्मचा-यांना नगरपरिषद सेवेमध्ये त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानाकारक पूर्ण झाला असल्याने दिनांक ३०/१२/२०२१ रोजीपासून कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदरच्या कर्मचा-यांना लेखी कळविण्यात येऊन त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. वेतनविषयक अनुज्ञेय असलेले सर्व देय लाभ त्यांना लागू राहतील.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

२५.१.२०२२

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०४ : वैशिष्ठ्यपूर्ण योजनेअंतर्गत प्राप्त निधीमधून प्रभाग क्र.०४ मधील गटर व रस्ते करणेची कामे निश्चित करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना: वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र.नपावै-2023/प्र.क्र87 (क-76/नवि-16, दिनांक 13/09/2023 अन्वये रक्कम रु.2.00 कोटी एवढा निधी मंजूर असून सदर शासन निर्णययातील अ.क्र. 02 चे काम प्रभाग क्र.04 मधील गटर व रस्ते करणेकामी रक्कम रु.1.00 कोटी निधी मंजूर झाला आहे. सदर प्रभागातील कामाची निवड निश्चिती करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव;- वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र. नपावै-2023/प्र.क्र87 (क-76/नवि-16, दिनांक 13/09/2023 अन्वये रक्कम रु.2.00 कोटी एवढा निधी मंजूर असून सदर शासन निर्णययातील अ.क्र.02 चे काम प्रभाग क्र.04 मधील गटर व रस्ते करणेकामी रक्कम रु.1.00 कोटी निधी मंजूर झाला आहे. सदर प्रभागातील कामाची निवड निश्चिती करणे आवश्यक आहे.

सदर योजनेअंतर्गत कामाची निवड निश्चिती करणेकामी मा.आनंदराव पवार (बापू) शिवसेना जिल्हा प्रमुख सांगली यांनी दि.15/01/2024 इकडे प्राप्त दिनांक 19/01/2024 रोजीच्या पत्रान्वये प्रभाग क्र.04 मधील खालीलप्रमाणे कामे सूचविणेत आली आहेत.

1. हनुमाननगर झेंडा चौक ते दक्षिण बाजुस खडीकरण, डांबरीकरण करणे.
2. हनुमाननगर झेंडा चौक ते दक्षिण बाजुस आर.सी.सी. गटर करणे.
3. रमेश भोसले घर ते रणजित भोसले घर रस्ता कॉक्रीट करणे.
4. हनुमान मंदिर संपत कदम ते विश्व होगारे घर रस्ता कॉक्रीट करणे.
5. रमेश भिंगाडे ते गणेश भास्कर घरापर्यंत कॉक्रीट करणे.
6. हनुमान मंदिर पाठीमागे सुभाष पवार ते मानसिंग जाधव घरापर्यंत कॉक्रीट करणे.
7. सागर जाधव ते अल्ताफ मोमीन घरापर्यंत कॉक्रीट करणे.
8. बाळासाहेबत मस्के ते हणमंत कोकितकर घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.
9. हणमंत कोकितकर ते संपत जाधव घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.
10. शिवाजी पवार ते उमेश पवार बंदिस्त पाईप गटर व रस्ता कॉक्रीट करणे.
11. सागर जाधव ते दिपक दुरूगडे घरापर्यंत कॉक्रीट करणे.

वरीलप्रमाणे सुचविणेत आलेली कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे मंजूर रक्कम रु. 1.00 कोटी निधीच्या अधिन राहून नगरपरिषद पॅनेलवरील वास्तूविशारद यांचेकडून तयार करुन सदरची कामे तांत्रिक मंजूरीकरिता मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविणे. तसेच तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेनंतर प्रशासकीय मंजूरीकरिता मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे पाठविणे व मंजूरीनंतर पुढील रितसर योग्य ती कार्यवाही करणेकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५२५ दिनांक : २५/०१/२०२४

वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र.नपावै-2023/प्र.क्र87 (क-76/नवि-16, दिनांक 13/09/2023 अन्वये रक्कम रु.2.00 कोटी एवढा निधी मंजूर असून सदर शासन निर्णययातील अ.क्र.02 चे काम प्रभाग क्र.04 मधील गटर व रस्ते करणेकामी रक्कम रु.1.00 कोटी निधी मंजूर झाला आहे.

सदर योजनेअंतर्गत कामाची निवड निश्चिती करणेकामी मा. आनंदराव पवार (बापू) शिवसेना जिल्हा प्रमुख सांगली यांनी दि.15/01/2024 इकडे प्राप्त दिनांक 19/01/2024 रोजीच्या पत्रान्वये प्रभाग क्र.04 मधील खालीलप्रमाणे कामे सूचविणेत आलेली कामे निश्चित करणेस मंजूरी देणेत येत आहे..

1. हनुमाननगर झेंडा चौक ते दक्षिण बाजुस खडीकरण, डांबरीकरण करणे.
2. हनुमाननगर झेंडा चौक ते दक्षिण बाजुस आर.सी.सी. गटर करणे.
3. रमेश भोसले घर ते रणजित भोसले घर रस्ता कॉक्रीट करणे.
4. हनुमान मंदिर संपत कदम ते विश्व होगारे घर रस्ता कॉक्रीट करणे.
5. रमेश भिंगाडे ते गणेश भास्कर घरापर्यंत कॉक्रीट करणे.
6. हनुमान मंदिर पाठीमागे सुभाष पवार ते मानसिंग जाधव घरापर्यंत कॉक्रीट करणे.
7. सागर जाधव ते अल्ताफ मोमीन घरापर्यंत कॉक्रीट करणे.
8. बाळासाहेबत मस्के ते हणमंत कोकितकर घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.
9. हणमंत कोकितकर ते संपत जाधव घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे.
10. शिवाजी पवार ते उमेश पवार बंदिस्त पाईप गटर व रस्ता कॉक्रीट करणे.
11. सागर जाधव ते दिपक दुरूगडे घरापर्यंत कॉक्रीट करणे.

वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे मंजूर रक्कम रु. 1.00 कोटी निधीच्या अधिन राहून नगरपरिषद पॅनेलवरील वास्तूविशारद यांचेकडून तयार करुन सदरची कामे तांत्रिक मंजूरीकरिता मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविणे. तसेच तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेनंतर प्रशासकीय मंजूरीकरिता मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे पाठविणे व मंजूरीनंतर पुढील रितसर योग्य ती कार्यवाही करणेकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे कराबयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) व 317 अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दिनांक 27 डिसेंबर 2021 अन्वये मी,राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदर कामी खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

२५.१.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय 01 : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान पाणी पुरवठा योजनेच्या निकषाप्रमाणे इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेस नगरपरिषदेचा 15 टक्के हिस्सा उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषद, जि.सांगली येथील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा असल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या दि.06/02/2024 च्या टिपणीद्वारे लेखा विभागास कळविण्यात आलेले आहे.

मा.मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी योजनेच्या 15% स्वःहिस्याचा वित्तीय आकृतीबंध सादर करणेबाबत लेखा विभागास निर्देश दिले आहेत. सदर योजना अंदाजे रू.125 कोटी एवढ्या रक्कमेची असून यामधील 15% याप्रमाणे रू.18.75 कोटी एवढी रक्कम शासनाने सदर योजना मंजूर केल्यानंतर योजनेच्या खात्यावर वर्ग करणे नगरपरिषदेस बंधनकारक आहे. इस्लामपूर नगरपरिषदेचे सध्याचे उत्पन्नाचे स्त्रोत व मागील तीन वर्षात प्राप्त झालेले प्रत्यक्ष उत्पन्न व सध्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेता फक्त नगरपरिषद उत्पन्नातून संपूर्ण रक्कम उभारणे शक्य नाही. परंतू मा.सर्वसाधारण सभेने दि.03/02/2020 व प्रशासक तथा मुख्याधिकारी यांनी दि.01/11/2022 रोजीच्या प्रशासकीय ठरावान्वये सदर योजना मंजूरीचा निर्णय घेतला होता. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.16/06/2023 रोजी योजनेला तांत्रिक मान्यता प्रदान केली असल्याने सदर योजना शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजना शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेपूर्वी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान पाणीपुरवठा योजनेच्या निकषाप्रमाणे नगरपरिषदेचा 15% हिस्सा उभारण्याबाबत वित्तीय आकृतीबंध उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

नगरपरिषदेच्या विविध बँकांच्या खात्यांवर सध्या शिल्लक असणारा, पुढील दोन वर्षात येणारे उत्पन्न, शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान विचारात घेता वित्तीय आकृतीबंध सादर करण्यास हरकत नसल्याबाबतचा प्रस्ताव लेखा विभागाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५२२ **दिनांक :** 08/02/2024

उक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान पाणी पुरवठा योजनेच्या निकषाप्रमाणे इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेस नगरपरिषदेचा 15 टक्के स्वःहिस्सा लोकहितास्तव योजनेच्या व्यवहार्यतेकरिता उपलब्ध करून देणे योग्य राहिल.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक 03/01/2022 रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मधील कलम 316 (ब) व 317 अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-2020/प्र.क्र/71, दिनांक 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान

Scanned with OKEN Scanner

अभियान पाणी पुरवठा योजनेच्या निकषाप्रमाणे इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत वाढीव पाणी पुरवठा योजनेस नगरपरिषदेचा 15 टक्के स्वःहिस्सा उपलब्ध करून देणेस मान्यता देत आहे.

अ.क्र.	नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत	आर्थिक वर्ष 2023-24	आर्थिक वर्ष 2024-25	आर्थिक वर्ष 2025-26	शेरा
1	नगरपरिषद पाणीपट्टी विभागातील उत्पन्न	2500000	2500000	2500000	प्रत्येक आर्थिक वर्षात पाणीपट्टी निधीतून सदर रक्कम योजनेच्या खात्यात वर्ग करणेत येईल.
2	नगरपरिषद कर विभागातील उत्पन्न	10000000	10000000	10000000	प्रत्येक आर्थिक वर्षात संकलित कर निधीतून सदर रक्कम योजनेच्या खात्यात वर्ग करणेत येईल.
3	नगरपरिषद विकास शुल्क उत्पन्न	10000000	10000000	10000000	प्रत्येक आर्थिक वर्षात विकास शुल्क निधीतून सदर रक्कम योजनेच्या खात्यात वर्ग करणेत येईल.
4	14 वा वित्त आयोग (कार्यात्मक अनुदान)	30000000	0	0	--
5	15 वा वित्त आयोग	5000000	5000000	5000000	नगरपरिषदेस दरवर्षी शासनाकडून प्राप्त होणा-या अबंधनकारक अनुदानातून वर्ग करणेत येतील.
6	नगरपरिषदेस मिळणारी विविध योजनांची बक्षीस रक्कम	0	0	0	--
7	वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणी	0	0	75000000	नगरपरिषदेने सन 2024-25 अखेर योजनेमध्ये भरणा केलेला एकूण स्वःहिस्सा व शिल्लक राहिलेला स्वःहिस्याची

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत	आर्थिक वर्ष 2023-24	आर्थिक वर्ष 2024-25	आर्थिक वर्ष 2025-26	शेरा
					रक्कम विचारात घेऊन वित्तीय संस्थांकडून कर्ज उभारणीचा निर्णय तत्कालिन परिस्थितीत लोकनियुक्त सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे घेण्यात येईल.
एकूण		57500000	275000000	102500000	

वरीलप्रमाणे वर्षनिहाय निश्चित केलेल्या स्वःहिस्याचा निधी त्या त्या आर्थिक वर्षात सदरहू पाणीपुरवठा योजनेच्या खात्यात योजना मंजूरीनंतर वर्ग करणेची जबाबदारी लेखापाल, लेखा विभाग यांची राहिल. त्यानुसार उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सन 2023-24 मधील निधी राखीव ठेवावा व योजना मंजूरीनंतर योजनेच्या स्वतंत्र बँक खात्यात वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय 02 : इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत पाणी पुरवठा योजनेच्या ESR व WTP करिताच्या नवीन जागेस मान्यता देऊन प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय घेणे.

==========

संदर्भ- (1) जा.क्र इनपा/मु.का /422/2024 दि – 05/02/2024
(2) Global Infra And Technical Consultants Associate, Nagpur आणि मे.रे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.गुजरात यांचे कडील पत्र दि.06/02/2024

प्रस्ताव:- इस्लामपूर नगरपरिषदेच्या मा.सर्वसाधारण सभेने दि.03/02/2020 व प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद यांचा दि.01/11/2022 रोजीच्या प्रशासकीय ठरावात नमूद केलेल्या पाण्याच्या टाक्यांची जागा नगरपरिषदेच्या ताब्यात आहे अगर कसे? याची कोणतीही खात्री या योजनेचे तांत्रिक सल्लागार म्हणून मे.Global Infra And Technical Consultants Associate, Nagpur आणि मे.रे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. गुजरांत यांनी केलेली नाही. सदरची बाब 3 महिन्यापूर्वी सदर संस्थेस इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारित वाढीव पाणी पुरवठा योजनेचा फेर प्रस्ताव दोन टप्प्यात तयार करून सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी सादर करणेस कळविले असता; त्यावेळेस निदर्शनास आलेले आहे. वास्तविकता प्रस्ताव दाखल करणेपुर्वी WTP व ESR याकरिता जागा ताब्यात असणे आवश्यक असल्याने योजनेचे महत्त्व ध्यानी घेऊन नगरपरिषदेच्या मालकीच्या जागांचा शोध WTP व ESR साठी सुरु करण्यात आला असता, संभाव्य जागा निश्चित करणेची धारणा नगरपरिषदेची असल्याची कळवून सदरच्या जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य आहेत अगर कसे ? सदर नवीन जागांमुळे योजनेच्या मुळ अंदाजपत्रकीय रकमेत बदल होईल अगर कसे? सदर नवीन जागांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे अगर कसे? तसेच नवीन जागा प्रस्तावित केले नंतर शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सदर करणे योग्य होईल अगर कसे? हत्ती तलाव येथील WTP करताची जागा नवीन WTP होणेकरिता पुरेशी आहे किंवा अगर कसे? या बाबत तांत्रिक अभिप्राय इस्लामपूर नगरपरिषदेणे दि 05/02/2024 रोजीच्या पत्रान्वये मे Global Infra And Technical Consultants Associate, Nagpur आणि मे.रे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि गुजरात यांचे कडूंन मागितलेला आहे. तदअनुषंगाने मे Global Infra And Technical Consultants Associate, Nagpur आणि मे.रे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. गुजरात यांनी दि.06/02/2024 रोजी या बाबत खुलासा पुढील प्रमाणे सादर केलेला आहे.

पत्र क्र. जा.क्र.इनपा / मु.का./ 422/2024 दि.05.02.2024 च्या अन्वये इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेतील, प्रस्तावित सर्व उंच पाणी टाकी व जलशुद्धीकरण केंद्र या उपांगासाठी लागणाऱ्या जागा बाबत पुन्हा स्थळ पाहणी केली आहे. ज्या जागा आजरोजी नगरपरिषदेच्या नावावर अथवा ताब्यात नाहीत अश्या जागा बाबत पर्यायी जागां सुचवल्या आहेत. पर्यायी जागा त्याच पाणीवितरण विभागात किंवा शेजारील पाणीवितरण विभागातील सर्वात जवळची व त्याच समपातळीवरील असल्याने मंजूर तांत्रिक मान्येतेत बदल होत नाही.

वरील झालेला अंशतः तांत्रिक बदल पाहता योजनेच्या प्रकल्प अहवालात तांत्रिक अथवा आर्थिक बदल होणार नाही. तसेच या बदलामुळे नगरपरिषदेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारित वाढीव पाणीपुरवठा

Scanned with OKEN Scanner

योजनेचा प्रकल्प अहवाल शासनाकडे प्रशासकीय मंजुरीला पाठवणे उचित राहील.असा अभिप्राय दिलेला आहे.

या पूर्वी मा.सर्वसाधारण सभेने दि.03/02/2020 व प्रशासक इस्लामपूर नगरपरिषद यांचा दि.01/11/2022 च्या ठरावात नमूद केलेल्या पाण्याच्या टाक्यांची जागा नगरपरिषदेच्या ताब्यात नसलेने व ती ताब्यात येण्याची शक्यता नसलेने नगरपरिषदेस लोकहितास्तव व योजना लवकरात लवकर कार्यान्वित होणेकामी नगरपरिषद नगर अभियंता, बांधकाम विभाग, स्थापत्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग आणि पाणीपुरवठा योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या एकत्रित केलेल्या जागा उपलब्धतेच्या सर्वेक्षणानुसार जुन्या जागांऐवजी नविन /सुयोग्य जागा निश्चित केलेल्या आहेत, वरील प्रमाणे जागा निश्चितीकरणेस व त्या अनुषंगाने सुधारित पाणीपुरवठा योजनेत दाखल करणेस पुढील **प्रमाणे विभागाचा अभिप्राय आहे.**

अ) इस्लामपूर नगर परिषद शहराची होणारी औद्यागिक, शैक्षणिक वाढ यामुळे नागरीकरणामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पाण्याची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. याबाबीवर उपाय योजना करणेकामी इस्लामपूर शहराची सुधारित पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करणेत आली आहे.

४४	मार्कर पेन परमनंट	२५/-
४५	पेनसील सेल (गोल्ड)	१५/-
४६	मोठा सेल (नोवीनो)	३५/-
४७	कॅल्क्युलेटर (सिटीजन)12 डिजिट 100 स्टेप	५०३/-
४८	लेजर पेपर एफ एस साइज	५४०/-
४९	लेजर पेपर ए फोर साइज	४४०/-
५०	लेजर पेपर ए फोर साइज	४४०/-
५१	खळ	५५/-
५२	ए 4 साइज कलर झेरॉक्स	४५०/-
५३	कात्री लहान	४०/-
५४	कात्री मध्यम	१०५/-
५५	हिरवे लिफाफे (ए 4 साइज)	१५००/-
५६	गुड नाइट लिक्वीड	१०५/-
५७	कोलीन लिक्वीड	११५/-

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	वस्तुचे नांव	महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर
१	२	३
५८	अँक्रालिक नेम प्लेट	२२०/-
५९	प्लास्टीक किल्प फाइल	३०/-
६०	पॅड ,भारी ,मध्यम ,हलके	९०/-
६१	मेणॅबत्ती	१०८/-
६२	सिलकांडी	१९०/-
६३	रूम फ्रेशनर	१७५/-
६४	छोटे कुलपे 50 mm	९०/-
६५	मोठे कुलपे 65 mm	१६०/-
६६	रंगीत स्टिकर पेपर 19 x 76 mm 50	५०/-
६७	लेस फाईल	३८/-
६८	लेस बंडल	१४०/-
६९	क्वायर बुक	९०/-
७०	क्वायर बुक	१३०/-
७१	क्वायर बुक	१७०/-
७२	फुट पट्टी 1 फुट	५०/-
७३	मोठे इंक पॅड	११०/-
७४	कॉन्फरन्स पॅड	१०/-
७५	कॉन्फरन्स पॅड	३०/-
७६	निळे बॉलपेन	०७/-
७७	लाल बॉलपेन	०७/-
७८	काळा बॉलपेन	०७/-
७९	हिरवे बॉलपेन	०७/-
८०	पेपर कटर	१०/-
८१	पेपर कटर	२५/-
८२	हायलायटर	३०/-
८३	चिकट टेप	१५/-
८४	चिकट टेप	५०/-
८५	स्केच पेन पाकिट	३०/-
८६	झेरॉक्स पेपर बी 2 बी A4 हिरवे	४५०/-
८७	झेरॉक्स पेपर बी 2 बी (1 रिम) A3 हिरवे	७४०/-
८८	झेरॉक्स पेपर बी 2 बी (1 रिम) A3 पांढरे	७२०/-
८९	खाकी पेपर मोठे	२०/-
९०	मेजरींग टेप १५ मी	३२०/-
९१	मेजरींग टेप ३० मी	५९०/-
९२	पायपुसणी	११०/-
९३	मॉप	१८०/-

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	वस्तुचे नांव	महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर
१	२	३
९४	व्हॉयपर	१७५/-
९५	डांबर गोळी पाकीट	५५/-
९६	ग्लुस्टीक	३०/-
९७	कॉटन कापड मीटर प्रमाणे नायलॉन व कॉटन	४०/-,६५/-
९८	आयकार्ड लेस सहित	२०
९९	कोरी २०० पेजेस नोटबुक	७०
१००	मिक्स नोट काऊंटींग मशिंन (कॅश मशिन)	२०५००
१०१	कॅश ठेवण्याची लॉक बॅगस् (लेदर बॅग)	१५००

प्रशासकीय ठराव क्रमांक ५३२ **दिनांक --** 22/02/2024

वरील तक्त्याप्रमाणे (१) आदित्य ऑफसेट,इस्लामपूर (२) केदारनाथ एजन्सीज, इस्लामपूर (३) महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर यापैकी महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर यांची सर्वात कमी दराची निविदा असून ती बाजार भावाप्रमाणे योग्य आहे. तरी सदरची निविदा मंजूर करणेत येत आहे. वस्तूंचे नाव, कंपनी, दर इ. बाबी कार्यादेशामध्ये नमूद कराव्यात. तसेच गरजेनुसार सन २०२३-२४ उर्वरित कालावधी तसेच सन २०२४-२५ मध्ये स्टेशनरी साहित्य खरेदी करणेस व त्याची वेळोवेळी होणारी बिले अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व आवश्यक त्या कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

22.2.2024

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक तथा मुख्याधिकारी
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय – मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी शिफारस केलेले सन २०२३-२०२४ सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (२) (अ) मधील तरतूदीनुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारामध्ये प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने कलम १०१ (४) नुसार पुढील कार्यवाही करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

प्रस्तावना -- मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी शिफारस केलेले सन २०२३-२०२४ सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (२) (अ) मधील तरतूदीनुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारामध्ये प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने कलम १०१ (४) नुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव – इस्लामपूर नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असल्याने नगरपरिषदेचे अध्यक्ष / उपाध्यक्ष / सदस्य / परिषद सदस्य व मुख्याधिकारी, सर्वसाधारण सभा, स्थायी सभा, विषय समिती सभा अस्तित्वात नसलेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चा सुधारणा २०२१ मध्ये कलम ३१७ नुसार नगरपरिषदेकामी सर्व अधिकारांचा वापर करणेसाठी आणि तिची सर्व कार्यकर्तव्ये पार पाडणेसाठी राज्य निवडणूक आयोगाद्वारे विनंती करण्यात येईल अशा कालावधीसाठी शासकीय अधिका-याची किंवा अधिकारांची नियुक्ती करता येईल, असे नमूद आहे.

तदअनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ रोजी प्रशासक म्हणून मला मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना अधिकार देणेत आलेले आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (४) नुसार स्थायी समितीचे अधिकारातील निर्णय घेण्याचे अधिकार मा.प्रशासक यांच्याकडे निहित केलेले असल्याने लेखापाल व लेखापरीक्षक सेवा, इस्लामपूर नगरपरिषद यांनी मान्यतेकामी इस्लामपूर नगरपरिषदेच्या सन २०२३-२०२४ चा सुधारीत व सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पाबाबत प्रशासकीय ठरावान्वये शिफारस करणे आवश्यक असल्याचा प्रसताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक – ५३३ **दिनांक** २८/०२/२०२४

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ (४) मधील तरतूदीनुसार इस्लामपूर नगरपरिषदेच्या सन २०२३-२०२४ चा सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अर्थसंकल्प मे.स्थायी समिती प्रशासकीय ठराव क्रमांक ५१२, दिनांक १५/०१/२०२४ अन्वये प्राप्त झालेला असून आवश्यक त्या बदलांसह मंजूर करण्यात येत आहे.

नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असल्याने नजीकच्या कालावधीमध्ये कोणत्याच नगरपरिषद सभेचे (स्थायी / सर्वसाधारण / विशेष) आयोजन करण्यात येणार नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व आवश्यक त्या कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व

Scanned with OKEN Scanner

मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/ प्र.क्र./७१/नवि-१४, दि.२७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहूल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या सन २०२३-२०२४ चा सुधारीत व सन २०२४-२०२५ चे अर्थसंकल्पास उक्त अधिनियमाचे कलम १०१ (४) नुसार मान्यता प्रदान करणेत येत आहे.

त्यापुढील कार्यवाही लेखाविभागाने उक्त अधिनियमातील कलम १०१ (४) नुसार प्रस्तावित करणेसही मान्यता देणेत येत आहे.

२८.२.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

(१०८)

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय : उरुण-इस्लामपूर नगरपरिषदसाठी भुयारी गटर योजनेच्या सुधारित आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त (PMC) करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ : 1) इस्लामपूर नगरपरिषद यांचे जा.क्र.इनपा/का.14/493/2024, दि.09/02/2024.
2) दि निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक यांचे दि.15/02/2024 चे दर पत्रक.
3) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.नगरो-2023 /प्र.क्र.389 /नवि-33, दि.22/02/2024.

प्रस्ताव : -

उरुण-इस्लामपूर नगरपरिषदसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत अस्तित्वातील म्हणजेच दि.17/03/2017 रोजी शासनाने मंजूरी दिलेल्या भुयारी गटार योजनेतील उपांगनिहाय मंजूर कामांचा, झालेल्या कामाचा व प्रलंबित कामांचा आढावा घेऊन तिची उपयुक्तता तपासणे व वाढीव हद्दीसह सुधारित DPR तयार करणे करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्त करणेबाबत दि.12/01/2024 च्या पत्रान्वये शासनाने निश्चित केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना कळविले होते. त्यानुसार एकूण 13 प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी काम करण्यास इच्छुकता दर्शविली होती.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती भुयारी गटार योजनेचा आढावा घेऊन gap analysis करून जुन्या योजनेची भविष्यातील उपयुक्तता तपासणे तसेच वाढीव हद्दीसह सुधारित DPR तयार करून त्यास तांत्रिक मान्यता घेणे व सुधारित प्रकल्पाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करणे व सर्व कामावर पर्यवेक्षण करणेचे काम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी करणे अभिप्रेत आहे. त्याअनुषंगाने दि.15/02/2024 रोजी भुयारी गटार योजनेतील उपांगनिहाय मंजूर कामांचा, झालेल्या कामाचा व प्रलंबित कामांची माहिती घेऊन Primary feasibility report, सादरीकरण, Block Estimate व ज्या दराने काम करण्यास तयार आहे ते लेखी स्वरूपातील दरासह इस्लामपूर नगरपरिषदेत उपस्थित राहण्याबाबत संबंधीत 13 प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना कळविले होते. त्यानुसार 13 पैकी 04 प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार दि.15/02/2024 रोजी नगरपरिषदेमध्ये उपस्थित राहून आरोग्य विभागाकडून कामांची माहिती घेतली व Primary feasibility report, सादरीकरण, Block Estimate व PMC दर नगरपरिषदेस सादर केले होते.

इस्लामपूर नगरपरिषदेच्या भूयारी गटर योजनेचे अधिकृत कंत्राटदार मे.लक्ष्मी सिव्हील इंजिनिअरीग सर्वीसेस, प्रा.लि.कोल्हापूर हे असून त्यांनी दि.01/08/2023 च्या पत्रान्वये दि.17/03/2017 च्या शासन निर्णयातील सर्व कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने भाववाढ मागीतली असून, त्यानुसार EVALUATION REPORT (2023-24 च्या MJP च्या दरसूची नुसार) सादर केला आहे. सदर अहवालानुसार दि.17/03/2017 च्या शासन निर्णयातील भूयारी गटर योजनेच्या सर्व उपांगांची कामे पूर्ण होण्यासाठी रू.108.90 कोटी एवढा खर्च अपेक्षित असून, सदर योजनेवर यापूर्वी एकूण रू.23.25 कोटी एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याचाच अर्थ सदर योजनेचा संभाव्य खर्च अंदाजे रू.85.65 कोटी एवढा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यावरून सदर योजना अंदाजे रू.85.65 कोटी एवढ्या रक्कमेची होण्याची शक्यता गृहीत धरून संबंधित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी सदर योजनेचे Block Estimate अंदाजे रू.85.65 कोटी एवढ्या रक्कमेच्या जवळपास सादर करणे आवश्यक होते. प्रत्यक्ष स्थळपाहणी केल्यानंतर व जुन्या योजनेची माहिती घेतल्यानंतर सदर रक्कमेमध्ये 10% वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५३४ दिनांक : 28/02/2024

उक्त प्रस्तावनेमध्ये नमुद केलेप्रमाणे व संबंधित विभागाकडील कार्यालयीन टिपणीचे अवलोकन करता, दि निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक यांनी यापूर्वी योजनेवर झालेला खर्च रू.23.25 कोटी वजा करून सर्वात कमी म्हणजेच रू.85.00 कोटी संभाव्य खर्च प्रस्तावित केला असून, त्याप्रमाणात नगरपरिषदेचा स्वहिस्सा देखील कमी होणार आहे. तसेच दि निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक यांनी 2.41% हा सर्वात कमी PMC दर देखील दिलेला आहे. सदर दोन्ही बाबींमध्ये नगरपरिषदेचे आर्थिक हित असल्याने संबंधित PMC यांना नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

परंतु नगर विकास विभागाने दि.22/02/2024 च्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान ही योजना नगरोत्थान महाभियान या सुधारीत नावाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. उक्त शासन निर्णयामध्ये प्रकल्पाच्या किंमतीनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) फी चे दर शासन स्तरावरून निश्चित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करणे नगरपरिषदेस बंधनकारक व नगरपरिषदेच्या आर्थिक हिताचे आहे. इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारीत भूयारी गटर योजनेला भविष्यात शासनाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर उक्त योजनेची प्रकल्प किंमत विचारात घेऊन दि.22/02/2024 च्या शासन निर्णयातील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) फी चे दर लागू होत असल्याने त्यानुसार सुधारीत दरानुसार दि निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक यांना पुन्हा नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

इस्लामपूर शहरातील सांडपाणी नदीमध्ये जात असल्यासंदर्भात मा.राष्ट्रीय हरित लवाद (वेस्टर्न झोन) पुणे यांनी ओरीजनल अॅप्लीकेशन नं.74/2021 मध्ये नगरपरिषदेच्या विरूद्ध निर्णय दिला आहे. सदर निर्णयाच्या विरूद्ध इस्लामपूर नगरपरिषदेने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे सिव्हील अपिल दाखल केले असून सदर प्रकरणात दि.07/03/2024 रोजी सुनावणी आहे. सदर सुनावणीपूर्वी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार निश्चित करून मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांना नगरपरिषदेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. ही बाब विचारात घेता Nisarg Consultancy यांना तात्काळ नियुक्ती पत्र देणेची पुढील कार्यवाही आरोग्य विभागाने करावी.

वरील प्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) व 317 अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ – 2020 /प्र.क्र.71 /नवि-14, दि.27/12/2021 अन्वये मी राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये उक्त नमूद कार्यवाही दि.22/02/2024 च्या शासन निर्णयाप्रमाणे करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाच्या आनुषंगाने पुढील कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमानुसार व शासन निर्णयानुसार करावी.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर
प्रशासकीय ठराव

विषय ०२ - महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत इस्लामपूर शहरासाठी सुधारित पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव पाणी आरक्षण मंजूर करून मिळणेकरिता सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांचेकडे प्रस्ताव दाखल करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे .

प्रस्तावना - शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर होणे अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नागरोत्थान (राज्यस्तर) महाभियान अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषदेच्या प्रस्तावित सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी पाणी आरक्षण मिळणेबाबत सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांचेकडे प्रस्ताव दाखल करणे कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे .

प्रस्ताव- मा. सर्वसाधारण सभा, ठराव क्र.631, दि.03/02/2020 व प्रशासक तथा मुख्याधिकारी, यांचा प्रशासकीय ठराव क्र.220, दि.01/11/2022 अन्वये, इस्लामपूर नगरपरिषदेने सुवर्ण जयंती नागरोत्थान (राज्यस्तर) महाभियानअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषदेची सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजना प्रस्तावित केलेली आहे. सदर ठरावाद्वारे दिलेल्या मान्यतेनुसार नगरपरिषदेने सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडे सादर केला होता. मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि.16/06/2023 च्या पत्रान्वये सदर प्रस्तावास तांत्रिक मंजुरी प्रदान केली आहे.

02. मा.सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी येथील दि.13/02/2024 च्या पत्रान्वये, इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचेकडे सादर केला होता. परंतू सदर प्रस्तावासोबत पाणी आरक्षण नसल्याने मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांनी सदर प्रस्ताव स्विकारला नसल्याचे इस्लामपूर नगरपरिषद पाणीपुरवठा योजनेचे अधिकृत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचेकडील दि.16/02/2024 च्या पत्रान्वये नगरपरिषदेस कळविले आहे. सदर पाणीपुरवठा योजनेच्या तांत्रिक मंजुरीनुसार संकल्पित केलेप्रमाणे योजनेच्या अंतिम टप्याकरिता पाणी आरक्षणाची मागणी नगरपरिषदेच्या स्तरावरून करण्याबाबत देखील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

03. तदअनुशंगाने प्रकल्प व्यवस्थापक यांनी इस्लामपूर नगरपरिषदेचा सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेचे, **योजना कार्यान्वित वर्ष 2025. मध्य टप्पा 2040 व अंतिम टप्पा 2055 असे संकल्पन केलेले आहे.** संकल्पनेनुसार योजना कार्यान्वित वर्ष 2025 असले तरी सद्यस्थितीचा आढावा घेता, प्रत्यक्षात योजना कार्यान्वित वर्ष 2027 असणार आहे व पुढील मध्यटप्पा योजना कार्यान्वित झाल्यानंतर पुढील 15 वर्ष म्हणजेच 2040 व अंतिम टप्पा योजना कार्यान्वितनंतर पुढील 30 वर्ष 2055 संकल्पित असल्याचे नमूद करून, त्यानुसार टप्पानिहाय आवश्यक असणा-या पाणी आरक्षणाची मागणी पुढीलप्रमाणे मा.कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांना प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

अ.क्र	जनगणनेनुसार पाणी मागणी वर्ष	लोकसंख्या	पाणी मागणी
१	२०२१	१,०५,०७६	६.२१३१
२	२०३१	१,२३,१९१	७.२८४३
३	२०४१	१,४१,११८	८.३४४३
४	२०५१	१,५९,२३४	९.४१५५

04. वास्तविकता इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी पाणी आरक्षण आवश्यक असल्याची बाब सदर योजनेचे अधिकृत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांनी उशीराने नगरपरिषदेच्या निदर्शनास आणून दिली असल्यामुळे यापूर्वीच्या प्रस्तावासोबत पाणी आरक्षण प्रस्ताव यापुर्वी सादर करता आला नाही. तथापि, शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सदर योजना मंजूर होणे अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नागरोत्थान (राज्यस्तर) महाभियानअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषदेच्या प्रस्तावित सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी वरीलप्रमाणे पाणी आरक्षण आवश्यक असून, नवीन योजनेद्वारे प्रति माणसी मूळ रहिवाशी लोकसंख्येस १३५ लि. प्रती दिवस व तरंगत्या लोकसंख्येस ४५ लि. प्रती दिवस इतका पाणी पुरवठा करण्यासाठी पाठबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेला कृष्णा नदी हा पाण्याचा स्त्रोत ग्राह्य धरलेला आहे. सध्या इस्लामपूर शहरामाठी कृष्णा नदीमध्ये ५.६०९९ द.ल.घ.मी एवढे पाणी आरक्षित असून भविष्याचा विचार केला असता इस्लामपूर शहरासाठी २०५१ सालापर्यंत ९.४१५५ द.ल.घ.मी इतकी आवश्यकता असल्याने ३.८०५६ द.ल.घ.मी इतक्या वाढीव पाणी आरक्षणाची गरज आहे. तरी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियात (राज्यस्तर) अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषदकरिता नवीन पाणी पुरवठा योजनासाठी २०५१ साला पर्यन्त यापूर्वीचा मंजूर पाणी ५.६०९९ द.ल.घ.मी व वाढीव आवश्यक पाणी ३.८०५६ द.ल.घ.मी असा एकूण ९.४१५५ द.ल.घ.मी इतके पाणी आरक्षण मिळणेकामीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५३५ **दिनांक-२८/०२/२०२४**

उपरोक्त सर्व सविस्तर प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन इस्लामपूर नगरपरिषदेच्या सुधारित वाढीव पाणीपुरवठा योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी मागणी केले प्रमाणे इस्लामपूर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील सध्या इस्लामपूर शहरामाठी कृष्णा नदी मध्ये ५.६०९९ द.ल.घ.मी एवढे पाणी आरक्षित असल्याचे भविष्याचा विचार केला असता, इस्लामपूर शहरासाठी २०५१ सालापर्यंत ९.४१५५ द.ल.घ.मी इतकी आवश्यकता असल्याने ३.८०५६ द.ल.घ.मी इतक्या वाढीव पाणी आरक्षणाची गरज आहे.

तरी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियात (राज्यस्तर) अंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद करिता नवीन पाणी पुरवठा योजनासाठी २०५१ साला पर्यन्त यापूर्वीचा मंजूर पाणी ५.६०९९ द.ल.घ.मी व वाढीव आवश्यक पाणी ३.८०५६ द.ल.घ.मी असा एकूण ९.४१५५ द.ल.घ.मी इतका पाणी आरक्षण

Scanned with OKEN Scanner

मिळणेकामी प्रस्ताव मा.कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांचेकडे त्वरित सादर करावा व सदर पाणी आरक्षण प्रस्ताव मंजुरी नंतर आवश्यक तो करारनामा व शासकीय नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी आदिनीयम १९९५ मधील कलम,३१६ (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर प्रशासकीय ठरावान्वये मान्यता प्रदान करीत आहे.

२८.२.२०२२

(राहूल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. ०१ इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०५ मधील वर्णे घर ते जाधव प्लॉट ते कोळी मळा येथील रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे कामाच्या प्राप्त निविदापैकी कमी दराचे निविदा मंजूर करणेबाबत.

प्रस्तावना-

प्रभाग क्र. 05 मधील वर्णे घर ते जाधव प्लॉट ते कोळी मळा येथील रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे कामाच्या प्राप्त निविदापैकी कमी दराचे निविदा मंजूर करणेबाबत आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-12/निविदा सुचना/3579/2023 दिनांक 11/07/2023 अन्वये दि 27/07/2023 रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक सकाळ या वृत्तपत्रातून दि.12/07/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम 93 चे पोट कलम (2) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
1	प्रभाग क्र. 05 मधील वर्णे घर ते जाधव प्लॉट ते कोळी मळा येथील रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे.	23,45,421.00	1) शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव	-1.550% कमी दराने
			2) सुजय मोहन पाटील रा-गोटखिंडी	3.545% जादा दराने
			3) सचिनकुमार रघुनाथ पाटील रा-येलूर	4.365% जादा दराने
अभिप्राय:– विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये **शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव यांची -1.550%** कमी दराची निविदा सर्वात कमी दराची आहे.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10% पेक्षा कमी दराचा असलेने सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दि.27/09/2018 मधील मुद्दा क्र. 4.6.2 मध्ये नमूद केलेप्रमाणे निविदाधीन किंमतीच्या 1% एवढया किंमतीची निविदाधारकाकडून बॅकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढया रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/राष्ट्रीयकृत/शेड्युल बॅकेची ठेव पावती घेवून योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणे प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्र.:- ५३६ **दि.** २९**/02/2024**

प्रभाग क्र. 05 मधील वर्णे घर ते जाधव प्लॉट ते कोळी मळा येथील रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त एकूण 03 निविदापैकी शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव यांची -1.550% कमी दराची निविदा सर्वात कमी दराची असलेने मंजूर करणेत येत आहे. सदर कामाच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 10% पेक्षा कमी दराचा असलेने सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दि.27/09/2018 मधील मुद्दा क्र. 4.6.2 मध्ये नमूद केलेप्रमाणे निविदाधीन किंमतीच्या 1% एवढया किंमतीची निविदाधारकाकडून बॅकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढया रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/राष्ट्रीयकृत/शेड्युल बॅकेची ठेव पावती घेवून योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम नियमानुसार कागदपत्रांची पडताळणी करुन नगरअभियंता, बांधकाम विभाग यांचे स्तारावरून केल्यानंतरच परत करणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दि.27 डिसेंबर 2021 अन्वये मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदर कामी खर्च सन 2023-2024 या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

२९.२.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. ०२ सन २०२३-२४ करिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर निधीतून करावयाच्या कामांच्या प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा मंजूर करणेबाबत.

प्रस्तावना-

सन २०२३-२४ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर कामाची रितसर ई-निविदा मागविणेत आली असून सदर कामाच्या प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा मंजूर करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

सन २०२३-२४ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-१२/निविदा सुचना/१२/२०२४ दिनांक ०१/०१/२०२४ अन्वये दि १७/०१/२०२४ रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक लोकमत व दैनिक सकाळ या वृत्तपत्रातून दि.०२/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम ९३ चे पोट कलम (२) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
१	इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं.१३३/२ येथे नवीन अभ्यासिकेचे बांधकाम करणे.	१,६३,९८,८२५.००	१) शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव	अंदाजपत्रकीय दराने
			२) सचिनकुमार रघुनाथ पाटील रा-येलूर	४.६९८% जादा दराने
			३) विनायक कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर	५.४४०% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव यांची अंदाजपत्रकीय दराने कमी दराची निविदा सर्वात कमी दराची आहे.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाचा योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

प्रशासकीय ठराव क्र.:- ५३७ **दि.** २९**/02/2024**

सन २०२२-२३ करिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-२/कावि-३४८/एसआर-१९९/२०२३ दि.०८/१२/२०२३, अन्वये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांपैकी ०१ कामासाठी

Scanned with OKEN Scanner

इकडील जा.क्र. इनपा कार्या-१२/निविदा सुचना/१२/२०२४ दिनांक ०१/०१/२०२४ अन्वये दि १७/०१/२०२४ रोजीपर्यंत रितसर ई-निविदा प्रणालीव्दारे मागविणेत आल्या असून वरील ०१ कामांसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी निविदा समितीच्या अहवालाप्रमाणे उक्त नमुद सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दराने असलेने सदर निविदांना मंजूरी देणेत येत आहे. तसेच सदर कामाकरिता योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून पुढील सर्व कार्यवाही करणेस व नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम परत करणेस या ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामाची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

२९.२.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. ०३ सन २०२३-२४ करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), नागरी दलितेत्तार योजनेअंतर्गत मंजूर योजनेअंतर्गत मंजूर निधीतून करावयाच्या कामांच्या प्राप्त निविदापेकी कमी दराची निविदा मंजूर करणेबाबत.

==========

प्रस्तावना-

सन २०२३-२४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), नागरी दलितेत्तार योजनेअंतर्गत मंजूर कामाची रितसर ई-निविदा मागविणेत आली असून सदर कामाच्या प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा मंजूर करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

सन २०२३-२४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) व नागरी दलितेत्तर सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-१२/निविदा सुचना/०४/२०२४ दिनांक ०१/०१/२०२४ अन्वये दि ०९/०१/२०२४ रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक पुढारी या वृत्तपत्रातून दि.०२/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील १२ कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम ९३ चे पोट कलम (२) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
१	प्रभाग क्र.०१ मधील नवीन बहे नाका रोकडे अपार्टमेंट दक्षिण बाजू ते राजू गवारकर घरासमोरील आर.सी.सी.गटर करणे.	२५,०८,७८८.००	अक्षय रमेश पाटील रा-गोटखिंडी	-०.१०४% कमी दराने
			इंद्रनिल नारायणसिंह रजपूत रा-इस्लामपूर	१.०००% जादा दराने
			सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी	१.०००% जादा दराने
			सिध्दार्थ जयवंतराव पाटील रा-कापूसखेड	१.५००% जादा दराने
			प्रतिक संभाजी देसाई रा-इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये अक्षय रमेश पाटील रा-गोटखिंडी यांची -०.१०४% कमी दराची निविदा सर्वात कमी दराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
२	प्रभाग क्र.०६ मधील धुमाळ घर ते तानाजी कुंभार घर एक बाजू आर.सी.सी. गटर व रस्ता	१०,४२,६३३.००	इंद्रनिल नारायणसिंह रजपूत रा.इस्लामपूर	अंदाजपत्रकीय दराने
			सुनिल तारासिंग राठोड रा.इस्लामपूर	१.१००% जादा दराने

Scanned with OKEN Scanner

	कॉक्रीटीकरण करणे.		सिध्दार्थ जयवंतराव पाटील रा.कापूसखेड	१.६००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रनिल नारायणसिंह रजपूत रा.इस्लामपूर यांची अंदाजपत्रकीय दराने कमी दराची निविदा सर्वात कमी दराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
३	प्रभाग क्र.०६ मधील अशोक पाटील घर ते मोरे काका घर दोन्ही बाजूस आर.सी.सी.गटर करणे.	१०,५८,७१७.००	इंद्रनिल नारायणसिंह रजपूत रा.इस्लामपूर	अंदाजपत्रकीय दराने
			सिध्दार्थ जयवंतराव पाटील रा.कापूसखेड	१.८००% जादा दराने
			सुनिल तारासिंग राठोड रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रनिल नारायणसिंह रजपूत रा.इस्लामपूर यांची अंदाजपत्रकीय दराने कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
४	प्रभाग क्र.०९ मधील गांधी चौक ते यल्लामा चौक ते शिवसेना ऑफीस ते मार्केट यार्ड साळुंखे घरापर्यंत आर.सी.सी.गटर करणे.	३९,५७,७८१.००	रणजित दादासो पाटील रा.साखराळे	-२.०००% कमी दराने
			प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर	-०.२५०% कमी दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी	१.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये रणजित दादासो पाटील रा.साखराळे यांची -२.०००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
५	प्रभाग क्र.१० मधील खांबे गल्ली अंतर्गत आर.सी.सी.गटर करणे.	४२,५९,९१७.००	अक्षय रमेश पाटील रा.गोटखिंडी	-०.१०४% कमी दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी	१.०००% जादा दराने
			प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये अक्षय रमेश पाटील रा.गोटखिंडी यांची -०.१०४% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
६	प्रभाग क्र.१० मधील रोहिदासनगर अंतर्गत आर.सी.सी.गटर करणे.	९,०९,५१७.००	इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर	-१०.५००% कमी दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी	-०.०२५% कमी दराने
			रणजित दादासो पाटील रा.साखराळे	२.०००% जादा दराने
			प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने

Scanned with OKEN Scanner

अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर यांची -१०.५००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
७	प्रभाग क्र.१० मधील शाहुनगर एम.आर.पाटील यांचे घरासमोरील व युवराज पाटील घरासमोरील आर.सी.सी. गटर करणे.	१३,८०,७६१.००	इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर	-१०.५००% कमी दराने
			ओंकार मोहन पाटील रा.तांदुळवाडी	-९.१००% कमी दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी	-०.०२५% जादा दराने
			रणजित दादासो पाटील रा.साखराळे	२.०००% जादा दराने
			प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर यांची -१०.५००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
८	प्रभाग क्र.११ मधील उत्तम पवार घर ते विलास जाधव घर ते गणपती मंदिरापर्यंत आर.सी.सी.गटर करणे.	५,०२,५५०.००	प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर	-०.५०४% जादा दराने
			निखिल लालासो देसाई रा.इस्लामपूर	१.०००% जादा दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी	१.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर यांची -०.५०४% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
९	प्रभाग क्र.१२ मधील महादेव मंदिर ते वाकोबा मंदिरपर्यंत आर.सी.सी.गटर करणे.	११,५०,४२६.००	इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर	-१०.५००% कमी दराने
			ऋतुराज संजय जाधव रा.शिराळा	-१.५००% कमी दराने
			सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर	१.०००% जादा दराने
			विनायक कन्स्ट्रक्शन रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर यांची -१०.५००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
१०	प्रभाग क्र.१२ मधील सावंत घर ते अंबिका मंदिर पर्यंत रस्ता व आर.सी.सी. गटर करणे.	९,४३,५६२.००	इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर	-१०.५००% कमी दराने
			ऋतुराज संजय जाधव	-१.५००%

Scanned with OKEN Scanner

			रा.शिराळा	कमी दराने
			सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर	१.०००% जादा दराने
			विनायक कन्स्ट्रक्शन रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रजित विश्वासराव पाटील रा.कोपर्डी ता.करवीर, जि.कोल्हापूर यांची -१०.५००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
११	प्रभाग क्र.१२ मधील सूर्याजी पवार घर ते गणपती मंदीर ते इंगळे चिकन रस्ता डांबरीकरण करणे.	१५,४२,७६१.००	सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर	-१.०००% कमी दराने
			ऋतुराज संजय जाधव रा.शिराळा	२.०००% जादा दराने
			विनायक कन्स्ट्रक्शन रा.इस्लामपूर	२.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर यांची -१.०००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
१२	प्रभाग क्र.०९ मधील मार्केटयार्ड ऑफीस ते मार्केटयार्ड कमानीपर्यंत तसेच गायकवाड दुकान ते एम.डी.पवार मंगल कार्यालय ते पडवळे घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे.	३०,९३,५४२.००	रणजित दादासो पाटील रा.साखराळे	-२.०००% कमी दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी	०.५००% कमी दराने
			प्रतिक संभाजी देसाई रा.इस्लामपूर	१.०००% जादा दराने
अभिप्राय:— विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये रणजित दादासो पाटील रा.साखराळे यांची -२.०००% कमी दराची निविदा सर्वात कमीदराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १% पेक्षा जास्त व १०% पेक्षा कमी आहे अशा निविधारकाकडून १% प्रमाणे व ज्या निविदाधारका देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराचा आहे अशा निविदाधारकाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील मुद्दा क्र. ४.६.३ मध्ये नमूद केलेप्रमाणे निविदाधीन किंमतीच्या २% एवढया किंमतीची निविदाधारकाकडून बॅकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढया रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/राष्ट्रीयकृत/शेड्युल बॅकेची ठेव पावती घेवून योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

Scanned with OKEN Scanner

(१२७)

प्रशासकीय ठराव क्र.:- ५३८ **दि.२९ /02/2024**

सन २०२२-२३ करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-२/कावि-४६५/ एसआर-२४४/२०२३ दि.२०/१२/२०२३, अन्वये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांपैकी ११ कामासाठी व नागरी दलितेत्तर सुधारणा योजनेअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-२/कावि-४६५/ एसआर-२४३/२०२३ दि.२०/१२/२०२३, अन्वये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांपैकी ०१ कामासाठी अशा एकूण १२ कामांकरिता इकडील जा.क्र. इनपा कार्या-१२/निविदा सुचना/१२/२०२४ दिनांक ०१/०१/२०२४ अन्वये दि १७/०१/२०२४ रोजीपर्यंत रितसर ई-निविदा प्रणालीव्दारे मागविणेत आल्या असून उपरोक्त अहवालानुसार १२ कामांसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी निविदा समितीच्या अहवालाप्रमाणे उक्त नमुद सर्वांत कमी दराच्या निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या असलेने सदर निविदांना मंजूरी देणेत येत आहे.

ज्या कामाच्या निविदेचा दर निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १% पेक्षा जास्त/ कमी व १०% पर्यंत कमी दराच्या आहेत त्यांचेकडून सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील मुद्दा क्र. ४.६.२ मध्ये नमूद केलेप्रमाणे निविदाधीन किंमतीच्या १% एवढया किंमतीची नियमानुसार आवश्यक बॅकेची प्रतिपूर्ती हमी/तेवढया रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट/राष्ट्रीयकृत/शेड्युल बॅकेची ठेव पावती घेवून तसेच ज्या कामाच्या निविदेचा दर निविदाधीन किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने सादर केलेल्या निविदा मंजूरीबावत सदर शासन निर्णयानुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम घेणेत यावी. तसेच योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून पुढील सर्व कार्यवाही करणेस व नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम परत करणेस या ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामाची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

२९.२.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. ०४ सन २०१७-१८ करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर निधीतून करावयाच्या कामांच्या प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा मंजूर करणेबाबत.

==========

प्रस्तावना-

सन २०१७-१८ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर कामाची रितसर ई-निविदा मागविणेत आली असून सदर कामाच्या प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा मंजूर करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव –

सन २०१७-१८ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-१२/निविदा सुचना/३३८/२०२४ दिनांक २४/०१/२०२४ अन्वये दि ०२/०२/२०२४ रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक सकाळ या वृत्तपत्रातून दि.२५/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम ९३ चे पोट कलम (२) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
१	प्रभाग क्र. ०२ मधील ताकारी रोड ते निनाईनगर व मारुती मंदिर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. (उर्वरित काम)	२५,५६,५१५.००	१) बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रोप्रा.सुशांत शिंदे रा-कराड	-०.२००% कमी दराने
			२) शिव कन्स्ट्रक्शन, इस्लामपूर, प्रो.प्रा. सर्जेराव जाधव	अंदाजपत्रकीय दराने
			३) अक्षय रमेश पाटील रा-गोटखिंडी	१.०००% जादा दराने
अभिप्राय:– विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रोप्रा.सुशांत शिंदे रा-कराड यांची -०.२००% कमी दराची निविदा सर्वात कमी दराची आहे.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रोप्रा.सुशांत शिंदे रा-कराड यांची सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाचा योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

प्रशासकीय ठराव क्र.:- ५३९ **दि.** २९**/02/2024**

सन २०१७-१८ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, कार्यालय सांगली यांचेकडील आदेश क्र.नियोजन/का-१४- (१/२) नपइ/ प्र.मा.५३४/ २०१७ दि.२०/०२/२०१८ अन्वये मंजूर अनुदानामधून उपरोक्त कामकरिता रक्कम रु. ४६.३३ लक्ष निधी

Scanned with OKEN Scanner

मंजूर असून सदर कामापैकी शिल्लक रक्कम रु.२५,५६,५१५/- चे उर्वरित काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-१२/निविदा सुचना/३३८/२०२४ दिनांक २४/०१/२०२४ अन्वये दि ०२/०२/२०२४ रोजोपर्यंत रितसर ई-निविदा प्रणालीव्दारे मागविणेत आल्या असून उपरोक्त अहवालानुसार सदर कामांसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी निविदा समितीच्या अहवालाप्रमाणे उक्त नमुद सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या असलेने सदर निविदांना मंजूरी देणेत येत आहे.

तसेच योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून सदर कामाचा आदेश देवून पुढील सर्व योग्य ती कार्यवाही करणेस व नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम परत करणेस या ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामाची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

दि. २९, २, २०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. ०५ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मंजूर निधीतून करावायाच्या कामांना तांत्रिक मंजूरी मिळणेकामी सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत निर्णय घेणे.

==========

प्रस्तावना-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मंजूर शिल्लक निधीतून करावायाच्या कामांना तांत्रिक मंजूरी व प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता इस्लामपूर नगररिषदेस रक्कम रु. ३,६५,४०,०००/- इतके अनुदान मंजूर आहे. त्यामधून सन २०२२-२३ करिताची स्पिल रक्कम रु. ६६,८०,५६१/- वजा जाता रक्कम मरु. २,९८,५९,४३९/- इतके अनुदान शिल्लक राहत आहे. इस्लामपूर नगररिषद ही "ब" वर्ग नगरपरिषद असून सदर योजनेअंतर्गतचा वित्तीय आकृतीबंध हा शासन प्रकल्प हिस्सा ८५% व नगरपरिषद स्वहिस्सा १५% असा आहे. त्यानुसार सन २०२३-२४ करिता स्पिल वजा जाता शिल्लक शासन हिस्सा रक्कम रु. ५२,६९,३१३/- इतका असून नगरपरिषदेचा १५% प्रमाणे येणारा हिस्सा रक्कम रु. ५२,६९,३१३/- इतका असून एकूण रक्कम रु. ३,५१,२८,७५२/- इतके अनुदान उपलब्ध आहे. सदर अनुदानाच्या दिडपटीच्या मर्यादेत म्हणजेच रक्कम रु. ५,२६,९३,१२८/- (नगरपरिषद हिस्सा धरून) इतक्या रक्कमेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

अ) मंजूर नियतव्यय दिडपटीने रक्कम रु. ५,२६,९६,१२८/-

आ) प्राप्त प्रशासकीय मंजूरी आदेश दि. २८/०७/२०२३ ने रक्कम रु. १,५०,३५,०२३/- काम -१

इ) प्रशासकीय मंजूरी आदेश दि. २०/१२/२०२३ ने रक्कम रु. १,९२,५७,४१३/- कामे -११

ई) प्रशासकीय मान्यता प्राप्त एकूण रक्कम रु. ३,४२,९२,४३६/-

सन २०२३-२४ करिता नियतव्यय रक्कम रु. ५,२६,९३,१२८/- मधून वरीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्ताव रक्कम रु. ३,४२,९२,४३६ वजा जाता प्रशासकीय मान्यतेसाठी सदर करावयाच्या प्रस्तावाची शिल्लक रक्कम रु. १,८४,००,६९२/- इतकी राहत असून या रक्कमेतून विकास कामे प्राधान्याने निश्चित करणेबाबत प्रशासकीय ठरावान्वये मंजूरी घेवून प्रशासकीय मंजूरीकरिता मा.जिल्हाधिकारी, सांगली याचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याकरिता मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांचेकडून खालीलप्रमाणे १३ कामांना तांत्रिक मंजूरी मिळणेकामी इकडील जा.क्र. इनपा/कार्या-१२/६७४/२०२४ दि.२२/०२/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी मिळणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

अ.नं.	कामाचे नांव	अंदाजित रक्कम रू.
१.	प्रभाग क्र.०१ मधील राजेबागेश्वरनगर बाळू गुजर यांचे घराजवळील आर.सी.सी.गटर करणे.	७,३३,४२८/-
२.	प्रभाग क्र.०१ मधील राजेबागेश्वरनगर बाळू गुजर यांचे घराजवळील दक्षिण उत्तर रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे.	९,०१,४५५/-
३.	प्रभाग क्र.०१ मधील के.एन.पी.नगर रस्ता क्र.5 मधील उर्वरित रस्ते खडीकरण डांबरीकरण करणे.	९,९६,११०/-
४.	प्रभाग क्र.०२ मधील निनाईनगर येथील व्यायामशाळा समोरील गटर करणे.	१७,६५,६००/-

Scanned with OKEN Scanner

५.	प्रभाग क्र.०३ मधील भोसले कॉलनी येथील रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे.	६,२९,४७०/-
६.	प्रभाग क्र.०७ मधील प्रतिक पेट्रोल पंपाच्या दक्षिणेकडील मुजावर अपार्टमेंट जवळील रस्ता खडीकरण डांबरीकरण व गटर करणे.	१५,६१,४५४/-
७.	प्रभाग क्र.०७ मधील विनायकनगर मधील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.	१४,८१,५८१/-
८.	प्रभाग क्र.०९ मधील जावडेकर चौक ते बानेकर घर ते सरनोबत घर रस्ता डांबरीकरण करणे.	८,३२,८४३/-
९	प्रभाग क्र.११ मधील सिध्देश्वर मंदीर ते रिंगरोड खडीकरण डांबरीकरण करणे.	७,७२,९६०/-
१०.	प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता डांबरीकरण करणे.	२१,६४,९०९/-
११.	प्रभाग क्र.१३ मधील दत्तटेकडी गणेश मंदिर खांबे प्लॉट ते लाल बंगला रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे.	१८,८३,७११/-
१२	प्रभाग क्र.१४ मधील बिरोबानगर येथील गटर करणे.	९,९८,८८७/-
१३.	प्रभाग क्र.१४ मधील बिरोबानगर येथील क्रॉस ड्रेनेज वर्क व गटर करणे.	९,९८,१७६/-
	अ) एकूण रक्कम रु.	**१,५७,२०,५८४/-**
१४.	प्रभाग क्र. १४ मधील उरूणवाडी रस्ता डांबरीकरण करणे	७,०१,२९८/-
१५.	इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील सि.स.नं. ३९७१ मधील कोट तलाव सुशोभिकरण अंतर्गत इलेक्ट्रीफिकेशनचे काम करणे.	२१,०६,९३८/-
	ब) एकूण रक्कम रु.	**२८,०८,२३६/-**
	एकूण (अ+ ब) रक्कम रु.	**१,८५,२८,८२०/-**

वरीलप्रमाणे अं.क्र. १ ते १३ च्या रक्कम रु. १,५७,२०,५८४/- कामांना तांत्रिक मंजूरी घेऊन याव्यतिरिक्त यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांकडून तांत्रिक मंजूरी घेतलेल्या वरीलप्रमाणे अ.क्र. १३ व १४ च्या रक्कम रु. २८,०८,२३६/- च्या २ कामांचा समावेश महाराष्ट सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता करणेत यावा व एकूण १५ कामांसाठी रक्कम रु. १,८५,२८,८२०/- इतक्या रक्कमेचा प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता आवश्यक तो प्रस्ताव सादर करणेस मंजूरी मिळणेकरिता कार्यालयीन प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र.:- ५४० **दि.** २९/**02/2024**

सन २०२३-२४ करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअतंगत इस्लामपूर नगरपरिषदेस दीडपटीने रक्कम रु. ५,२६,९३,१२८/- मधून प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्ताव रक्कम रु. ३,४२,९२,४३६ वजा जाता प्रशासकीय मान्यतेसाठी शिल्लक रक्कम रु. १,८४,००,६९२/- या रक्कमेतून विकास कामे प्राधान्याने निश्चित करणेबाबत प्रशासकीय ठरावान्वये मंजूरी घेवून मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांचेकडून वरीलप्रमाणे १३ कामांना तांत्रिक मंजूरी मिळणेकामी इकडील जा.क्र. इनपा/कार्या-१२/६७४/२०२४ दि.२२/०२/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर प्रस्तावास या ठरावान्वये कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. तसेच सदरची तांत्रिक मंजूरी प्राप्त होताच वरीलप्रमाणे १३ कामे रक्कम रु. १,५७,२०,५८४/- व वरीलप्रमाणे प्रस्तावात नमूद अ.क्र. १४ व १५ या रक्कम रु. २८,०८,२३६/- च्या दोन कामांसह एकूण १५ कामांचा सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मंजूरीस्तव सादर

Scanned with OKEN Scanner

करणेस व त्यानुसार पुढील नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच सदर योजनेच्या निकषांनुसार शासन नगरविकास विभागाकडील निर्णय क्र.नगरो-२०१५/प्र.क्र.२३२/नवि-३३ दि.१६/०५/२०१६ नुसार सुधारणात्मक कार्यक्रम राबविण्याबाबतचे कार्यवाही सुरू आहे.

1)द्विनोंद लेखा पध्दतीचा अवलंब केलेला आहे.
2)नगरपरिषदेच्या कामाकाजाचे संगणकीकरण केले आहे.
3)मालमत्ता कर विषयक सुधारणा अंतर्गत चतुर्थ वार्षिक कर आकारणी केली आहे.
4)उपरोक्त आकार वसुली सबंधी कार्यवाही सुरू आहे.
5) नागरी क्षेत्रातील गरिबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षित निधीची तरतूद केली आहे.

वरीलप्रमाणे सुधारणा कार्यक्रम राबविण्याची कार्यवाही इस्लामपूर नगरपरिषदमार्फत सुरू असून त्यानुसार पुरक सुधार कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच करावयाच्या सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदर कामी खर्च सन २०२३-२०२४ या सालाकरिता अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

२८.२.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र.०६ - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा रंगकाम करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत प्राप्त निविदा मंजूरीबावत निर्णय घेणे.

प्रस्तावना-

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील तहसिलदार कार्यालयाजवळील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे रंगरंगोटीचे काम करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

विषय ०३:- सन २०२४-२०२५ या सालामधील शासन आपल्या दारी या शासनाकडील उपक्रमासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळोवेळी लागणा-या चहा नाष्टा जेवणाच्या निविदेमधील कमी दराची निविदा प्रसिध्द करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना -- सन २०२४-२०२५ या सालामधील शासन आपल्या दारी या शासनाकडील उपक्रमासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळोवेळी लागणा-या चहा नाष्टा जेवणाच्या निविदेमधील कमी दराची निविदा प्रसिध्द करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावः- महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०५/का-१४१४, दिनांक १३ एप्रिल २०२३ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने याही वर्षी शासन आपल्या दारी या योजनेची अंमलबजावणी करणेबाबत वरिष्ठ स्तरावरून आदेश प्राप्त झालेले आहेत.

त्याप्रमाणे मा.जिल्हाधिकारीसो, सांगली यांचेकडील सन २०२३-२०२४ मध्येही महाराष्ट्र शासन **मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष** **"शासन आपल्या दारी"** ***'योजना जनकल्याणकारी... सर्वसामान्यांच्या दारी !'*** या उपक्रमांची अंमलबजावणी करणेबाबत वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या व्हि.डी.ओ. कॉन्फरन्सींगमध्ये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने इस्लामपूर शहरामध्ये सदरचा उपक्रम आयोजित करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत. त्याप्रमाणे या उपक्रमांच्या विविध योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकामी विविध विभागाकडून होणारी कार्यवाही जाणून घेणे व त्याचा जनतेशी असणारा थेट संपर्क याची माहिती घेणेकामी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०८ मार्च २०२४ रोजी प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत.

त्याप्रमाणे नमूद दिनांकास सांगली जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील उपस्थित राहणा-या अधिकारी कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या चहा व नाष्टाकामी आपल्या नगरपरिषद इस्लामपूरने कार्यवाही करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार इस्लामपूर नगरपरिषदेच्या भांडार विभागाकडून आदेशाप्रमाणे दिनांक ०८/०३/२०२४ रोजी आणि या उपक्रमाकामी आवश्यक असणा-या यंत्रणा या अगोदरच्या दिनांकास उपस्थित राहाणार आहेत. त्यामुळे उपस्थितांना दिनांक ०७ व ०८/०३/२०२४ या दोन दिवशी चहा व नाष्टा व जेवण आदींची पूर्तता करणे अत्यंत आवश्यक व निकडीची बाब आहे. त्यामुळे नगरपरिषद इस्लामपूर स्तरावरून जाहीर निविदा सुचना फलकावरती इकडील जा.क्र.इनपा/कार्या-१०/प्र.क्र.६४०/२०२४, दिनांक २०/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे खालील विवरणाप्रमाणे तीन दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	नाष्टा (चहा, पोहे, शिरा, उपीट)	जेवण (चपाती, पुलाव, भाजी, कोशिंबीर)	जेवण (पुलाव, भाजी, कोशिंबीर)
०१	नाना केटर्स, इस्लामपूर	५०/-	१२०/-	९०/-
०२	मातोश्री केटर्स, इस्लामपूर	६०/-	१३५/-	११५/-
०३	कृष्णप्रभा केटर्स, इस्लामपूर	५५/-	१३०/-	१००/-

Scanned with OKEN Scanner

वरील तुलनात्मक तक्त्याचा विचार करता नाना केटरर्स, इस्लामपूर यांचे दर सर्वांत कमीचे आहेत. त्यामुळे संबंधितांना कामाचे कार्यादेश देणेत आलेले आहेत.

मात्र, सदरची बाब अत्यंत निकडीची तात्काळ तसेच कमी कालावधी असणारी असल्याने याकामी प्रशासकीय ठरावान्वये निविदा प्रक्रिया राबविणेबाबत पूर्व मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे राबविण्यात आलेल्या चहा, नाष्टा व जेवण पुरविणे कामाच्या प्रसिध्द करून केलेल्या कार्यवाहीस प्रशासकीय ठरावान्वये कार्योत्तर मंजूरी घेणे अत्यंत आवश्यक व उचित वाटते.

त्यामुळे प्रशासनाने सदरचा प्रस्ताव कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामी सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५५५ **दिनांक : ०४/०३/२०२४**

उक्त प्रस्तावनेमध्ये नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र शासन स्तरावरील आदेशाप्रमाणे अत्यंत निकडीची व कमी कालावधी असणारी असल्याने राबविण्यात आलेल्या जाहीर निविदा प्रक्रियेस कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. तसेच संबंधित निविदाधारकास देयक अदा करण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३३७ मधील तरतूदीप्रमाणे मे.नाना केटरर्स, इस्लामपूर यांचे न्यूनतम दरास कार्योत्तर मंजूरी देणे व निविदाधारकाचे देयक अदा करण्याच्या कार्यवाहीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	नाष्टा (चहा, पोहे, शिरा, उपीट)	जेवण (चपाती, पुलाव, भाजी, कोशिंबीर)	जेवण (पुलाव, भाजी, कोशिंबीर)
०१	नाना केटरर्स, इस्लामपूर	५०/-	१२०/-	९०/-

सदर कामीचा खर्च सन २०२३-२०२४ या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे,

४.३.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र.०४ वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत रक्कम रु.३.०० कोटी निधीतून करावयाच्या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास नाहरकत प्रमाणपत्र हमीपत्र देणेबाबत.

==========

प्रस्तावना -

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांनी वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत रक्कम रु.३.०० कोटी कामांचे नाहरकत प्रमाणपत्र मागणी केली असून सदर कामांचे नाहरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

नगरविकास शासन निर्णय क्र.नपावै-२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.२१ नोव्हेंबर २०२२ व नगरविकास शासन निर्णय क्र.नपा.२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.०१ जून २०२३ अन्वये वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील रस्ते, गटर्स करणे व सोई सुविधा पुरविणे या कामांसाठी रक्कम रू.३.०० कोटी मंजूर निधीतून कामे करणेसाठी मा.सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.सा.बां.उविइपूर/४६४अ/२०२४ दि.१५/०२/२०२४ चे पत्रान्वये नगरपरिषदेकडील सदर कामांचे दुरूस्ती देखभालीचे हमीपत्र मागणी केली आहे. सदर कामांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाची नावे	कामांची अंदाजित रू.(लाखात)
१.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये इस्लामपूर न्यायालय ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे.	३४.००
२.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये इस्लामपूर न्यायालय ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे आर.सी.सी.गटर करणे.	१२.००
३.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये बी.एस.एन.एल.कार्यालय ते विद्यामंदिर हायस्कूल येथील येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे.	१६.००
४.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये गणपती मंदिर ते हत्ती तलावापर्यंत आर.सी.सी.गटरची बांधकाम करणे.	३४.००
५.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये शिवम अपार्टमेंट लगत व वॉर्ड क्र.०२ मध्ये के.एन.पी.नगर रस्ता क्र.६ ते विसावा हॉटेलपर्यंत आर.सी.सी.गटर करणे.	२४.००
६.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये पंडित पवार घर ते माटेकर घर, बाळासाहेब जाधव घर ते रिंगरोड व वॉर्ड क्र.०४ मधील भालेकर घर ते मुंडे घर आर.सी.सी.गटर करणे व वॉर्ड क्र.०६ मध्ये आबा निकम घर ते पलुसकर घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	२५.००
७.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१४ मध्ये रूपेश चव्हाण घर ते संत सेवालाल महाराज मंदिर व संत सेवालाल महाराज मंदिर ते उरूणवाडी रस्ता व बापू राठोड घर ते रघु चव्हाण	३४.००

Scanned with OKEN Scanner

	घर आर.सी.सी.गटर करणे.	
८.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०६ मध्ये सुर्यवंशी घर ते बिरमोळे घर ते वॉर्ड क्र.०२ मध्ये उत्तम पाटील घर ते रा.मा.क्र.१५० रस्ता आर.सी.सी.गटर करणे.	२४.००
९.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये रविंद्र साळुंखे घर ते निवास काळुगडे घर ते बेघर वसाहतजवळ व कापूसखेड नाका ते आर.आय.टी. नर्सिंग कॉलेज मागील रस्ता आर.सी.सी.गटर करणे	३६.००
१०.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये विठ्ठल मंदिर ते सैदेखान वाडा रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५.००
११.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये संभाजी केंडे घर ते राजेंद्र शिंदे घर आर.सी.सी.गटर करणे.	१७.००
१२.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.११ मध्ये साळुंखे मॅडम घर ते कामेरी रस्ता आर.सी.सी.गटर व पेव्हींग ब्लॉक बसविणे.	१७.००

वरीलप्रमाणे सदर पत्रातील अ.क्र.१ ते ३ ची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील रस्त्यांच्या ठिकाणी प्रस्तावित आहेत. त्यामुळे इस्लामपूर नगरपरिषदेकडून सदर तीन कामांचे नाहरकत प्रमाणपत्र देता येणार नाही. तसेच उर्वरित पत्रातील अ.क्र.४ ते १२ कामांचे नाहरकत प्रमाणपत्र खालील विहीत अटीस अधिन राहून इस्लामपूर नगरपरिषदेने जा.क्र.इनपा/कार्या-१२/८१९/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये मा.सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांना दिलेले आहे. त्यामधील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) या ठरावान्वये नाहरकत प्रमाणपत्र दिलेली अ.क्र.४ ते १२ ची कामे ही शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेतून यापूर्वी मंजूर अगर पूर्ण झालेली नाहीत अगर कामे दुबार होणार नाहीत याची खातरजमा संबंधित कार्यान्वयन यंत्रणेने करावी.

२) वरीलप्रमाणे अ.क्र.४ ते १२ ची कामे ही इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील असून ती सार्वजनिक वापरातील आहेत.

३) वरील प्रकल्पाअंतर्गतची कामे ही करणेसाठी कार्यान्वयन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग ही आहे. सदर कामे सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी प्रस्तावित केलेली आहेत. कामाचे स्वरूप हे सार्वजनिक आहे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधामध्ये भर पडणार आहे. कुठल्याही खाजगी स्वरूपाची कामे प्रस्तावित केलेली नाहीत. याची खातरजमा संबंधित कार्यान्वयन यंत्रणेने करावी.

४) सदर कामांची कार्यान्वयन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग असल्याने त्यांचेकडून ई-निविदा कार्य पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील. ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येईल. सर्व कामे ई निविदा पध्दतीने करणे आवश्यक राहील.

५) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उदिष्टासाठी खर्च करणे व कामे गुणवत्तेनुसार करणेची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

६) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांवर करण्यात येणाऱ्या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत घेणेत यावी.

७) सदरची कामे ही कायान्वयीन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग असल्याने निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमाचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करणेत येईल याची दक्षता त्यांनी घेणे आवश्यक आहे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिका-यांच्या मर्यादेत (FINACLAL POWER) भंग होणार नाही तसेच कुठलाही शासन नियम अधिकाराचा भंग होणार नाही याची दक्षता घेत सार्वजनिक बांधकाम विभाग घेईल.

Scanned with OKEN Scanner

८) सध्या सुरू असलेल्या पाणी पुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्याचे उत्खनन होणार नाही अशा प्रकारची कामाचे नियाजन करणे, प्रस्तावित रस्त्याच्या ठिकाणावरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झालेनंतर सदर रस्त्याची कामे होतील यांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

९) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणी पुरवठा व मलनिस्सरणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या रस्त्याचे उत्खनन होऊन निधीचा उपव्यय होणार नाही याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभाग घेईल.

१०) अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिक्षणाची कामे हाती घेणेत आलेली नाहीत.

ब) सदर प्रकल्पाअंतर्गत कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामांचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

क) सदर प्रकल्पाअंतर्गत कामाचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

११) वरील अटी / शर्तीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचे हमीपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावित केलेली कामे वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेबाबतची खातरजमा सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून करून सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेस आवश्यक तो प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेली कामे ही शासन स्तरावरून निश्चित करणेत आलेली नाहीत. त्यामुळे योजनेच्या निकषानुसार सदर प्रस्तावाचे कामी इस्लामपूर नगरपरिषदेकडील ठराव सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर कामे पूर्ण झालेनंतर काम पूर्णत्वाच्या दाखल्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे हस्तांतरणाचा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील दुरूस्ती व देखभालीसाठी सदर नाहरकत दाखला / हमीपत्र दिलेली कामे इस्लामपूर नगरपरिषदेकडे हस्तांतरण करून घेणेबाबत नियमानुसार करावयाच्या सर्व कार्यवाहीसुध्दा ठरावाने मान्यता घेणे आवश्यक आहे. असा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

प्रशासकीय ठराव क्र -५५६ दि. ०४/०३/२०२४

नगरविकास शासन निर्णय क्र.नपावै-२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.२१ नोव्हेंबर २०२२ व नगरविकास शासन निर्णय क्र.नपा.२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.०१ जून २०२३ अन्वये वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील रस्ते, गटर्स करणे व सोई सुविधा पुरविणे या कामांसाठी रक्कम रू.३.०० कोटी मंजूर निधीतून कामे करणेसाठी मा.सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.मा.बां.उविइपूर/४६४अ/२०२४ दि.१५/०२/२०२४ चे पत्रान्वये नगरपरिषदेकडील कामांचे दुरूस्ती देखभालीचे हमीपत्र मागणी केली आहे.

वरीलप्रमाणे सदर पत्रातील अ.क्र.१ ते ३ ची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील रस्त्यांच्या ठिकाणी प्रस्तावित आहेत. त्यामुळे इस्लामपूर नगरपरिषदेकडून सदर तीन कामांचे नाहरकत प्रमाणपत्र देता येणार नाही. तसेच पत्रातील उर्वरित अ.क्र.४ ते १२ कामांचे नाहरकत प्रमाणपत्र खालील विहीत अटीस अधिन राहून इस्लामपूर नगरपरिषदेने जा.क्र.इनपा/कार्या-१२/८१९/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये मा.सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांना दिलेले आहे. त्यातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) या ठरावान्वये नाहरकत प्रमाणपत्र दिलेली अ.क्र.४ ते १२ ची कामे ही शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेतून यापूर्वी मंजूर अगर पूर्ण झालेली नाहीत अगर कामे दुबार होणार नाहीत याची खातरजमा संबंधित कार्यान्वयन यंत्रणेने करावी.

Scanned with OKEN Scanner

२) वरीलप्रमाणे अ.क्र.४ ते १२ ची कामे ही इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील असून ती सार्वजनिक वापरातील आहेत.

३) वरील प्रकल्पाअंतर्गतची कामे ही करणेसाठी कार्यान्वयन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग ही आहे. सदर कामे सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी प्रस्तावित केलेली आहेत. कामाचे स्वरूप हे सार्वजनिक आहे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधामध्ये भर पडणार आहे. कुठल्याही खाजगी स्वरूपाची कामे प्रस्तावित केलेली नाहीत. याची खातरजमा संबंधित कार्यान्वयन यंत्रणेने करावी.

४) सदर कामांची कायान्वयीन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग असल्याने त्यांचेकडून ई-निविदा कार्य पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील. ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येईल. सर्व कामे ई निविदा पध्दतीने करणे आवश्यक राहील.

५) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उदिष्टासाठी खर्च करणे व कामे गुणवत्तेनुसार करणेची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

६) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांवर करण्यात येणाऱ्या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत घेणेत यावी.

७) सदरची कामे ही कार्यान्वयन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग असल्यांन निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करणेत येईल याची दक्षता त्यांनी घेणे आवश्यक आहे. निधी खर्च करण्यातबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सुचनांचा व वित्तीय अधिका-यांच्या मर्यादेत (FINACLAL POWER) भंग होणार नाही तसेच कुठलाही शासन नियम अधिकाराचा भंग होणार नाही याची दक्षता घेत सार्वजनिक बांधकाम विभाग घेईल.

८) सध्या सुरू असलेल्या पाणी पुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्याचे उत्खनन होणार नाही अशा प्रकारची कामाचे नियाजन करणे, प्रस्तावित रस्त्याच्या ठिकाणावरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झालेनंतर सदर रस्त्याची कामे होतील यांची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

९) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणी पुरवठा व मलनिस्सरणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या रस्त्याचे उत्खनन होऊन निधीचा उपव्यय होणार नाही याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभाग घेईल.

१०) अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिक्षणाची कामे हाती घेणेत आलेली नाहीत.

ब) सदर प्रकल्पाअंतर्गत कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामांचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

क) सदर प्रकल्पाअंतर्गत कामाचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

११) वरील अटी / शर्तीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचे हमीपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावित केलेली कामे वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेबाबतची खातरजमा सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून करून सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेस आवश्यक तो प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेली कामे ही शासन स्तरावरून निश्चित करणेत आलेली नाहीत. त्यामुळे योजनेच्या निकषानुसार सदर प्रस्तावाचे कामी इस्लामपूर नगरपरिषदेकडील ठराव सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरचा ठराव करणेत येत आहे. तसेच सदर कामे पूर्ण झालेनंतर काम पूर्णत्वाच्या दाखल्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे हस्तांतरणाचा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील दुरूस्ती व देखभालीसाठी सदर ताहरकत दाखला / हमीपत्र दिलेली कामे इस्लामपूर नगरपरिषदेकडे हस्तांतरण करून घेणेत यावीत. त्याकरिता नियमानुसार करावयाच्या सर्व कार्यवाहीसुध्दा या ठरावाने मान्यता देणेत येत आहे.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये मी राहुल सर्जेराव मर्डेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

- ४.३.२०२१

(राहुल मर्डेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

१७९

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली.

प्रशासकीय ठराव

विषय ०५ - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कचरा डेपो येथे कंपोस्ट पीटचे बांधकाम करणेबाबत.

प्रस्तावना -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र येथे शहरातील ओल्या कच-यापसून खत निर्मिती करणेकामी ओला कच-यावर शास्त्रोवत पध्दतीने प्रक्रिया करणे व ओल्या कच-याचा निपटारा होईल त्या अनुषंगाने त्याठिकाणी पक्या विटाचे पीट बांधकाम करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र येथे शहरातील ओल्या कच-यापसून खत निर्मिती करणेकामी ओला कच-यावर शास्त्रोवत पध्दतीने प्रक्रिया करणे व ओल्या कच-याचा निपटारा होईल त्या अनुषंगाने त्याठिकाणी पक्या विटाचे पीट बांधकाम करणे आवश्यक आहे असा आरोग्य विभाग प्रमुख इस्लामपूर नगरपरिषद यांनी दि.१७/०१/२०२३ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी पक्या विटाचे पीट बांधकाम करणे आवश्यक आहे. सदरचे काम करणेकामी अंदाजित रक्कम रू.९,९९,९९५/- (अक्षरी नऊ लाख नव्यानव्व हजार नवशे पंच्यानव्व रूपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर काम नगरपरिषद निधीतून करणेस व कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणेकरिता कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५५७ दिनांक -०४/०३/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची व कामाची गरज व निकड यांची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्डेकर प्रशासक, वरील कार्यालयीन अहवालाचे अवलोकन करून इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र येथे शहरातील ओल्या कच-यापासून खत निर्मिती करणेकामी ओला कच-यावर शास्त्रोवत पध्दतीने प्रक्रिया करणे व ओल्या कच-याचा निपटारा होईल त्या अनुषंगाने त्याठिकाणी पक्या विटाचे पीट बांधकाम करणे आवश्यक आहे असा आरोग्य विभाग प्रमुख इस्लामपूर नगरपरिषद यांनी दि.१७/०१/२०२३ रोजी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी पक्या विटाचे पीट बांधकाम करणे आवश्यक आहे. सदरचे काम करणेकामी अंदाजित रक्कम रू.९,९९,९९५/- (अक्षरी नऊ लाख नव्यानव्व हजार नवशे पंच्यानव्व रूपये मात्र) इतका खर्च असून त्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी मिळणेकरिता इस्लामपूर नगरपरिषदेकडील जा.क्र.इनपा/कार्या-१२/८२०/२०२४ दि.२७/०२/२०२४ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यास कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. तांत्रिक मंजूरी प्राप्त होताच सदर काम नागरीकांच्या आरोग्याविषयी व स्वच्छतेविषयी महत्वाचे असल्याने ते तातडीने करून घेणे आवश्यक आहे. तरी त्यानुसार तांत्रिक मंजूरीअंती रितसर निविदा मागवून सदर काम पूर्ण करून घेणेस व त्याकरिता येणारा खर्चास या ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेत येत आहे.

४.३.२०२४

(राहुल मर्डेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली.

प्रशासकीय ठराव

विषय०६- इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कचरा डेपो येथे विंड्रो कंपोस्टींग प्लॅटफॉर्म तसेच जुन्या कंपोस्टींग पीटसाठी नवीन शेडचे बांधकाम करणेबाबत.

प्रस्तावना -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) योजनेअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र येथे विविध कामे करणेत आली आहेत. तथापि, विंड्रो कंपोस्टींगसाठी ६० मी. x १० मी. चा प्लॅटफॉर्म तसेच नवीन शेड तयार करून घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) योजनेअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र येथे विविध कामे करणेत आली आहेत. तथापि, विंड्रो कंपोस्टींगसाठी ६० मी. x १० मी. चा प्लॅटफॉर्म व येथे नवीन शेड तयार करून घेणे गरजेचे आहे. जेणेकरून ओल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी पुरेसे क्षेत्र उपलब्ध होईल त्याबाबत आरोग्य विभाग प्रमुख यांचेकडून दि.२९/०२/२०२३ रोजी अहवाल सादर केला आहे. त्या अनुषंगाने त्याठिकाणी ६० मी. x १० मी. इतक्या क्षेत्रात आर.सी.सी. प्लॅटॉफॉर्म करणे आवश्यक आहे. तसेच जुन्या पीटच्या ठिकाणी शेड बांधणे आवश्यक आहे. तरी सदरचे कामे करणेकामी अनुक्रमे प्रत्येकी अंदाजे रक्कम रू.९,४४,४३५/- व रक्कम रू.९,७३,१४२/- इतका खर्च अपेक्षित असून त्या दोन कामांची सविस्तर अंदाजपत्रके बांधकाम विभागाकडून सादर केली आहे. तरी सदर कामे नगरपरिषद निधीतून करणेस व कामांचे सविस्तर अंदाजपत्रकांस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून तांत्रिक मंजूरी मिळणेस इस्लामपूर नगरपरिषदेकडून प्रस्ताव सादर केला आहे. त्यास कार्योत्तर मंजूरी मिळणेकरिता प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५५८ दिनांक -०४/०३/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची व कामाची गरज व निकड यांची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, वरील कार्यालयीन अहवालाचे अवलोकन करून इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) योजनेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र येथे विविध कामे करणेत आली आहेत. तथापि, विंड्रो कंपोस्टींगसाठी ६० मी. x १० मी. चा प्लॅटफॉर्म व जुन्या पीटचे ठिकाणी नवीन शेड तयार करून घेणे गरजेचे आहे. जेणेकरून ओल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी पुरेसे क्षेत्र उपलब्ध होईल त्याबाबत आरोग्य विभाग प्रमुख यांनी दि.२९/०२/२०२३ रोजी अहवाल सादर केला आहे. त्या अनुषंगाने त्याठिकाणी ६० मी. x १० मी. इतक्या क्षेत्रात आर.सी.सी. प्लॅटॉफॉर्म करणे आवश्यक आहे. तसेच जुन्या पीटच्या ठिकाणी नवीन शेड बांधणे आवश्यक आहे. तरी सदरचे कामे करणेकामी अनुक्रमे प्रत्येकी अंदाजे रक्कम रू.९,४४,४३५/- व रक्कम रू.९,७३,१४२/- इतका खर्च अपेक्षित असून सदर कामे आरोग्यविषयक व महत्वाची असलेने नगरपरिषद निधीतून करणेस मंजूरी देणेत येत आहे.

सदर कामांच्या अंदाजपत्रकास मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून तांत्रिक मंजूरी मिळणेस यापूर्वी इस्लामपूर नगरपरिषदेकडून प्रस्ताव सादर केला आहे. त्यास कार्योत्तर मंजूरी देणेत येत आहे. तांत्रिक मंजूरीअंती रितसर निविदा मागवून कामे पूर्ण करून घेणेबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करणेस व त्याकरिता येणारा खर्च नगरपरिषद निधीतून करणेस या ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेत येत आहे.

४.३.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय ०५ - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील महादेवनगर येथील रस्ता डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणेबाबत

प्रस्तावना-

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील महादेवनगर येथील रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील महादेवनगर येथील प्रभाग क्र.०१ मधील कुसुमगंध उद्यानसमोरील रस्ता डांबरीकरणाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करणेत आले असून त्यापैकी पुढील भागातील उर्वरित रस्ता डांबरीकरण करणेबाबत तेथील नागरिकांकडून मागणी होत आहे. त्या परिसरातील सर्व नागरिकांची रस्त्यामुळे गैरसोय होत असून पावसाळयामध्ये पावसाचे पाणी साचून राहिलेने तेथील रस्ता अत्यंत खराब होवून खड्डे पडलेले आहेत. तरी महादेवनगर प्रभाग क्र.०१ मधील कुसुमगंध उद्यानसमोरील उर्वरित रस्ता डांबरीकरण करणेत यावा अशी तेथील नागरिकांची मागणी आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता महादेवनगर कुसुमगंध उद्यानसमोरील रस्ता डांबरीकरणाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आले असून त्यापैकी पुढील भागातील उर्वरित रस्ता हा अत्यंत खराब झालेला असून त्या रस्त्यालगत इस्लामपूर शहरातील नगरपरिषदेचे कुसुमगंध उद्यान आहे. त्याठिकाणी नागरिकांची व वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे महादेवनगर येथील रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक असून त्याकरिता रक्कम रू. ४,९७,०६८/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तसेच सदरचे काम नगरपरिषद निधीतून किंवा शासनाकडील अन्य निधीतून करणे आवश्यक आहे. तरी कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी कार्यालयीन प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५५९ दिनांक - ०४/०३/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वरील अहवालाचे अवलोकन करुन इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील महादेवनगर येथील प्रभाग क्र.०१ मधील कुसुमगंध उद्यानसमोरील रस्ता डांबरीकरणाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करणेत आले असून त्यापैकी पुढील भागातील उर्वरित रस्ता डांबरीकरण करणेबाबत तेथील नागरिकांकडून मागणी होत आहे. त्या परिसरातील सर्व नागरिकांची रस्त्यामुळे गैरसोय होत असून पावसाळयामध्ये पावसाचे पाणी साचून राहिलेने तेथील रस्ता अत्यंत खराब होवून खड्डे पडलेले आहेत. तरी महादेवनगर येथील रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक आहे. त्याकरिता अंदाजे रक्कम रू.४,९७,०६८/- च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

Scanned with OKEN Scanner

तसेच सदरकामी येणारा खर्च नगरपरिषद निधीतून करण्यात यावा. सदर कामाची रितसर निविदा मागवून सदर काम पूर्ण करुन घेणेबाबत पुढील कार्यवाही करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक नगरअभियंता, इस्लामपूर नगरपरिषद यांनी तयार केले असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता नियम २०१३ चे नियम १२४ नुसार 'ब' वर्ग नगरपरिषदेच्या नगरअभियंत्यास रक्कम रू.५.०० लाख पर्यंतचा अंदाजित रक्कमेच्या कामांना तांत्रिक मंजूरी देणेचे अधिकार आहेत. त्यानुसार नगरअभियंता इस्लामपूर नगरपरिषद यांचेकडून आवश्यक ती तांत्रिक मंजूरी घेवून सदरचे काम तातडीची गरज लक्षात घेवून नगरपरिषद निधीतून करणेस या ठरावाव्दारे मंजूरी देणेत येत आहे. त्याकरिता येणा-या सर्व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेत येत आहे.

०३.२०१८

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र.१ वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत रक्कम रु.३.०० कोटी निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावयाच्या कामांना मान्यता देणेबाबत.

==========

प्रस्तावना -

सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.सा.बां.उविइपूर/४६४अ/२०२४ दि.१५/०२/२०२४ चे पत्रान्वये इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कामांकरिता वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत रक्कम रु.३.०० कोटी मंजूर अनुदानातून करावयाच्या कामांची यादी जोडून मान्यता मिळणेबाबत कळविले आहे.

प्रस्ताव -

नगरविकास शासन निर्णय क्र.नपावै-२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.२१ नोव्हेंबर २०२२ व नगरविकास शासन निर्णय क्र.नपा.२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.०१ जून २०२३ अन्वये वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील रस्ते, गटर्स करणे व सोई सुविधा पुरविणे या कामांसाठी रक्कम रू.३.०० कोटी निधी मंजूर आहे. सहाय्यक कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांचेकडील पत्र क्र.जा.क्र. सा.बां.उविइपूर/४६४अ/२०२४ दि.१५/०२/२०२४ चे पत्रान्वये खालील कामे उपरोक्त निधीतून करणेस नगरपरिषदेच्या ठरावाची मागणी केली आहे. सदर कामांचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाची नावे	कामांची अंदाजित रू.(लाखात)
१.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये इस्लामपूर न्यायालय ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे.	३४.००
२.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये इस्लामपूर न्यायालय ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे आर.सी.सी.गटर करणे.	१२.००
३.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये वी.एस.एन.एल.कार्यालय ते विद्यामंदिर हायस्कूल येथील येथील पेव्हींग ब्लॉक बसविणे.	१६.००
४.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये गणपती मंदिर ते हत्ती तलावापर्यंत आर.सी.सी.गटरची बांधकाम करणे.	३४.००
५.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये शिवम अपार्टमेंट लगत व वॉर्ड क्र.०२ मध्ये के.एन.पी.नगर रस्ता क्र.६ ते विसावा हॉटेलपर्यंत आर.सी.सी.गटर करणे.	२४.००
६.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१० मध्ये पंडित पवार घर ते माटेकर घर, बाळासाहेब जाधव घर ते रिंगरोड व वॉर्ड क्र.०४ मधील भालेकर घर ते मुंडे घर आर.सी.सी.गटर करणे व वॉर्ड क्र.०६ मध्ये आबा निकम घर ते पलूसकर घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.	२७.००
७.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.१४ मध्ये रूपेश चव्हाण घर ते संत सेवालाल महाराज मंदिर व संत सेवालाल महाराज मंदिर ते उरूणवाडी रस्ता व बापू राठोड घर ते रघु चव्हाण घर आर.सी.सी.गटर करणे.	३४.००

Scanned with OKEN Scanner

८.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०६ मध्ये सुर्यवंशी घर ते बिरमोळे घर ते वॉर्ड क्र.०२ मध्ये उत्तम पाटील घर ते रा.मा.क्र.१५० रस्ता आर.सी.सी.गटर करणे.	२४.००
९.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये रविंद्र साळुंखे घर ते निवास काळुगडे घर ते बेघर वसाहतजवळ व कापूसखेड नाका ते आर.आय.टी. नर्सिंग कॉलेज मागील रस्ता आर.सी.सी.गटर करणे	३६.००
१०.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये विठ्ठल मंदिर ते सैदेखान वाडा रस्ता कॉक्रीटीकरण करणे.	२५.००
११.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.०४ मध्ये संभाजी केंडे घर ते राजेंद्र शिंदे घर आर.सी.सी.गटर करणे.	१७.००
१२.	इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली येथील वॉर्ड नं.११ मध्ये साळुंखे मॅडम घर ते कामेरी रस्ता आर.सी.सी.गटर व पेव्हींग ब्लॉक बसविणे.	१७.००

सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेली कामे ही शासन स्तरावरून निश्चित करणेत आलेली नाहीत. त्यामुळे योजनेच्या निकषानुसार सदर कामांना मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी इस्लामपूर नगरपरिषदेकडील ठराव सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर पत्रातील अ.क्र.१ ते ३ ची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील रस्त्यांच्या ठिकाणी प्रस्तावित आहेत. ती वगळून उर्वरित अ.क्र.४ ते १२ ची कामे करणेकरिता मंजूरी देणेस कार्यालयीन अहवाल आहे.

प्रशासकीय ठराव क्र - ५६० दि. १३/०३/२०२४

नगरविकास शासन निर्णय क्र.नपावै-२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.२१ नोव्हेंबर २०२२ व नगरविकास शासन निर्णय क्र.नपा.२०२२/प्र.क्र.४२२(ब)/न.वि.१६ दि.०१ जून २०२३ अन्वये वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील रस्ते, गटर्स करणे व सोई सुविधा पुरविणे या कामांसाठी रक्कम रू.३.०० कोटी मंजूर निधीतून कामे करणेसाठी सहाय्यक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इस्लामपूर यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.सा.बां.उविइपूर/४६४अ/२०२४ दि.१५/०२/२०२४ चे पत्रान्वये नगरपरिषदेकडील ठरावाची मागणी केली आहे.

त्यानुसार वरीलप्रमाणे प्रस्तावित अ.क्र.१ ते ३ ची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील रस्त्यांच्या ठिकाणी प्रस्तावित आहेत. ती वगळून उर्वरित अ.क्र.४ ते १२ कामे सदर निधीतून करणेस या ठरावाव्दारे मान्यता देणेत येत आहे.

सदर कामे पूर्ण झालेनंतर काम पूर्णत्वाच्या दाखल्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे हस्तांतरणाचा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील दुरूस्ती व देखभालीसाठी सदर नाहरकत दाखला / हमीपत्र दिलेली कामे इस्लामपूर नगरपरिषदेकडे हस्तांतरण करून घेणेत यावीत. त्याकरिता नियमानुसार करावयाच्या सर्व कार्यवाहीसुध्दा या ठरावाने मान्यता देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये मी राहुल सर्जेराव मर्डेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१३.३.२०२४

(राहुल मर्डेकर)

प्रशासक

इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव ,

विषय ०२: वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर निधीतून प्रभाग क्र.०४ मध्ये गटर व रस्ते कॉक्रीटीकरण करणेबाबत कामांची निवड निश्चित करणे.

==========

प्रस्तावना: वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र.नपावै-2023/प्र.क्र.87 (क-76/नवि-16, दिनांक 13/09/2023 अन्वये रक्कम रु.2.00 कोटी एवढा निधी मंजूर असून सदर शासन निर्णययातील अ.क्र. 02 चे काम प्रभाग क्र.04 मधील गटर व रस्ते करणेकामी रक्कम रु.1.00 कोटी निधी मंजूर झाला आहे. सदर प्रभागातील कामाची निवड निश्चिती करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र. नपावै-2023/प्र.क्र.87 (क-76/नवि-16, दिनांक 13/09/2023 अन्वये रक्कम रु.2.00 कोटी एवढा निधी मंजूर असून सदर शासन निर्णययातील अ.क्र.02 चे काम प्रभाग क्र.04 मधील गटर व रस्ते करणेकामी रक्कम रु.1.00 कोटी निधी मंजूर झाला आहे. सदर प्रभागातील कामाची निवड निश्चिती करणे आवश्यक आहे.

सदर योजनेअंतर्गत कामाची निवड निश्चिती करणेकामी मा.आनंदराव पवार (बापू) शिवसेना जिल्हा प्रमुख सांगली यांनी दि.15/01/2024 इकडे प्राप्त दिनांक 19/01/2024 रोजीच्या पत्रान्वये प्रभाग क्र.04 मधील सुचवलेली कामे खालीलप्रमाणे

अ.नं.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग क्र.०४ मधील हनुमाननगर झेंडा चौक दक्षिण बाजूस जाणारा रस्ता मुरूमीकरण खडीकरण करणे.	रू.३३,५७,२३८/-
२.	प्रभाग क्र.०४ मधील हनुमाननगर झेंडा चौक परिसरातील आर.सी.सी. गटर करणे.	रू.५५,८०,९६९/-
३.	प्रभाग क्र.०४ मधील हनुमाननगर झेंडा चौक परिसरातील उर्वरित बोळ कॉक्रीट करणे व आर.सी.सी.गटर करणे.	रू.१४,९३,६२३/-
	एकूण	१,०४,३१,८३०/-

वरीलप्रमाणे सुचविणेत आलेली कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे नगरपरिषद पॅनेलवरील वास्तूविशारद यांचेकडून तयार करुन घेणेत आली असून त्यास मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक मंजूरी घेणेत आलेली आहे. सदरची कामे इस्लामपूर नगरपरिषद मा.प्रशासक ठराव क्र.५२१ दि.२५/०१/२०२४ च्या ठरावाच्या अनुषंगाने तयार करणेत आली आहेत. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सदर कामांना प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत यापूर्वी दि.०६/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. तथापि, सदर प्रस्तावातील कामांचे नांवातील तपशिल व यापूर्वी ठराव क्र.५२१ दि.२५/०१/२०२४ मधील नमुद नांवातील तपशिल यामध्ये काही बदल असलेने सदरचा सुधारित ठराव मंजूर तांत्रिक मंजूरीप्रमाणे कामांचा प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सदरचा ठराव करणेत येत आहे. त्यानुसार पुढील रितसर योग्य ती कार्यवाही करणेकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५६१ **दिनांक :** १३/०३/२०२४

वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र.नपावै-2023/प्र.क्र87 (क-76/नवि-16, दिनांक 13/09/2023 अन्वये रक्कम रु.2.00 कोटी एवढा निधी मंजूर असून सदर शासन निर्णययातील अ.क्र.02 चे काम प्रभाग क्र.04 मधील गटर व रस्ते करणेकामी रक्कम रु.1.00 कोटी निधी मंजूर झाला आहे.

सदर योजनेअंतर्गत कामाची निवड निश्चिती करणेकामी मा.आनंदराव पवार (बापू) शिवसेना जिल्हा प्रमुख सांगली यांनी दि.15/01/2024 इकडे प्राप्त दिनांक 19/01/2024 रोजीच्या पत्रान्वये प्रभाग क्र.04 मधील सुचवलेली कामे खालीलप्रमाणे

अ.नं.	कामाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग क्र.०४ मधील हनुमाननगर झेंडा चौक दक्षिण बाजूस जाणारा रस्ता मुरूमीकरण खडीकरण करणे.	रू.३३,५७,२३८/-
२.	प्रभाग क्र.०४ मधील हनुमाननगर झेंडा चौक परिसरातील आर.सी.सी. गटर करणे.	रू.५५,८०,९६९/-
३.	प्रभाग क्र.०४ मधील हनुमाननगर झेंडा चौक परिसरातील उर्वरित बोळ कॉक्रीट करणे व आर.सी.सी.गटर करणे.	रू.१४,९३,६२३/-
	एकूण	**१,०४,३१,८३०/-**

वरीलप्रमाणे सुचविणेत आलेली कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे नगरपरिषद पॅनेलवरील वास्तूविशारद यांचेकडून तयार करुन घेणेत आली असून त्यास मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक मंजूरी घेणेत आलेली आहे. सदरची कामे इस्लामपूर नगरपरिषद मा.प्रशासक ठराव क्र.५२१ दि.२५/०१/२०२४ च्या ठरावाच्या अनुषंगाने तयार करणेत आली आहेत. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सदर कामांना प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत यापूर्वी दि.०६/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. तथापि, सदर प्रस्तावातील कामांचे नांवातील तपशिल व यापूर्वी ठराव क्र.५२१ दि.२५/०१/२०२४ मधील नमुद नांवातील तपशिल यामध्ये काही बदल असलेने सदरचा सुधारित ठराव मंजूर तांत्रिक मंजूरीप्रमाणे कामांचा प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता सदरचा ठराव करणेत येत आहे. त्यानुसार पुढील रितसर योग्य ती कार्यवाही करणेकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व कार्यवाहीस उपरोक्त महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) व 317 अन्वये व मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दिनांक 27 डिसेंबर 2021 अन्वये मी,राहुल सर्जेराव मढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या खर्चास आर्थिक व प्रशासकीय ठरावान्वये मान्यता देणत येत आहे.

सदरकामीची कार्यवाही प्रशासनाने प्रचलित नियमावलीनुसार करणेत यावी.

१३.३.२०२४

(राहुल मढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. -३ उरूण इस्लामपूर येथील मुस्लिम समाज इदगाह परिसरामध्ये बहुउद्देशिय हॉल बांधणे (उर्वरित काम) कामाच्या प्राप्त निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना-

उरूण इस्लामपूर येथील मुस्लिम समाज इदगाह परिसरामध्ये बहुउद्देशिय हॉल बांधणे (उर्वरित काम) कामाच्या निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर कामाच्या प्राप्त 03 निविदाधाकापैकी कमी दराच्या निविदाधारक यांच्या निविदेस मंजूरी देणे आवश्यक आहे.

प्रस्ताव –

सन 2021-22 अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-12/निविदा सुचना/766/2024 दिनांक 26/02/2024 अन्वये दि 05/03/2024 रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक लोकमत व दैनिक सकाळ या वृत्तपत्रातून दि.27/02/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम 93 चे पोट कलम (2) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
1	उरूण इस्लामपूर येथील मुस्लिम समाज इदगाह परिसरामध्ये बहुउद्देशिय हॉल बांधणे (उर्वरित काम)	31,00,507.00	1) अक्षय रमेश पाटील रा-गोटखिंडी	अंदाजपत्रकीय दराने
			2) प्रतिक संभाजी देसाई, रा- इस्लामपूर	1.000% जादा दराने
			3) सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी	2.000% जादा दराने
अभिप्राय:– विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये **अक्षय रमेश पाटील रा-गोटखिंडी यांची अंदाजपत्रकीय दराने** कमी दराची निविदा सर्वात कमी दराची आहे.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी अक्षय रमेश पाटील रा-गोटखिंडी यांची सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दराने असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाचा योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५६२ **दिनांक-** १३/०३/2024

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दि.27 डिसेंबर 2021 अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी

Scanned with OKEN Scanner

राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, उरूण इस्लामपूर येथील मुस्लिम समाज इदगाह परिसरामध्ये बहुउद्देशिय हॉल बांधणे (उर्वरित काम) कामी विहीत मुदतीत प्राप्त निविदांमध्ये सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वांत कमी दराची असलेने त्यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा या ठरावान्वये मंजूर करणेत येत आहे.

तसेच योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा कार्यारंभ आदेश देवून पुढील सर्व कार्यवाही करणेस व नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम परत करणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

..१३.३.२०२२

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. -४ इस्लामपूर नगरपरिषद अंतर्गत पिण्याचे पाण्याची टाकी बांधणे कामाच्या प्राप्त निविदाबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना-

इस्लामपूर नगरपरिषद अंतर्गत पिण्याचे पाण्याची टाकी बांधणे कामाच्या निविदा मागविणेत आलेल्या होत्या. सदर कामाच्या प्राप्त 03 निविदाधाकापैकी कमी दराच्या निविदाधारक यांच्या निविदेस मंजूरी देणे आवश्यक आहे.

प्रस्ताव –

सन 2023-24 वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत विशेष अनुदान योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता इकडील जा.क्र.इनपा कार्या-12/निविदा सुचना/768/2024 दिनांक 26/02/2024 अन्वये दि 05/03/2024 रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर ई-निविदा दैनिक पुढारी या वृत्तपत्रातून दि.27/02/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. खालील कामाकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त ई-निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम 93 चे पोट कलम (2) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहेत. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
1	इस्लामपूर नगरपरिषद अंतर्गत पिण्याचे पाण्याची टाकी बांधणे	99,20,881.00	1) सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी	अंदाजपत्रकीय दराने
			2) चंद्रकांत शिवराम पाटील रा- काकडवाडी ता-मिरज	2.000% जादा दराने
			3) हणमंत भिवा गालवे रा-आटपाडी ता-आटपाडी	3.000% जादा दराने
अभिप्राय:– विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी यांची अंदाजपत्रकीय दराने कमी दराची निविदा सर्वात कमी दराची आहे.				

उपरोक्त कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी यांची सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दराने असलेने मंजूर करणेस हरकत नाही. सदर कामाचा योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा आदेश देवून काम पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्र. - ५६३ **दिनांक-** १३/०३ /2024

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दि.27 डिसेंबर 2021 अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद अंतर्गत पिण्याचे पाण्याची टाकी बांधणे कामी विहीत मुदतीत प्राप्त निविदांमध्ये सौरभ शंकर जाधव रा-गाताडवाडी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वांत कमी दराची असलेने त्यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा या ठरावान्वये मंजूर करणेत येत आहे.

तसेच योग्य त्या मुद्रांकावर रितसर करारनामा पूर्ण करून घेवून कामाचा कार्यारंभ आदेश देवून पुढील सर्व कार्यवाही करणेस व नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम परत करणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

१३.३.२०२४

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय ०५ - आर्थिक दृष्टया दुर्बल घटन निधीतून बिरोबानगर येथील गटर बांधणेच्या अंदाजपत्रकास कार्योत्तर मंजूरी देवून पुढील कार्यवाही करणेबाबत मान्यता देणे .

प्रस्तावना-

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बिरोबानगर येथील आर.सी.सी.गटर बांधणेच्या कामाच्या अंदाजपत्रकास कार्योत्तर मंजूरी देणे व त्यानुसार सदर कामी पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बिरोबानगर येथील आर.सी.सी.गटरचे बांधकाम करणेबाबत व क्रॉस ड्रेनेजचे काम करणेबाबत त्या परिसरातील सर्व नागरिकांची मागणी आहे. परिसरातील सांडपाणी व पावसाचे पाणी त्या गटर मधून मोठया प्रमाणात वाहत असून सदर ठिकाणी असलेली जुनी दगडी गटर पडलेली असून खराब झालेली आहे. तसेच सदर रस्त्यास असलेली पाईप मोरी(क्रॉस ड्रेनेज) खराब झालेने येथे नवीन आर.सी.सी.गटरचे बांधकाम करणे व क्रॉस ड्रेनेजचे काम करणे आवश्यक आहे अशी तेथील नागरिकांची मागणी आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता त्याठिकाणचे गटर हे अत्यंत खराब झालेले असून इस्लामपूर शहरातील अनेक भागातील नागरिकांचे येणारे सांडपाणी व पावसाचे पाणी त्याठिकाणाहून मोठया प्रमाणात वाहत असते. त्यामुळे जुने पडलेले दगडी गटरचे जागी नवीन आर.सी.सी. गटरचे बांधकाम करणे व क्रॉस ड्रेनेजचे काम करणे आवश्यक असून त्याकरिता अ) प्रभाग क्र.१४ मधील बिरोबा नगर येथील गटर करणे व ब) प्रभाग क्र.१४ मधील बिरोबा नगर येथील क्रॉस ड्रेनेज वर्क व गटर करणे ही कामे करणेकरिता अनुक्रमे अंदाजे रक्कम रू.९,९८,८८७/- व रक्कम रू.९,९८,१७६/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरची कामे आर्थिक दृष्टया दुर्बल घटक निधी अंतर्गत नगरपरिषद निधी किंवा शासनाकडील अन्य निधीतून करणे आवश्यक असून सदर कामांची अंदाजपत्रके तयार करणेत आली आहेत. तरी सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी कार्यालयीन प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५६४ **दिनांक -** १३/०३/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वरील अहवालाचे अवलोकन करुन इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील बिरोबानगर येथील आर.सी.सी. गटरचे बांधकाम करणेबाबत व क्रॉस ड्रेनेजचे काम करणेबाबत त्या परिसरातील सर्व नागरिकांची मागणी आहे. परिसरातील सांडपाणी व पावसाचे पाणी त्या गटर मधून मोठया प्रमाणात वाहत असून सदर ठिकाणी असलेली जुनी दगडी गटर पडलेली असून खराब झालेली आहे. तसेच सदर रस्त्यास असलेली पाईप मोरी(क्रॉस ड्रेनेज) खराब झालेने येथे नवीन आर.सी.सी.गटरचे बांधकाम करणे व क्रॉस ड्रेनेजचे काम करणे आवश्यक आहे अशी तेथील नागरिकांची मागणी आहे.

Scanned with OKEN Scanner

सदर ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता त्याठिकाणचे गटर हे अत्यंत खराब झालेले असून इस्लामपूर शहरातील अनेक भागातील नागरिकांचे येणारे सांडपाणी व पावसाचे पाणी त्याठिकाणाहून मोठया प्रमाणात वाहत असते. त्यामुळे जुने पडलेले दगडी गटरचे जागी नवीन आर.सी.सी. गटरचे बांधकाम करणे व क्रॉस ड्रेनेजचे काम करणे आवश्यक असून त्याकरिता अ) प्रभाग क्र.१४ मधील बिरोबा नगर येथील गटर करणे व ब) प्रभाग क्र.१४ मधील बिरोबा नगर येथील क्रॉस ड्रेनेज वर्क व गटर करणे ही कामे करणेकरिता अनुक्रमे अंदाजे रक्कम रू.९,९८,८८७/- व रक्कम रू.९,९८,१७६/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरची कामे आर्थिक दृष्टया दुर्बल घटक निधी अंतर्गत नगरपरिषद निधी किंवा शासनाकडील अन्य निधीतून करणे आवश्यक असून सदर कामांची अंदाजपत्रके तयार करणेत आली आहेत.

तरी वरीलप्रमाणे कामांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडील जा.क्र. ताशा.४/तां.मा./इस्लामपूर न.प./३८६/२०२४ दि.२८/०२/२०२४ अन्वये तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून सदर कामांचे अंदाजपत्रकास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेत येत आहे. सदरकामी येणारा खर्च आर्थिक दृष्टया दुर्बल घटक अंतर्गत नगरपरिषद निधीतून करण्यात यावा. सदर कामांची रितसर निविदा मागवून सदर कामे पूर्ण करुन घेणेबाबत पुढील कार्यवाही करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

११.३.२०२५

(राहुल मर्डेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

१११

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि. सांगली

प्रशासकीय ठराव

विषय महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियम क्र. ४/२०२१ दि. १२/०३/२०२१मधील तरतुदीमधील कलम ४ (१) अंतर्गत अर्ज सादर करणेस घेणेत आलेला ठराव क्रमांक ५०१ दि. ११/१२/२०२३ मध्ये दुरूस्ती करणेबावत.

प्रस्तावना - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियम क्र. ४/२०२१ दि. १२/०३/२०२१मधील तरतुदीमधील कलम ४ (१) अंतर्गत अर्ज सादर करणेस घेणेत आलेला ठराव क्रमांक ५०१ दि. ११/१२/२०२३ मध्ये दुरूस्ती करणेबाबत निर्णय घेणे.

वरील बाबी विचारात घेता उपरोक्त पदांवरती बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ कार्यरत केलेस वाहन व अग्निशमन योजना सुरळीतपणे कार्यान्वित ठेवणेस मदत होणार आहे. सध्या कार्यरत असणाऱ्या मनुष्य बळावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अग्निशमन या अत्यावश्यक सेवेचा विचार करता वाहन व अग्निशमन विभागाकरिता आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेणेकामी प्रशासकीय ठरावाची मान्यता घेवून निविदा प्रक्रिया राबविणेस व निविदा मंजुरीनंतर जुनी निविदा रद्द करणेकमी पुढील आदेशार्थ सादर.

प्रशासकीय ठराव क्रमांक :५५७ **दिनांक : १४/०६/२०२४**

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि.27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद इस्लामपूर नगरपरिषदेकडील वाहन व अग्निशमन विभागाकरिता वाहन चालक, अग्निशमन मदतनीस, गॅस शवदाहिनी ऑपरेटर, JCB ऑपरेटर आवश्यक असणाऱ्या बुहुउद्देशीय मनुष्यबळाची (अर्धकुशल) सेवा बाह्य यंत्रणे मार्फत घेणेबाबत येणा-या खर्चास रक्कम रू.२८,३३,४०९.२०/- ला आर्थिक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सदरकामी तांत्रिक मान्यता घेऊन रितसर ई-निविदा प्रक्रिया राबविणेसही मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीचा खर्च व्यवहाराचे कंत्राट मध्ये लेखाशिर्ष (4) यामध्ये पुर्नविनियोजनाने रक्कम उपलब्ध रक्कमेसह एकूण रू.३०.०० लक्ष इतक्या तरतूदीमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी नगरपरिषदेचे लेखाधिकारी यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०१ अन्वये पुनर्विलोकन करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ४ : इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या सर्व्हे क्रमांक ११४२ सिटी पार्क, आष्टा नाका येथील गाळा क्रमांक १५/२२ व १५/२७ या दोन गाळ्यांचे भाडे तत्वावर देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – १) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५
२) महाराष्ट्र स्थावर मालमत्ता हस्तांतरण नियम १९८३
३) स्थायी निदेश, उक्त कामीचे शासनाचे आदेश व परिपत्रके
४) मालमत्ता विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषदेच्या मालकीचे सिटी पार्क मधील गाळा क्र. १५/२७ श्री. मनजीत प्रतापराव मोरे यांचा गाळा भाडे रक्कम रू. १२५११२/- कार रक्कम रू. ५००६४/- यांची एकूण रक्कम रू. १७५१७६/- व गाळा १५/२२ सौ. प्रभावती प्रदिप पवार यांचा गाळा भाडे रक्कम रू. १६६८१६/- व कर रक्कम रू. ८६६१४ यांची एकूण रक्कम रू. २५३४३०/- थकीत असून त्यांच्या कडून गाळ्याची मालकी हक्क काढून घेणे करीता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ आणि बॉम्बे गव्ह प्रिमायसेस (इव्हिक्शन) ॲन्ड १९५५ क्र. १९६५ (१९६५ चा महा चार्कस) (यात यापुढे ज्याचा उक्त अधिनियम असा उल्लेख करण्यात आला आहे.)

याच्या कलम १०० (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून शासनाने बॉम्बे गव्हर्नमेंट प्रिमायसेस (इव्हिक्शन) ॲक्ट १९५५ (१९५६ चा मुंबई २) व त्याखाली वेळोवेळी तयार केलेले नियम दिनांक १२ जून २००६ पासून उक्त अधिनियमाच्या परिशिष्ट -- १ (अ) मधील झालेल्या सुधारणेच्या अधिन राहून लागू करण्यात आला आहे. आता सदरहू अधिनियम राज्यातील सर्व जिल्ह्यातील सर्व नगरपालिका क्षेत्रातील जागा इमारतींना देखील दिनांक २६ मार्च २००७ पासून करण्यात येत आहे. तसेच गणेश महादेव पोतदार, इस्लामपूर व सीमा विवेक वाळके यांचे विनंती अर्ज आलेले आहेत. सदरच्या सिटी पार्क शॉपिंग सेंटरमधील गाळ्यांपैकी ज्यांचे ९ वर्षे पूर्ण झालेले अशा दुकान गाळ्यांचे भाडे व अनामत रक्कम पुनर्मूल्यांकन न झालेमुळे नगरपरिषदेचे सि.स.नं.११४२ अंबिका शॉपिंग सेंटरमधील गाळ्यांचे दिनांक ०२/०६/२०२१ रोजीच्या त्रिसदस्यीय समितीच्या बैठकीमध्ये ठरविलेले दर पुढील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	गाळा क्र.	प्रती गाळा कारपेट क्षेत्र. चौ.मी.	प्रती गाळा अनामत रक्कम	नगरपरिषदेने अपेक्षित केलेले प्रती महा भाडे	त्रिसदस्यीय समितीने निश्चित केलेले प्रती महा भाडे
१	१ ते २०	९.३० चौ.मी	२,००,०००/-	१४६०/-	१८५०/-

तसेच खालीलप्रमाणे इस्लामपूर नगरपरिषदेच्या मालकीचे सि.स.नं.११४२ मधील सिटी पार्क शॉपिंग सेंटरमधील गाळ्यांचे भाडे व अनामत रक्कम पुनर्मूल्यांकन मा.सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली यांचेकडून प्राप्त झालेले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	गाळा क्र.	प्रती गाळा कारपेट क्षेत्र. चौ.मी.	प्रती गाळा अनामत रक्कम	नगरपरिषदेने अपेक्षित केलेले प्रती वार्षिक भाडे	नगरपरिषदेने अपेक्षित केलेले प्रती महा भाडे
१	१ ते २८	१४.१६ चौ.मी	२,००,०००/-	३३,०००/-	२५००/-

Scanned with OKEN Scanner

तरी वरीलप्रमाणे मा.सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली यांचेकडून भाडे व अनामत रक्कम पुनर्मूल्यांकन करून मिळालेली आहे. परंतू, त्रिसदस्यीय समितीकडून सिटीपार्क शॉपींग सेंटरचे भाडे व अनामत रक्कम पुनर्मूल्यांकन अद्याप न मिळालेले नाही. तसेच सदरच्या अंबिंका शॉपिंग सेंटरमधील १ ते २० गाळ्यांचे त्रिसदस्यीय समितीकडून भाडे व अनामत रक्कम पुनर्मूल्यांकन करून मिळालेली आहे. तरी, भाडे तत्त्वावर प्रस्तावित केलेले गाळे हे सिटीपार्क शॉपींग सेंटरयेथील तळमजल्यावरील असून ते आष्टा नाका या मुख्य रस्त्यालगत असल्याने त्याचे बाजारमूल्य इतर दुकान गाळ्यांपेक्षा अधिकचे असणार आहे. त्यामुळे सिटीपार्क शॉपींग सेंटर येथील ०१ ते २८ दुकान गाळ्यांची मा.सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली यांनी भाडे व अनामत रक्कम पुनर्मूल्यांकन हे या भाडेतत्त्वावर देण्यात येणा-या गाळ्यांकरिता निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे निश्चित केलेले दर हे सन २०२१ मधील असल्याने त्यामध्ये दरवर्षी १०% वाढ करून ती रक्कम खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	व्यापार संकुलाचे नांव	गाळा क्रमांक	क्षेत्रफळ	नगरपरिषदेने भाडेकामी निश्चित केलेला दर
०१	सिटी पार्क शॉपींग सेंटर	१५/२२	१४.१६ चौ.मी	३०००
०२		१५/२७	१४.१६ चौ.मी	३०००

तसेच अंबिंका शॉपिंग सेंटर मधील गाळ्यांची भाडे व अनामत रक्कम १०% वाढ करून होणारी रक्कम भरून घेवून सामान्य प्रशासन विभागाकडील माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांचा शासन निर्णय क्र. मातस ०८/०६/२०२३-DIR-DIT(MH)/३९, दिनांक ०३/१२/२०१४ अन्वये लिलाव प्रक्रिया राबविण्याची तरतूद आहे. तरी इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या सर्व्हे क्रमांक ११४२ सिटी पार्क, आष्टा नाका येथील गाळा क्रमांक १५/२२ व १५/२७ या दोन गाळ्यांचे भाडे तत्वावर देणेकामी लिलाव प्रक्रिया राबविणेस प्रशासनाने सदरचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५५८ **दिनांक : १४/०६/२०२४**

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषद मालकीच्या सर्व्हे क्रमांक ११४२ सिटी पार्क, आष्टा नाका येथील गाळा क्रमांक १५/२२ व १५/२७ या दोन गाळ्यांचे भाडे तत्वावर देणेकामी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ (३) अन्वये मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा.सहाय्यक संचालक, नगररचना, सांगली यांनी निश्चित केलेल्या गाळ्याच्या भाडे व अनामत रक्कमेमध्ये प्रतिवर्षी १०% वाढ करून येणारी रक्कम रू.३०००/- प्रती चौ.मी. या दराने लिलाव प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेत येत आहे. लिलाव प्रक्रियाकामी येणा-या खर्चास व अनुषंगिक कार्यवाहीस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ५ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन व अग्निशमन विभागाकडील वाहनांच्या किरकोळ दुरूस्तीकामी वार्षिक निविदा मागविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – १) वाहन व अग्निशमन विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन विभागाकडील 1) सर्व वाहनांची चार्जिंग बॅटरी पुरविणे, 2) सर्व वाहनांना नवीन टायर टयुब पुरविणे, 3) सर्व वाहनांचे लूज ऑईल पुरविणे, 4) सर्व वाहनांची ऑईल बदली व सर्व्हिसिंग ग्रीसिंग करणे, 5) सर्व वाहनांचे टायर पंक्चर काढणे, 6) अग्निशामक गाडीला फायरमन पाईप पुरविणे, सर्व वाहनांची किरकोळ दुरुस्ती करणे आपत्कालीन परिस्थिती असल्याने गरजेचे असते. याकामी नगरपरिषदेकडे दर मंजूर नसल्यास खर्च करणे व त्यायोगे करावयाच्या खर्चाबाबत तांत्रिक अडचणी निर्माण होत असतात. याचा सारासार विचार करता, सदरच्या कामासाठी सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता खालीलप्रमाणे कामांची कामनिहाय वार्षिक दर निश्चित करणेकामी नवीन दरपत्रके मागविणे व दर निश्चित करणे आवश्यक आहेत.

वाहनांचा तपशील --

अ.क्र.	वाहन नंबर	कामाचा तपशील
१	TATA LPT – 1613, MH-10-P-1104	1) सर्व वाहनांची चार्जिंग बॅटरी पुरविणे,
२	TATA LPT – 1109, MH-10-P-1045	2) सर्व वाहनांना नवीन टायर टयुब पुरविणे,
३	TATA ACE	3) सर्व वाहनांचे लूज ऑईल पुरविणे,
४	ट्रॅक्टर MH-10-DT-1604	4) सर्व वाहनांची ऑईल बदली व सर्व्हिसिंग ग्रीसिंग करणे,
५	झेनॉन गाडी MH-10-P-175	5) सर्व वाहनांचे टायर पंक्चर काढणे,
६	J.C.B. MH-10-P-1072	6) अग्निशामक गाडीला फायरमन पाईप पुरविणे,

वरीलप्रमाणे सर्व वाहनांची साहित्य खरेदी करणे व कामे करणे आवश्यक असून त्या कामास व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५७९ **दिनांक :** १४/०६/२०२४

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन व अग्निशमन विभागाकडील वाहनांच्या किरकोळ दुरूस्तीकामी वार्षिक निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचां खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीमधील वाहन दुरूस्ती या लेखाशिर्षातील उपलब्ध रक्कम रू.१०.०० लक्ष मधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे,

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ६ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन व अग्निशमन विभागाकरिता रिकामा पाणी टॅंकर भाडे तत्वावर घेणेबाबत वार्षिक निविदा मागविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – १) वाहन व अग्निशमन विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- सद्यस्थितीमध्ये इस्लामपूर नगरपरिषद अग्रिशमन सेवेमध्ये केवळ एकच अग्रिशमन वाहन (Fire tender) कार्यरत आहे. या वाहनाद्वारे इस्लामपूर नगरपरिषद क्षेत्र व आसपासच्या २० कि.मी. अंतरातील भागात अग्रिशमन सेवा पुरविण्यात येते.

इस्लामपूर नगरपरिषदेचे घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे अनेक कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, या ठिकाणी पिण्याच्या व वापराच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही. आम्लधर्मी (Acidic) पाण्यामुळे तेथील कूपनलिकेचे पाणीही वापरण्यायोग्य नाही. तसेच जवळपास नगरपरिषद पाणीपुरवठा योजनेची वाहिका (pipeline) नसलेने तेथे पाणीपुरवठा जोडणी देणेही शक्य नाही. यास्तव तेथे नाईलाजाने अग्रिशमन वाहनाद्वारे एक दिवसाआड १.५ ते २ हजार लिटर पाणी पुरविले जाते.

मात्र, "शासन परिपत्रक क्र. अशस १४०८/४२९/नवि-२४, दि.१७/०४/२००८ या परिपत्रकाद्वारे निर्देशित केलेनुसार अग्रिशमन वाहन आणिबाणी सेवा वगळता इतर कोणत्याही कारणास्तव उदा. पिण्यासाठी / वापरासाठी पाणी पुरवठा करणे इत्यादीसाठी वापरण्यास बंधन आहे. उपरोक्त पाणीपुरवठा अग्निशमन वाहनाद्वारे केल्यास आपत्कालीन स्थितीमध्ये सुसज्ज अग्निशमन वाहनाची सेवा पुरविण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो.तसेच सदर अग्निशमन वाहनाचे मायलेज तुलनेने कमी असल्याने व घनकचरा व्यवस्थापन केंद्र हे अग्निशमन केंद्रापासून ७-८ कि.मी. दूर असल्याने वेळ व इंधनाचाही मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. तसेच मनुष्यबळही या कामात गुंतून राहत आहे. यासोबतच वाहन देखभाल, दुरुस्ती खर्चही वाढत आहे. मागील वर्षभरातील अग्रिशमन वाहनाच्या इंधन वापराचा गोषवारा खालीलप्रमाणे

यातील अग्निशमन सेवेवरील अंदाजे इंधन खर्च रु. १,०२,०९१/- व पाणीपुरवठा करणेसाठी झालेला इंधन खर्च अंदाजे रु. २,६०,७६५/- इतका असे एकूण रक्कम रू.३,६२,८५६/- झालेला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार केला असता, यापुढे घनकचरा व्यवस्थापन केंद्र किंवा इतर नगरपरिषद आस्थापनाकरिता पाणीपुरवठा करणेकरिता अग्रिशमन वाहन न वापरता खाजगी टँकरची सेवा घेणे संयुक्तिक वाटते. घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे २००० लिटर क्षमतेची टाकी आहे. तेथे एक दिवसाआड पाणीपुरवठा आवश्यक आहे. २००० लिटर क्षमतेचा खाजगी टॅंकर सध्या बाजारभावानुसार रु ४००/- ते रु ५००/- या दरम्यान सेवा पुरवितो. रु. ५००/ टॅंकर खेप या महत्तम दराने गणना केल्यासही वार्षिक अंदाजे रु.९०,०००/- इतका खर्च संभवतो. यानुसार निविदा प्रक्रियेअंती खाजगी टॅंकर सेवा घेतल्यास अंदाजे रु.१,७०,७६५/- इतकी वार्षिक बचत होऊ शकते.

वरील बाबी विचारत घेता उपरोक्त घनकचरा व्यवस्थापन केंद्र व इतर नगरपरिषद आस्थापना येथे पाणी पुरवठा करणेसाठी खाजगी टॅंकर सेवा पुरविणेकामी निविदा प्रक्रिया राबविणेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५८०

दिनांक : १४/०६/२०२४

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन व अग्निशमन विभागाकरिता रिकामा पाणी टॅंकर भाडे तत्वावर घेणेबाबत वार्षिक निविदा मागविणे या कामास व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे,

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०७ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन व अग्निशमन विभागाकरिता जे सी बी भाडे तत्वावर घेणेबाबत वार्षिक निविदा मागविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – १) वाहन व अग्निशमन विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषदेकडे घनकचरा व्यवस्थापन मधून सन २०१८ साठी JCB 2DX मशीन खरेदी केले असून. सदरच्या जेसीबी मशीनचा तपशील खालीलप्रमाणे –

इंजिन	KOEL-4R810, 36.4 KW(49HP) 4 Cylinder Diesel Engine
हायड्रोलिक पंप फ्लो	70.4 Ipm 2200 rpm
बकेट साईज	0.18 cum
Dump Height	2.3 m
Load Over Height	2.83 m
Dig Depth	3.02 m
Max working Height	3.88 m
Loader Arm Breakout Force	1834 kgf
Bucket Tearout Force	3120 kgf

वरीलप्रमाणे नगरपरिषदेकडील जे सी बीची संरचना असून या जेसीबी ने सदर कामास ताकद कमी लागत असल्यामुळे जेसीबी मशीन सतत गरम होऊन बंद पडत आहे. तसेच एखादे काम करीत असताना त्या कामास विलंब लागत असल्याने इंधन देखील अधिक प्रमाणात खर्च होत आहे.

घनकचरा व्यवस्थापन येथे कचरा लेवलिंग करणे जेसीबी ने शक्य होत नसलेमुळे त्या कामाकरिता जास्त ताकदीचे 3 DX जेसीबी मशीन भाडे तत्वावर घेणे आवश्यक आहे. तसेच भाडे तत्वावर 3 DX जेसीबी घेणे करिता खालीलप्रमाणे तपशिल आहे.

इंजिन मॉडेल	JCB 448.3 DX
हायड्रोलिक पंप	114 – 76 HP - 2200 RPM
Loader Arm Breakout Force(kgf)	5300 kgf
Dump Height	2.74 m
Bucket Capacity	0.26 cum
Dig Depth	4.77 m
Bucket Tearout Force	5700 kgf

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे JCB 3DX मशीनचा तपशिल पाहता कचरा डेपो वरील कचरा लेवलिंग व तसेच नगरपरिषद हद्दीतील जेसीबी मशीनद्वारे मोठी गटर साफ करणे, सांडपाण्याचा निचरा करणे, चर मारणे इत्यादी कामे त्यामध्ये समाविष्ट होत असल्यामुळे सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता सदर कामाची जाहिर ई-निविदा प्रसिध्द करुन जेसीबी मशीन भाडे तत्वावर घेणे कामाचे दरपत्रके मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५८७ **दिनांक : १४/०६/२०२४**

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या वाहन व अग्निशमन विभागाकरिता जे सी बी (JCB 448.3 DX) भाडे तत्वावर घेणेबाबत वार्षिक निविदा मागविणेकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर कामीचा खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे,

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०८ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांचेकरिता बोलेरो एल एक्स आय हे वाहन खरेदी करणेचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणास मंजूरीस्तव सादर करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – वाहन अग्निशमन विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर शहर हे पुणे, बेंगलोर NH4 हांयवेच्या दरम्यान वसलेले आहे. सदर शहर कोल्हापूर पासून ५० किमी, सांगली पासून ५० किमी, पुणे पासून २०० किमी व मुंबई पासून ३५० किमी इतक्या अंतरावर आहे. सदर शहरापासून जिल्हा कार्यालय सांगली, विभागीय कार्यालय पुणे व मंत्रालय व नगरपरिषद प्रशासन संचालनालय कार्यालय नवी मुंबई येथे आहे.

नगरपरिषद ही ' ब ' वर्ग नगरपरिषद असून स्थायी निर्देश क्र. ३२ नुसार वित्त विभाग शाखा निर्णय क्र. वाहन/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०/९/२००१ अन्वये शासकीय कार्यालये, शासनाचे सार्वजनिक उपक्रम, शासन अनुदानित आस्थापना/संस्था या मध्ये वाहनांच्या वापरासंबंधी धोरण जाहिर केले आहे उक्तधोरणानुसार नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एम.यु.बी. ४८०३/१२३६/प्र.क्र.२६६/नवि १९ दि. ४/९/२००३ अन्वये नगरपरिषदांना वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्याबाबतचे अधिकार संचालक नगरपालिका प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या प्रशासकिय व्यवस्थेमध्ये मुख्याधिकारी, प्रमुख कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांना नगरपरिषद हद्दीमध्ये अनेक ठिकाणांना भेटी दयाव्या लागतात. उदा. नगरपरिषदेकडून होत असलेल्या विकास कामांची पाहणी करणे, नागरिकांचे तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्थळ निरिक्षण करणे, तसेच नगरपरिषदांचे प्रस्तावांच्या मंजूरीसाठी विभागीय मुख्यालय, जिल्हा मुख्यालय व मुंबई मंत्रालय येथे भेटी दयाव्या लागतात. क्षेत्रीय स्तरावर भेटी देणेकिरता मा. मुख्याधिकारी यांना १ वाहन गरजेचे आहे.

तसेच शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२००० /नवि-२७, दि.२८.९.२००० नुसार आस्थापनेवरील खर्चाची कमाल मर्यादा विहीत केलेली आहे. अशा आस्थापना खर्चाचे मर्यादेमध्ये वाहना वरील देखभाल व दुरुस्ती, इंधन तसेच त्याच्या चालकावरील खर्चाचा समावेश असतो. नवीन वाहन खरेदी केल्यास आस्थापना खर्चात साहजीकच वाढ होणार आहे, म्हणून ज्या नगरपरिषदांचे एकूण आस्थापना खर्च कमाल मर्यादेपेक्षा कमी आहे अशा नगरपरिषदांसाठी मा. मुख्याधिकारी यांचेसाठी खालीलप्रमाणे वाहनाचा वापर अनुज्ञेय करता येईल.

अ.क्र.	नगरपरिषदेचा दर्जा व आस्थापना खर्चाची टक्केवारी	वाहन खरेदी/वाहन वापराची अनुज्ञेयता	खर्चाची मर्यादा प्रति माह
	ब वर्ग ३५% पेक्षा कमी	मुख्याधिकारी १) भाडयाचे १ वाहन वापरण्यात येत असल्यास भाडयाची अदायगी किंवा २) रुपये ५ लक्ष पर्यंतचे सर्व उपसाधनासह नगरपरिषदेला स्वतःचे जीप हे एक वाहन खरेदी करणे अनुज्ञेय असेल या वाहनासाठी इंधनावरील (डिझेल, पेट्रोल) खर्च	१५०० किमी १५० लिटर

Scanned with OKEN Scanner

यापूर्वीचे मुख्याधिकारी यांचेकरिता असलेले वाहन सन २०१०-११ मध्ये लिलावाद्वारे निर्लेखित करून विक्री करणेत आलेले आहे. सदयस्थितीत नगरपरिषदेस मा.मुख्याधिकारी यांचेकरिता वाहन उपलब्ध नसलेने शासनाने विहित केलेल्या मर्यादेत नवीन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. तरी यासाठी बोलेरो एल एक्स आय या प्रकारचे वाहन खरेदी करणेसाठीचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणास मंजूरीस्तव सादर करणेकामी प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५८२ **दिनांक : १४/०६/२०२४**

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांचेकरिता बोलेरो एल एक्स आय हे वाहन खरेदी करणेचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणास मंजूरीस्तव सादर करणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

शासनाने विहित केलेल्या मर्यादेत आणि शासकीय कार्यालयास करामध्ये असणा-या सवलती घेण्यात याव्यात.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०९ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांचेकरिता नगरपरिषदेस वाहन उपलब्ध नसलेने भाडे तत्वावर घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – वाहन अग्निशमन विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर शहर हे पुणे, बेंगलोर NH4 हायवेच्या दरम्यान वसलेले आहे. सदर शहर कोल्हापूर पासून ५० किमी, सांगली पासून ५० किमी, पुणे पासून २०० किमी व मुंबई पासून ३५० किमी इतक्या अंतरावर आहे. सदर शहरापासून जिल्हा कार्यालय सांगली, विभागीय कार्यालय पुणे व मंत्रालय व नगरपरिषद प्रशासन संचालनालय कार्यालय नवी मुंबई येथे आहे.

नगरपरिषदेच्या प्रशासकिय व्यवस्थेमध्ये मुख्याधिकारी, प्रमुख कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांना नगरपरिषद हद्दीमध्ये अनेक ठिकाणांना भेटी दयाव्या लागतात. उदा. नगरपरिषदेकडून होत असलेल्या विकास कामांची पाहणी करणे, नागरिकांचे तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्थळ निरिक्षण करणे, तसेच नगरपरिषदांचे प्रस्तावांच्या मंजूरीसाठी विभागीय मुख्यालय, जिल्हा मुख्यालय व मुंबई मंत्रालय येथे भेटी दयाव्या लागतात. क्षेत्रीय स्तरावर भेटी देणेकिरता मा. मुख्याधिकारी यांना १ वाहन गरजेचे आहे. तसेच करवसुली विभागामार्फत वसुली पथकाकरिता ॲटोरिक्षा भाडे तत्वावर घेणे अत्यंत आवश्यक आहे.

यापूर्वीचे मुख्याधिकारी यांचेकरिता असलेले वाहन सन २०१०-११ मध्ये लिलावाद्वारे विक्री करणेत आलेले आहे. सदयस्थितीत नगरपरिषदेस मा. मुख्याधिकारी यांचेकरिता वाहन भाडे तत्वावर घेणेकरिता यासर्व वाहनांसाठी GST सहित व इंधनासहित दर मागविणे करिता अंदाजे प्रति दिवस /प्रति कि.मी दर निश्चित करणे तसेच वाहन चालक व त्याचा खर्च आणि वाहनाचे डिझेल यासह सर्व करांसहित दर देणे व रोड टोल हा ज्यावेळी पुणे, मुंबई, सांगली, कोल्हापूर जाईल त्यावेळी टोलची रक्कम दिली जाईल. तरी भाडे तत्वावर स्विफ्ट डिझायर किंवा इर्टिगा किंवा तत्सम गाडी व करवसुली विभागामार्फत वसुली पथकाकरिता ॲटोरिक्षा घेणेकामी जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करणेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५८३ **दिनांक :** १४/०६/२०२४

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांचेकरिता नगरपरिषदेस वाहन उपलब्ध नसलेने भाडे तत्वावर घेणे व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

सदर कामीचा खर्च नगरपरिषद निधीमधून करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

संबंधित विभागामार्फत याकामी प्रचलित नियमानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय १० : इस्लामपूर नगरपरिषद मिळकत विभागाकडे राष्ट्रीय पुरूषांच्या प्रतिमेस व पुतळ्यांस पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करणे कामीच्या प्राप्त झालेल्या निविदांबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – मिळकत विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकनेते राजारामबापू पाटील, छत्रपती शिवाजी महाराज शिराळा नाका अर्ध पुतळा असे एकुण चार पुतळे आहेत. त्याकरीता इस्लामपूर नगरपरिषदेमार्फत पुष्पहार घालणेचे करण्यात येत असते.

तसेच सन २०२४ मध्ये राष्ट्र पुरुष / थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरा करणेकामी शासन परिपत्रक क्र.GAD-49022/14/2023-GAD (DESK-29) ने थोर व्यक्तीच्या / राष्ट्रपुरुषांच्या राष्ट्रगीतांच्या कार्यक्रमासाठी पुष्पहार अर्पण करणेकरिता कळविणेत आलेले आहे. तसेच थोर व्यक्तीच्या / राष्ट्रपुरुष यांच्या जयंतीनिमित्त लागणारे मोठे पुष्पहार याकरिता साधारणतः पाच ते सहा फुट इतक्या उंचीचा हार लागणार आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ४९ मध्ये सन समारंभ जयंती उत्सव साजरे करणेबाबत तरतूद नमूद केली असून याकामी साधारणतः एक लक्ष रूपयांची विहित मर्यादा देणेत आलेली आहे. तरी वरीलप्रमाणे कामे करणेकरिता ठेकेदार नेमणेकामी निविदा / दरपत्रके प्रसिध्द केल्या असता तीनही निविदा पात्र झाल्या असल्याने त्यांचे वित्तीय बोलीचे लिफाफे उघडले असता, मे.एस.पी.फ्लॉवर्स अँड डेकोरेटर्स, इस्लामपूर यांचा सर्वांत कमीचा दर असून त्यांच्याबरोबर दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या पत्रानुसार वाटाघाटीद्वारे दर कमी केलेले असलेने दरपत्रक मंजूर करणेकामी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५८४ **दिनांक : १४/०६/२०२४**

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषद मिळकत विभागाकडे राष्ट्रीय पुरूषांच्या प्रतिमेस व पुतळ्यांस पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करणे कामीच्या प्राप्त झालेल्या निविदामध्ये प्राप्त झालेले दर हे बाजारभावापेक्षा अधिकचे असल्याने आणि सदरची कामे वार्षिक स्वरूपाची असल्याने निविदेमध्ये एस.पी फ्लॉवर्स अँड डेकोरेटर्स, इस्लामपूर यांनी नमूद केलेले न्यूनतम दरामध्ये वाटाघाटी करून केलेल्या पुढील अंतिम दरास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	पुतळ्याचे नाव	पुष्प हाराची साईज	कंत्राटदाराचे / संस्थेचे नाव एस.पी फ्लॉवर्स अँड डेकोरेटर्स इस्लामपूर	
			निविदेमध्ये नमूद केलेले प्रति नग दर	वाटाघाटीअंती अंतिम केलेले प्रति नग दर
१	तहसील चौक आश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (दररोज)	५ फूट ५ इंच	१००/-	८०/-

Scanned with OKEN Scanner

२	तहसील चौक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा (दररोज)	५ फूट	१००/-	८०/-
३	आष्टा नाका उद्यान लोकनेते राजारामबापू पाटील पुतळा (दररोज)	६ फूट	१५०/-	८०/-
४	थोर व्यक्ती यांचे जयंतीकरिता हार (शासन परिपत्रकाप्रमाणे)	१ फूट	६०/-	११००/-
५	राष्ट्रीय दिन साजरे करणेकरिता पुष्पचक्र व हार (शासन परिपत्रकाप्रमाणे)	२ X २	१२००/-	५००/-

तसेच वरीलप्रमाणे अनुक्रमांक ०१ ते ०३ कामी दररोज तसेच अनुक्रमांक ०४ व ०५ साठी शासन परिपत्रकातील नमूद दिनांकास पुष्पहार पुरविणेची अट करारपत्रकामध्ये नमूद करून त्याप्रमाणे कार्यादेश देणेत यावा. तसेच याकामी स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दीद्वारे एखादी सामाजिक संस्था / मंडळ / उत्सुक व्यक्ती यांचेमार्फत दत्तक घेण्याबाबत जाहीर आवाहनाद्वारे निवड करणेसदेखील मान्यता देणेत येत आहे.

मे.एस.पी.फ्लॉवर्स ॲण्ड डेकोरेटर्स, इस्लामपूर यांना निविदा स्विकृतीपत्र, बयाणा रक्कम भरून घेणेस, योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घेणेस व त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत येत आहे. सदरकामीचा खर्च नगरपरिषद निधीमधून करणेसही आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र.११ - इस्लामपूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाकडील विविध कामांच्या वार्षिक निविदा मागविणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना-

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषदेच्या मालकीच्या रस्त्यावर खडी पुरविणे व पसरविणे, डांबरी पॅचवर्क करणे, सार्वजनिक शौचालये नाले व गटर्स दुरुस्ती करणे इत्यादी कामे कंत्राटदाराकडून करुन घेणेकरिता वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीकोनातून पावसाळयात विविध भागात पाणी साठत असल्याने काही ठिकाणच्या जुन्या रस्त्याची, गटारीची दुरावस्था होते व काही ठिकाणी रस्त्याना खड्डे पडतात. तसेच उपनगरामध्ये सखल भागात पाणी साठत असलेल्या ठिकाणी खडी व मुरुम पसरविणे. याकामी इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषदेच्या मालकीच्या रस्त्यावर खडी पुरविणे व पसरविणे, रस्त्यावरील खड्डे डांबरी पॅचवर्क करुन बुजविणे, सार्वजनिक शौचालये, नाले व गटर्स दुरुस्ती करणे इत्यादी कामे कंत्राटदारांकडून करुन घेणेकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्पेसिफिकेशननुसार सदर कामे करणेकामी बाबनिहाय वार्षिक निविदा दरपत्रक मागविणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५८५ **दिनांक -१४/०६/२०२४**

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वरील अहवालाचे अवलोकन करुन इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील नगरपरिषदेच्या मालकीच्या रस्त्यावर खडी पुरविणे व पसरविणे, रस्त्यावरील खड्डे डांबरी पॅचवर्क करुन बुजविणे, सार्वजनिक शौचालये, नाले व गटर्स दुरुस्ती करणे इत्यादी कामे कंत्राटदारांकडून करुन घेणेकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्पेसिफिकेशननुसार सदर कामे करणेकामी बाबनिहाय वार्षिक निविदा / दरपत्रक मागविणेस व पुढील योग्य ती कार्यवाही करणे या ठरावाव्दारे मंजूरी देणेत येत आहे. त्याकरिता येणा-या सर्व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. ९२ - कापूसखेड रोड ते कोळी मळा जोडणा-या कापूसखेड रस्त्यास आर.सी.सी.गटर व पाईप बसविणेबाबत.

प्रस्तावना-

कापूसखेड रोड ते कोळी मळा जोडणा-या कापूसखेड रस्त्यास सांडपाण्याचा निचरा होणेच्या दृष्टीने आर.सी.सी.गटर व पाईप बसविणे आवश्यक आहे.

प्रस्ताव –

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कापूसखेड रोड ते कोळी मळा जोडणा-या कापूसखेड रस्त्यास असलेल्या गटारीकरिता पाईप मोठी आहे. कापूसखेड नाक्यापासून पुढील दक्षिणेकडील बाजूस काही भागात पक्के आर.सी.सी.गटर आहे. परंतु कोळी मळयाकडे जाणा-या रस्त्यापासून पुढे कापूसखेड स्मशानभूमिकडे / अग्निशमन केंद्राकडे जाणा-या रस्त्यापर्यंत दक्षिण पश्चिम बाजूस पक्के गटर नाही. सदर रस्त्यापर्यंत रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग आहे व तो जि.प.बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. परंतु सदर रस्त्याच्या गटारात तेथील आजूबाजूच्या सर्व परिसरातील सांडपाणी येत असल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने सदर रस्त्याचा गटर व पाईप मोरीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

प्रभाग क्र.०५ मधील कापूसखेड रोड कोळी मळा कॉर्नर ते मुबारक जमादार मळा दक्षिण बाजू आर.सी.सी.गटरचे बांधकाम करणेकरिता अंदाजे रक्कम रु.४८,४७,०४४/- इतका खर्च असून (प्रशासक ठराव क्र.४८६ दि.०१/११/२०२३ अन्वये मंजूरी दिल्याप्रमाणे) सदर कामाचे अंदाजपत्रकास यापूर्वी तांत्रिक मंजूरी घेणेत आली आहे. सदरची दोन्ही कामे ही प्रभाग क्र.०५ या राखीव प्रभागातील आहेत. सदर गटरचे काम व पाईप मोरीचे काम हे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत अनुज्ञेय आहे. परंतु सदर ठिकाणच्या रस्त्याचे गटरचे काम नगरपरिषदेमार्फत करावयाचे झाल्यास जि.प.बांधकाम विभागाकडून ना हरकत दाखला घेणे उचित वाटते. तरी त्यानुसार प्रस्ताव पाठवून मान्यता घेणेची कार्यवाही करुन पुढील काम त्यानंतर करणे योग्य वाटते.

तसेच कापूसखेड रोड ते कोळी मळा या जंक्शनवरील पाईप मोरी बांधणे आवश्यक आहे. तेथे येणारे सांडपाणी व पावसाचे पाणी योग्य प्रकारे निचरा होण्याकरिता अडीच फुटी दोन रो(Row) पाईप घालणे आवश्यक आहे. कारण अडीच / तीन फुट खोलीवर तेथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन आहे. त्यामुळे मोठया आकाराचे पाईप तेथे घालता येणार नाहीत. तसेच रस्त्याची उंची सुध्दा तेथे कमी आहे. त्यामुळे तेथील सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा विचार करुन दोन रो (Row) मध्ये आर.सी.सी. (NP-3) पाईप घालून मोरीचे बांधकाम करणेस अंदाजे रक्कम रु.६,५३,२५४/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे अंदाजपत्रकास मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून तांत्रिक मंजूरी मिळालेनंतर सदरचे काम साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत करणेकरिता आवश्यक तो प्रस्ताव मा.

Scanned with OKEN Scanner

जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून पाठवून प्रशासकीय मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५८६ **दिनांक-** 14/06/2024

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दि.27 डिसेंबर 2021 अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील कापूसखेड रोड ते कोळी मळा जोडणा-या कापूसखेड रस्त्यास असलेल्या गटारीकरिता पाईप मोठी आहे. कापूसखेड नाक्यापासून पुढील दक्षिणेकडील बाजूस काही भागात पक्के आर.सी.सी.गटर आहे.

परंतु कोळी मळयाकडे जाणा-या रस्त्यापासून पुढे कापूसखेड स्मशानभूमिकडे / अग्निशमन केंद्राकडे जाणा-या रस्त्यापर्यंत दक्षिण पश्चिम बाजूस पक्के गटर नाही. सदर रस्त्यापर्यंत रस्ता हा प्रमुख जिल्हा मार्ग आहे व तो जि.प.बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. परंतु सदर रस्त्याच्या गटारात तेथील आजूबाजूच्या सर्व परिसरातील सांडपाणी येत असल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने सदर रस्त्याचा गटर व पाईप मोरीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

प्रभाग क्र.०५ मधील कापूसखेड रोड कोळी मळा कॉर्नर ते मुबारक जमादार मळा दक्षिण बाजू आर.सी.सी.गटरचे बांधकाम करणेकरिता अंदाजे रक्कम रु.४८,४७,०४४/- इतका खर्च असून (प्रशासक ठराव क्र.४८६ दि.०१/११/२०२३ अन्वये मंजूरी दिल्याप्रमाणे) सदर कामाचे अंदाजपत्रकास यापूर्वी तांत्रिक मंजूरी घेणेत आली आहे. सदरची दोन्ही कामे ही प्रभाग क्र.०५ या राखीव प्रभागातील आहेत. सदर गटरचे काम व पाईप मोरीचे काम हे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत अनुज्ञेय आहे. परंतु सदर ठिकाणच्या रस्त्याचे गटरचे काम नगरपरिषदेमार्फत करणेकरिता जि.प.बांधकाम विभागा वाळवा यांचेकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणेस मंजूरी देणेत येत आहे.

तसेच सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदरचा प्रस्ताव प्रभाग क्र.5 मधील राखीव प्रभागातील असलेने प्रभाग क्र. ०५ मधील कापूसखेड रोड ते कोळी मळा जोडणा-या कापूसखेड रस्त्यास आर.सी.सी.गटर व पाईप बसविणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,५३,२५४/- (रक्कम रु. सहा लाख त्रेपन्न हजार दोनशे चौपन्न मात्र) इतक्या रक्कमेचा प्रस्ताव साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सादर करणेकरिता व सदरचे अंदाजपत्रकास मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून तांत्रिक मंजूरी मिळालेनंतर सदरचे काम आवश्यक तो प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून पाठवून प्रशासकीय मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणेकामी या ठरावद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र. - 13 साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन 2022-23 अंतर्गतचे इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 14 साठेनगर रिंगरोड ते सार्वजनिक शौचालय रस्ता डांबरीकरण करणेचे काम रद्द करणे व त्याऐवजी इस्लामपूर ते खोलवाट रस्त्याबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना-

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन 2022-23 अंतर्गतचे इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 14 साठेनगर रिंगरोड ते सार्वजनिक शौचालय रस्ता डांबरीकरण करणेचे काम उपअभियंता क्र.२ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सांगली यांचेकडील पत्र क्र. उ.अ./प्रमंग्रासयो/मग्रारविसं./सांगली/91/2024 दि. 28/02/2024 चे रद्द करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव –

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 14 मधील साठेनगर रिंगरोड ते सार्वजनिक शौचालय रस्ता डांबरीकरण करणे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 36,23,582/- (अक्षरी छत्तीस लाख तेवीस हजार पाचशे ब्याऐंशी मात्र) चे काम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन 2022-23 अंतर्गत करणेबाबत मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-70,71/एसआर-42,43,44/2023 दि.24/03/2024 अन्वये प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामी रितसर ई- निविदा मागवून प्राप्त निविदापैकी कमी दराची ई- निविदा श्री.संग्राम उत्तमराव पाटील रा-इस्लामपूर यांची -1.00% कमी दराची निविदा प्रशासकीय ठराव क्र. 474 दि.30/10/2023अन्वये मंजूरी केली असून संबधित कंत्राटदार यांना इकडील जा.क्र. इनपा/कार्या-12/5278/2023 दि.07/11/2023 अन्वये कामाचा आदेश देवून प्रत्यक्षात कामास सुरूवात केली होती.

परंतु सदर ठिकाणी भुयारी गटर योजनेचे काम व नविन पाईपलाईनचे काम प्रथमत: करावे म्हणून तेथिल नागरिकांनी मागणी केली तसेच त्या रस्त्याजवळील अतिक्रमण प्रथमत: काढून घ्यावीत व उंची वाढवून भराव करून त्यांनतरच काम करावे असे लेखी निवेदन सुध्दा तेथील नागरीकांनी प्रत्यक्ष मा.मुख्याधिकारी यांना भेटून दिले होते व त्यानुसार झालेल्या चर्चेनुसार सदर रस्त्याची प्रथमत: भूमिअभिलेख खात्याकडून मोजणी करणेबाबतची कार्यवाही झालेनंतर रस्त्याचे डांबरीकराणाचे काम करणेबाबत ठरविणे आले.

परंतु उपअभियंता क्र.२ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सांगली यांचेकडील पत्र क्र. उ.अ./प्रमंग्रासयो/मग्रारविसं./सांगली/91/2024 दि. 28/02/2024 चे पत्रान्वये इस्लामपूर ते खोलवाट या रस्त्याचे काम. शासन निर्णय क्र. मुग्रायो-2023/प्र.क्र.28/बांधकाम-4 दि.03/03/2023 अन्वये मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर आहे. तसेच त्याचेकडील

Scanned with OKEN Scanner

जाक्र./का.अ./प्रमंग्रासयो/मग्रार विसं/सांगली/938/2023 दि.23/11/2023 अन्वये काचा कार्यारंभ आदेश देणेत आलेला आहे. सद्यस्थितीत सदरचे काम प्रगतीत असून इस्लामपूर नगरपरिषदेमार्फत या रस्त्यावरील काम रद्द करणेत यावे अशी विनंती केली आहे

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील वरीलप्रमाणे रस्त्याचे फक्त डांबरीकरण करणेचे काम नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित आहे. परंतू आता सदर रस्ता भुयारी गटर योजनेच्या कामाकरिता खोदला आहे. तसेच तेथिल नागरिकांच्या मागणीनुसार पाण्याची नविन पाईपलाईन टाकल्यास रस्ता पुन्हा खोदला जाणेची शक्यता आहे. तसेच रिंग रोडकडील उताराचा भाग कमी करणेसाठी रस्त्याची उंची वाढिवणेबाबतसुध्दा नागरिकांची मागणी आहे. त्यामुळे नगरपरिषदमार्फत मंजूर असलेले फक्त रस्ता डांबरीकरणाचे काम करणे तांत्रिक दृष्टया योग्य होणार नाही.

सदर रस्ता आता खोदलेला असल्यामुळे प्रथमत: खडीकरण करणे आवश्यक आहे म्हणजे सदर काम नगरपरिषदेमार्फत करावयाचे झाल्यास खडीकरण व डांबरीकरण करणाचे कामाचे वाढीव खर्चासह सुधारीत अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता घेऊन सुधारीत प्रशासकीय मान्यता घेऊन काम करावे लागेल. त्यामुळे उपअभियंता क्र.२ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सांगली यांनी त्याचेकडील मंजूर सदर कामांमध्ये नगरपरिषदेमार्फत मंजूर कामाचा सुध्दा समावेश आहे. तसेच त्यांचेमार्फत होत असलेल काम हे खडीकरण व डांबरीकरण या स्वरूपाचे आहे.

तरी उपरोक्त परिस्थितीचा विचार करून इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.14 मधील साठेनगर रिंगरोड ते सार्वजनिक शौचालय रस्ता डांबरीकरण करणेचे काम प्रशासकीय ठरावान्वये रद्द करणे योग्य वाटते. तसेच सदर कामाऐवजी सदर प्रशासकीय मंजूर रक्कमेच्या अधिन राहून इतर सदर प्रभाग क्र. 14 मधील रिंग रोड ते शेतकरी उद्यानकडे जाणा-या पेठ-सांगली रस्त्यास जोडणा-या जोड रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम प्रस्तावित करून मा.जिल्हाधिकारीसो सांगली यांचेकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करून पुढील रितसर योग्य ती कार्यवाही करणेकामी प्रशासकीय प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. -५८ **दिनांक-** 14/06/2024

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71/नवि-14 दि.27 डिसेंबर 2021 अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन 2022-23 अंतर्गतचे इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 14 साठेनगर रिंगरोड ते सार्वजनिक शौचालय रस्ता डांबरीकरण करणे हे अंदाजपत्रकीय रक्कम रु. 36,23,582/- (अक्षरी छत्तीस लाख तेवीस हजार पाचशे ब्याऐंशी मात्र) चे काम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन 2022-23 अंतर्गत करणेबाबत मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-70,71/एसआर-42,43,44/2023 दि.24/03/2024 अन्वये प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामी रितसर ई- निविदा मागवून प्राप्त निविदापैकी कमी दराची ई- निविदा श्री.संग्राम उत्तमराव पाटील रा-इस्लामपूर यांची -1.00% कमी दराची निविदा प्रशासकीय ठराव क्र. 474 दि.30/10/2023 अन्वये मंजूरी केली असून संबधित कंत्राटदार यांना इकडील जा.क्र. इनपा/कार्या-12/5278/2023 दि.07/11/2023 अन्वये कामाचा आदेश देवून प्रत्यक्षात कामास सुरूवात केली होती.

Scanned with OKEN Scanner

परंतु सदर ठिकाणी भुयारी गटर योजनेचे काम व नविन पाईपलाईनचे काम प्रथमत: करावे म्हणून तेथिल नागरिकांनी मागणी केली तसेच त्या रस्त्याजवळील अतिक्रमण प्रथमत: काढून घ्यावीत व उंची वाढवून भराव करून त्यांनतरच काम करावे असे लेखी निवेदन सुध्दा तेथील नागरीकांनी प्रत्यक्ष मा.मुख्याधिकारी यांना भेटून दिले होते व त्यानुसार झालेल्या चर्चेनुसार सदर रस्त्याची प्रथमत: भूमिअभिलेख खात्याकडून मोजणी करणेबाबतची कार्यवाही झालेनंतर रस्त्याचे डांबरीकराणाचे काम करणेबाबत ठरविणे आले.

उपअभियंता क्र.२ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सांगली यांचेकडील पत्र क्र. उ.अ./प्रमंग्रासयो/मग्रारविसं./सांगली/91/2024 दि. 28/02/2024 चे पत्रान्वये इस्लामपूर ते खोलवाट या रस्त्याचे काम. शासन निर्णय क्र. मुग्रायो-2023/प्र.क्र.28/बांधकाम-4 दि.03/03/2023 अन्वये मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर आहे तसेच त्याचेकडील जाक्र./का.अ./प्रमंग्रासयो/मग्रार विसं/सांगली/938/2023 दि.23/11/2023 अन्वये काचा कार्यारंभ आदेश देणेत आलेला आहे. सद्यस्थितीत सदरचे काम प्रगतीत असून इस्लामपूर नगरपरिषदेमार्फत या रस्त्यावरील काम रद्द करणेत यावे अशी लेखी विनंती केली आहे

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील वरीलप्रमाणे रस्त्याचे फक्त डांबरीकरण करणेचे काम नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित आहे. परंतू आता सदर रस्ता भुयारी गटर योजनेच्या कामाकरिता खोदला आहे. तसेच तेथिल नागरिकांच्या मागणीनुसार पाण्याची नविन पाईपलाईन टाकल्यास रस्ता पुन्हा खोदला जाणेची शक्यता आहे. तसेच रिंग रोडकडील उताराचा भाग कमी करणेसाठी रस्त्याची उंची वाढिवणेबाबतसुध्दा नागरिकांची मागणी आहे. त्यामुळे नगरपरिषदमार्फत मंजूर असलेले फक्त रस्ता डांबरीकरणाचे काम करणे तांत्रिक दृष्टया योग्य होणार नाही.

सदर रस्ता आता खोदलेला असल्यामुळे प्रथमत: खडीकरण करणे आवश्यक आहे म्हणजे सदर काम नगरपरिषदेमार्फत करावयाचे झाल्यास खडीकरण व डांबरीकरण करणाचे कामाचे वाढीव खर्चासह सुधारीत अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता घेऊन सुधारीत प्रशासकीय मान्यता घेऊन काम करावे लागेल. त्यामुळे उपअभियंता क्र.२ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, सांगली यांनी त्याचेकडील मंजूर सदर कामांमध्ये नगरपरिषदेमार्फत मंजूर कामाचा सुध्दा समावेश आहे. तसेच त्यांचेमार्फत होत असलेल काम हे खडीकरण व डांबरीकरण या स्वरूपाचे आहे.

तरी उपरोक्त परिस्थितीचा विचार करून इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.14 मधील साठेनगर रिंगरोड ते सार्वजनिक शौचालय रस्ता डांबरीकरण करणेचे काम रद्द करणेस व सदरच्या अंदाजपकीय रक्कमेच्या अधिन राहून सदर प्रभाग क्र. 14 मधील रिंग रोड ते शेतकरी उद्यानकडे जाणा-या पेठ-सांगली रस्त्यास जोडणा-या जोड रस्त्याचे डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रक तयार करून सदर कामास मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून तांत्रिक मान्यता घेऊन मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करून पुढील योग्य ती रितसर कार्यवाही करणेस या ठरावाद्वारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली.

विषय क्र.१४ - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील विविध कामांच्या प्राप्त झालेल्या निविदांबाबत निर्णय घेणे.

==========

प्रस्ताव - साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन २०२३-२४ अंतर्गत मंजूर निधीतून करावयाच्या कामांस प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजूरी देणे.

प्रस्तावना - साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना सन २०२३-२४ योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील कामे करणेकरिता या इकडील जा.क्र.इनपा कार्या-१२/निविदा सुचना/१२५५/२०२४, दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये दि.१३/०३/२०२४ रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर निविदा दैनिक सत्यदूत या वृत्तपत्रातून दि.०५/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे खालील कामांकरिता निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम ९३ चे पोट कलम (२) विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहे. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र.	कंत्राटदाराचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नांव	निविदा दर
१.	प्रभाग क्र.१४ मधील मधील उरुणवाडी येथील विजय यादव ते ओढयापर्यंत गटर करणे.	रू.५,६८,४७०/-	निखिल लालासो देसाई रा.इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली.	१% जादा दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी, जि.सांगली.	२% जादा दराने
			सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर, जि.सांगली.	अंदाजपत्रकीय दराने
अभिप्राय - विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमी दराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				
२.	प्रभाग क्र.१४ मधील मधील उरुणवाडी येथील ओढयाजवळ रस्त्यास रिटेनिंग वॉल बांधणे.	रू.३,६९,८००/-	निखिल लालासो देसाई रा.इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली.	१% जादा दराने
			सौरभ शंकर जाधव रा.गाताडवाडी, जि.सांगली.	२% जादा दराने
			सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर, जि.सांगली.	अंदाजपत्रकीय दराने
अभिप्राय - विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमी दराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे दोन्ही कामांसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०३ निविदांपैकी सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर यांच्या सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दरांची असलेने मंजूर करणेस शिफारस आहे.

प्रशासकीय ठराव क्र. -५८८ **दिनांक -- १४/०६/२०२४**

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद सदरकामी सन २०२३-२४ करिता साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना मा.जिल्हाधिकारी, कार्यालय, सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-२/कावि-१०१/एसआर-४४/२०२४, दि.२८/०२/२०२४ अन्वये प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. उपरोक्त प्रशासकीय प्रस्तावाचे अवलोकन करुन वरील कामांसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वांत कमी दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे दोन्ही कामांसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०३ निविदांपैकी सुरज राहुल पाटील रा.इस्लामपूर यांच्या सर्वांत कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस शिफारस आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

२५९

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली.

विषय क्र.१५ - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील खाटीक अपार्टमेंट जवळील गटर करणे कामाच्या प्राप्त झालेल्या निविदाबाबत निर्णय घेणे.

==========

प्रस्ताव -

वैशिष्टयपूर्ण योजना सन २०२३-२४ अंतर्गत मंजूर निधीतून करावयाच्या कामास प्राप्त झालेल्या निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजूरी देणे.

प्रस्तावना -

वैशिष्टयपूर्ण योजना सन २०२३-२४ योजनेअंतर्गत मंजूर अनुदानामधून खालील काम करणेकरिता या इकडील जा.क्र.इनपा कार्या-१२/निविदा सुचना/१२७१/२०२४, दिनांक ०५/०३/ २०२४ अन्वये दि.१४/०३/२०२४ रोजीपर्यंत निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर निविदा दैनिक प्रतिध्वनी या वृत्तपत्रातून दि.०६/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे खालील कामाकरिता निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी निविदा आपले समक्ष व उपस्थित कंत्राटदार/त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडणेत आल्या असून लेखासहिंतेतील तरतुदीनुसार विहीत अधिनियमातील कलम ९३ चे पोट कलम (२) विहीत मुदतीत प्राप्त झालेली निविदा मंजूरीकामी सादर करणेत येत आहे. प्राप्त निविदा व दराबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ.नं.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कंत्राटदाराचे नाव	निविदा दर
१.	प्रभाग क्र १२ मधील खाटीक अपार्टमेंट जवळील गटर करणे.	९,९५,६१४/-	१) सुनिल तारासिंग राठोड, रा.इस्लामपूर	१% जादा दराने
			२) सिध्दार्थ जयवंतराव पाटील रा.कापूसखेड	२% जादा दराने
			३) इंद्रनिल नारायणसिंग राजपुत रा.इस्लामपूर	अंदाजपत्रकीय दराने
अभिप्राय :– विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे निविदांमध्ये इंद्रनिल नारायणसिंग राजपुत रा.इस्लामपूर यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा सर्वात कमी दराची असल्याने ती मंजूर करणेस हरकत नाही.				

वरीलप्रमाणे कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०३ निविदांपैकी इंद्रनिल नारायणसिंग राजपुत रा.इस्लामपूर यांची सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस शिफारस आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५८९ **दिनांक -** १४/०६/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि. २७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी राहुल सर्जेराव मर्ढेकर प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद सदरकामी सन २०२३-२४ करिता वैशिष्टयापूर्ण योजनेअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, कार्यालय, सांगली यांचेकडील आदेश क्र.नवि/कार्या-२/कावि-१०/एसआर-३८/२०२४ दि.२८/०२/ २०२४ अन्वये प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. उपरोक्त प्रशासकीय प्रस्तावाचे अवलोकन करुन वरील कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

वरीलप्रमाणे कामासाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०३ निविदांपैकी इंद्रनिल नारायणसिंग राजपुत रा.इस्लामपूर यांची सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची असलेने मंजूर करणेस शिफारस आहे. तसेच नामंजूर निविदा धारकांची बयाणा रक्कम संबंधितास परत करणेकामी या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर

विषय क्र.१६ - इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता करणेबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना-

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव -

इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता डांबरीकरण करणेबाबत तेथील नागरिकांची मागणी आहे. त्याठिकाणचा रस्ता हा अत्यंत खराब झालेला असून त्या रस्त्यालगत इस्लामपूर शहरातील नागरिकांसाठी मुख्य व्यापारी पेठ, हॉस्पीटल व रहदारीचा मेन रोड असलेने त्याठिकाणी वारंवार मोठी अवजड वाहने व शालेय विद्यार्थी, नागरिक ये-जा करीत असतात. तरी त्याठिकाणाचा आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक असून सदरचा रस्ता डांबरीकरण करणेकामी रक्कम रू.२१,६४,९०९/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता दि.१०/०६/२०२४ रोजी नगरपरिषद बांधकाम विभागाने प्रस्ताव सादर केला आहे.

प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक हा रस्ता पूर्णपणे खराब होवून रस्त्यामध्ये काही ठिकाणी खड्डे पडलेले आहेत व व्यापारी पेठ, एस.टी.स्टॅण्ड कडे जाणारा मेन रहदाहारीचा रस्ता असून त्याठिकाणी रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक वाटते. याकामी या कार्यालयाकडून अंदाजपत्रकीय रक्कम रु.२१,६४,९०९/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन घेवून त्यास मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून जा.क्र. ताशा.४/तां.मा/ इस्लामपूर न.प./३८६/२०२४ दि.२८/०२/२०२४ अन्वये तांत्रिक मंजूरी घेवून प्रशासकीय मंजूरीकरिता इकडील पत्र जा.क्र.इनपा/कार्या-१२/१२९८/२०२४ दि.०६/०३/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता व अतिरिक्त निधीची मागणी केली होती. तथापि, सदरचा प्रस्ताव मंजूर करणेत आला नाही व दरम्यानच्या मुदतीत लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झालेने सदर काम करता आलेले नाही. सदरचा रस्ता हा शहरातील प्रमुख रस्ता असून तो रस्ता प्राधान्याने डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तसेच आता लोकसभेची आचारसंहिता संपली असली तरी पावसाळा सुरु झालेने डांबरीकरणाचे काम करता येणारे नाही. त्यामुळे तातडीची गरज म्हणून सदर रस्त्यावरील खड्डे पाऊस कमी होताच वार्षिक ठेकेदाराकडून डांबराने भरुन घेवून सदर रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे असा कार्यालयीन प्रस्ताव आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५२० **दिनांक** २४/०६/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४ दि.२७ डिसेंबर २०२१ अन्वये व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ३१६ (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वरील अहवालाचे अवलोकन करुन इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता डांबरीकरण करणेबाबत तेथील नागरिकांची मागणी आहे. पावसाळयामध्ये पावसाचे पाणी रस्त्यावरती साचून राहिलेने तेथील रस्ता अत्यंत खराब झाला आहे. त्यामुळे आझाद चौक ते संभाजी चौक रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

प्रभाग क्र.१२ मधील आझाद चौक ते संभाजी चौक हा रस्ता पूर्णपणे खराब होवून रस्त्यामध्ये काही ठिकाणी खड्डे पडलेले आहेत व व्यापारी पेठ, एस.टी.स्टॅण्ड कडे जाणारा मेन रहदाहारीचा रस्ता असून त्याठिकाणी रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक वाटते. याकामी या कार्यालयाकडून अंदाजपत्रकीय रक्कम रु.२१,६४,९०९/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन घेवून त्यास मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सांगली यांचेकडून जा.क्र. ताशा.४/तां.मा/ इस्लामपूर न.प./३८६/२०२४ दि.२८/०२/२०२४ अन्वये तांत्रिक मंजूरी घेवून प्रशासकीय मंजूरीकरिता इकडील पत्र जा.क्र.इनपा/कार्या-१२/१२९८/२०२४ दि.०६/०३/२०२४ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता व अतिरिक्त निधीची मागणी केली होती. तथापि, सदरचा प्रस्ताव मंजूर करणेत आला नाही व दरम्यानच्या मुदतीत लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झालेने सदर काम करता आलेले नाही. सदरचा रस्ता हा शहरातील प्रमुख रस्ता असून तो रस्ता प्राधान्याने डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तसेच आता लोकसभेची आचारसंहिता संपली असली तरी पावसाळा सुरु झालेने डांबरीकरणाचे काम करता येणारे नाही. त्यामुळे तातडीची गरज म्हणून सदर रस्त्यावरील खड्डे पाऊस कमी होताच वार्षिक ठेकेदाराकडून डांबराने भरुन घेवून सदर रस्त्याची दुरुस्ती करणेत यावी. तसेच सदर रस्त्याचे काम सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान(जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करणेकरिता मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्राधान्याने प्रस्ताव पाठविणेत यावा. सदर काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान(जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करावयाचे असलेने त्याकरिता योजनेच्या निकषांनुसार शासन नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.नगरो-२०१५/प्र.क्र.२३२/नवि-३३ दि.१६/०५/२०१६ नुसार सुधारणात्मक कार्यक्रम राबविण्याची कार्यवाही इस्लामपूर नगरपरिषदेमार्फत सुरु असून त्यानुसार पुरक कार्यक्रम राबविण्यास व त्याकरिता आवश्यक तो करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडील सदरकामी प्रशासकीय मंजूरी मिळालेनंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करणेस व त्याकरिता येणा-या सर्व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देणेत येत आहे.

(राहुल मर्डेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय १७ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कचरा संकलन, साफसफाई, वाहतूक व प्रक्रिया, औषध फवारणी, धूर फवारणी याकामीच्या सन २०२४-२०२५ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेणे, स्वच्छ सर्वेक्षण अभियानाअंतर्गत प्रोत्साहनपर अनुदान व १५ वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातून तसेच नगरपरिषद फंडातून खर्चास प्रशासकीय मान्यता घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – १) महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम 1965
२) नगरपरिषद /नगरपंचायती यांच्यासाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी, 2019

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषद ही ब वर्ग नगरपरिषद असून शहराचे क्षेत्रफळ 40.42 चौ.मी. आहे. सन 2011 चे जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या 67771 होती व सन 2024 सालची लोकसंख्या अंदाजे 90000 च्या पुढे आहे. शहरामध्ये दर्जेदार शैक्षणिक, उच्च शिक्षण व वैद्यकिय सेवा उपलब्ध असून तालुक्याचे मुख्य ठिकाण असून शहरात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, न्यायालय इत्यादी महत्वाची कार्यालये आहेत. ग्रामीण भागातून शहरात होणारे नागरीकांचे स्थलांतर पाहता शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढला असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याची निर्मिती होत आहे. त्यामुळे शहरातील नागरीकांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत 100% कचरा संकलन करणे व विलगीकरण करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कचऱ्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

02. शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणे तसेच सार्वजनिक रस्ते, जागा आणि मलप्रणालय साफ करणे आणि खाजगी मालमत्ता नसलेल्या व सार्वजनिक उपभोगासाठी खुल्या असलेल्या सर्व जागा साफ करणे - मग अशा मोकळ्या जागा नगरपालिकेकडे निहित असोत किंवा नसोत - आणि अपायकारक झाडे-झुडपे काढून टाकणे आणि सर्व सार्वजनिक उपद्रव नाहीसे करणे हे केंद्र शासनाच्या घनकचरा हाताळणी नियम 2016 मधील तरतुदी व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, 1965 च्या कलम 49 (2) अन्वये नगरपरिषदांचे कर्तव्य आहे.

03. दिवसेंदिवस शहराची लोकसंख्या वाढत आहे; परंतु त्याप्रमाणात सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढत नसल्याने दैनंदिन साफसफाईसाठी सफाई कर्मचारी कमी पडत आहेत. तसेच शहरातील नागरीकांना नियमीत सेवा पुरविणेसाठी नगरपरिषदेकडील सध्याची यंत्रणा व सफाई कर्मचारी अपुरे पडत आहे. अपूरी यंत्रणा व सफाई कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे स्वच्छ भारत अभियानात चांगली कामगिरी करण्यात इस्लामपुर नगरपरिषदेस अडचण येत आहे.

04. नगरपरिषद /नगरपंचायती यांच्यासाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी, 2019 मधील कलम 6.19 मधील तरतुदीनुसार दैनंदिन स्वच्छतेच्या कामासाठी व घनकचरा व्यवस्थापन कार्यासाठी नागरी स्थानिक संस्था त्यांचे स्वतःचे /बाह्यस्रोतीत /करार तत्वावरील सफाई कर्मचाऱ्यांचा व वाहनांचा उपयोग करतील, जेणेकरून नागरी संस्था आपले विभाग स्वच्छ व नीटनेटके ठेवू शकतील असे नमूद आहे. नगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने उक्त तरतूद विचारात घेवून शहरातील 100% कचरा संकलन करणे व विलगीकरण करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक

Scanned with OKEN Scanner

शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कचऱ्याचे व्यवस्थापन करणे ही कामे बाह्यस्त्रोतीत /करार तत्वावरील आरोग्य कर्मचाऱ्यांचा व वाहनांचा उपयोग करून पार पाडणे आवश्यक आहे.

05. शहरातील दैनंदिन कचरा संकलन करणे व विलगीकरण करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची साफसफाई करणेच्या कामासाठी तत्कालीन मुख्याधिकारी यांनी रू.3.72 कोटी (मनुष्यबळ संख्या 129) एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करून त्यास महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक मान्यता व मा.जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर व रितसर निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर कंत्राटदार व्ही.डी.के. फॅसिलीटीस सर्व्हिसेस प्रा.लि. यांची नियुक्ती केली होती व दि.30/06/2023 रोजी कार्यादेश दिले होते. सदर सफाई कर्मचाऱ्यांची 129 ही संख्या अत्यंत कमी असल्याने स्वच्छता विषयक दैनंदिन कामे करण्यास अडचणी येत आहेत व शहरातील नागरीकांच्या तक्रारी देखील मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. तरी देखील उपलब्ध सफाई कर्मचारी विचारात घेवून आरोग्य विभागाकडून स्वच्छता विषयक दैनंदिन कामे पार पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे.

06. कंत्राटदार व्ही.डी.के. फॅसिलीटीस सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्या कामाच्या प्रशासकीय मान्यतेची मुदत दि.31/05/2024 रोजी संपत असून व प्रत्यक्ष कामाची मुदत दि.30/06/2024 रोजी संपणार आहे. सध्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची आचारसंहिता सुरू असून सदर आचारसंहितेची मुदत दि.06/06/2024 रोजी संपणार आहे. संबंधीत कंत्राटदार यांच्या कामाची मुदत दि.30/06/2024 रोजी संपुष्टात आल्यानंतर शहरातील दैनंदिन कचरा संकलन करणे व विलगीकरण करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची साफसफाई करणे ही कामे ठप्प होण्याची व नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सन 2024-25 मध्ये सदर काम निरंतर सुरू राहण्याच्या दृष्टीने नव्याने अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणांकडून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता आरोग्य विभाग पुढीलप्रमाणे मनुष्यबळ प्रस्तावित करीत आहे.

It.No.	Item Description	For year 2023-24	For the year 2024-25
		No Of labourer per day	No of labourer per day
1	Collection of Waste within Municipal Council Limits on daily basis (Including Holidays also) as directed by Islampur Municipal Council (Mazdoor Heavy)	32	38
2	Transportation of Waste (Dry, Wet, Hazardous, Plastic etc.) collected within Municipal Limits to waste Processing Plant on daily basis (Including Holidays also) as directed by Islampur Municipal Council	7 vheicals on rent + tractor for transportation	8 vheicals on rent + tractor for transportation
3	Processing of Dry, Wet, hazardous, Plastic Waste on daily basis (Including Holidays also) as directed by Islampur Municipal Council (Mazdoor Heavy)	16	18
4	Sweeping of Public Roads, Streets within Municipal Council Limits on daily and	30	35

Scanned with OKEN Scanner

It.No.	Item Description	For year 2023-24	For the year 2024-25
		No Of labourer per day	No of labourer per day
	weekly basis (Including Holidays also) as directed by Islampur Municipal Council (Mazdoor Heavy)		
5	Cleaning of shallow surface drain / gutters within Islampur Municipal Council Limits (Mazdoor Heavy)	35	60
6	Providing Spraying operation within Municipal Council Limits with the help of Handy Spraying Machine for safety from mosquitoes as directed by Islampur Municipal Council (Mazdoor Heavy)	6	6
7	Providing manpower for daily operation of Cleaning Gents and Ladies Toilet / Urinals on daily basis (Including Holidays also) as directed by Islampur Municipal Council (Mazdoor Light)	6	6
8	Providing vehicles for daily cleaning of Public Toilets and public Urinals twice in day and spraying of insecticides, and disinfectants on the side, open drains and water bodies, waterlogged areas also fogging in Urun-Islampur municipal area including Holidays and as directed by the municipal council	3	2
9	Providing Manpower for Supervision and Monitoring all Municipal Solid Waste Management System on daily basis (Including Holidays also) as directed by Islampur Municipal Council (Site Supervisor/ heavy labour)	1	5
	total	**129**	**168**

07. सन 2024-25 मध्ये सदर काम निरंतर सुरू राहण्याच्या दृष्टीने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करताना मागील वर्षाच्या कामाच्या रक्कमेमध्ये जास्त वाढ न करता सूमारे 40 सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब व नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता उपरोक्त परिच्छेद क्र.06 मध्ये नमुद करणेत आलेल्या प्रस्तावास अंदाजे रू.4.38 कोटी इतका खर्च येत असून त्यामधून एकूण 168 सफाई कर्मचारी दैनंदिन कामासाठी उपलब्ध होणार आहेत.

08. नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सन 2024-25 च्या शहरातील दैनंदिन कचरा संकलन करणे व विलगीकरण करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची साफसफाई करणे या कामाचा खर्च हा स्वच्छ महाराष्ट्र अभियान बक्षीस अनुदान /१५ वित्त आयोग बंधनकारक अनुदान यामधून करणे अनुज्ञेय आहे व स्वच्छ महाराष्ट्र अभियान बक्षीस अनुदान रक्कम शिल्लक देखील आहे. त्यामुळे शिल्लक राहिलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान बक्षीस अनुदान रक्कमेतून सदर कामाचा खर्च करणे प्रस्तावित करणेत येत आहे.

Scanned with OKEN Scanner

09. कंत्राटदार व्ही.डी.के. फॅसिलीटीस सर्व्हिसेस प्रा.लि. यांच्या कामाची मुदत दि.30/06/2024 रोजी संपणार असून दि.01/07/2024 नंतर सदर कामचा खर्च नगरपरिषद फंडातून करावा लागणार आहे. सध्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची आचारसंहिता सुरू असून सदर आचारसंहितेची मुदत दि.06/06/2024 रोजी संपणार आहे. त्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा प्रक्रिया राबविणे इत्यादी कामास विलंब लागणार आहे. त्यामुळे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची आचारसंहिता संपण्याची वाट न पाहता सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकामी सादर करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५९७ **दिनांक :** १४/०६/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दिनांक 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषदेच्या खालील कामास व त्याकामी येणा-या खर्च रक्कम रू.४.३८ कोटीस आर्थिक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. सदरकामी तांत्रिक मान्यता, तदनंतर अभियान संचालक, मुंबई यांचेकडून प्रशासकीय मान्यता घेऊन रितसर ई-निविदा प्रक्रिया राबविणेसही मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	अर्थसंकल्पातील लेखाशीर्ष
१	इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जावून घंटागाडीद्वारे ओला, सुका व घातक कचरा वेगवेगळा संकलन करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची दैनंदिन साफसफाई करणे व कचऱ्याचे घनकचरा व्यवस्थापन भूमीपर्यंत वाहतूक करणे तसेच घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचऱ्यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, घनकचऱ्यापासून कंपोस्ट तयार करणे, घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे यासाठी मनुष्यबळ पुरवठा करून शहर स्वच्छतेचे काम करणे	४.३८ कोटी	१) सन 2024-25 च्या शहरातील दैनंदिन कचरा संकलन करणे व विलगीकरण करणे, रस्ते, सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुताऱ्या तसेच गटर यांची साफसफाई करणे या कामाचा खर्च हा स्वच्छ महाराष्ट्र अभियान बक्षीस अनुदानातून रक्कम रू.४.१० कोटी व २) नगरपरिषद निधीमधील (५) कामाचे आणि व्यवहाराचे कंत्राट त्यातील अनुक्रमांक ३ घनकचरा व्यवस्थापन कंत्राट (सफाई व इतर) यामधील रक्कम रू.८०.०० लक्ष

सदरकामीचा खर्च (५) कामाचे आणि व्यवहाराचे कंत्राट उपलेखाशीर्ष- अ.क्र.(३) घनकचरा व्यवस्थापन कंत्राट (सफाई व इतर) यामधील रक्कम रू.८०.०० लक्ष आणि स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांचेकडील बक्षीस रक्कमेच्या प्राप्त अनुदानातून प्रशासकीय मान्यता घेऊन खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय १८ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या भांडार विभागाकडील आवश्यकतेप्रमाणे करावयाच्या कामांच्या वार्षिक निविदांना मुदतवाढ देणे व नवीन निविदा प्रक्रिया राबविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – १) महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता २०११
२) स्थायी निदेश
३) भांडार विभागांकडील कार्यालयीन मंजूर टिपण्या

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषदेच्या भांडार विभागामार्फत खालील कामांच्या निविदा प्रक्रिया राबविताना प्रशासकीय ठराव क्रमांक १४१, दिनांक २२/०७/२०२२ अन्वये सन २०२२-२०२३ ते २०२४-२०२५ अखेर प्रशासकीय कालावधीमध्ये कामांचे स्वरूप पाहता तीन वर्षांकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९३ (१) (अ) नुसार दरवर्षी प्रशासकीय मंजूरी घेणेत आलेली आहे. त्यानुसार तीन वर्षांचा कालावधी सन २०२४-२०२५ मध्ये समाप्त होत असून या आर्थिक वर्षाकरिता उक्त नियमाअंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तदअनुषंगाने प्रथम मुदतवाढ प्रशासकीय ठराव क्रमांक अनुक्रमे १९० व १९२ दिनांक १५/०९/२०२२ अन्वये व दुसरी मुदतवाढ प्रशासकीय ठराव क्रमांक ५७४, दिनांक १३/०३/२०२४ अन्वये दिनांक ३० जून २०२४ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

अ.क्र.	विभागाचे नांव	कामाचे नांव	ठेकेदाराचे नांव	कामाची मुदत संपलेचा कालावधी	मुदतवाढ देण्याचा कालावधी
१	२	३	४	५	६
०१	भांडार	इस्लामपूर नगरपरिषदेमध्ये वेळोवेळी आवश्यकते प्रमाणे लागणारे कार्यालयीन साहित्य छपाई करून घेणे	मे.केदार ऑफसेट, इस्लामपूर	३१ मार्च २०२४	३० जून २०२४ अखेर
०२	भांडार	नगरपरिषदेच्या वेळोवेळी आयोजित कार्यक्रमांना लागणारे फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग कामे करणे	पाटील फोटो स्टुडिओ, इस्लामपूर	३१ मार्च २०२४	३० जून २०२४ अखेर

वरील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे भांडार विभाग प्रमुख यांनी लोकसभा निवडणूक आचारसंहिता असल्यामुळे दिनांक ३१ मार्च २०२४ अखेर मुदत संपणा-या कामांस (निविदेस) दिनांक ३० जून २०२४ रोजीअखेर प्रशासकीय ठरावान्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे.

मे.केदार ऑफसेट, इस्लामपूर व मे.पाटील फोटो स्टुडिओ, इस्लामपूर यांनी दिनांक २७/०५/२०२४ रोजीच्या विनंती पत्रान्वये सन २०२२-२०२३ च्या मंजूर दराप्रमाणे सन २०२४-२०२५ सालासाठी काम करण्यास तयार असून त्याप्रमाणे मुदतवाढ देणेबाबत कळविलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

तथापि, प्रशासनाने अर्जदार यांच्या विनंतीपत्राच्या अनुषंगाने, गतवर्षी झालेल्या कामाचे स्वरूप व त्यावरील खर्चाचा विचार करता याकामीचा वार्षिक आर्थिक खर्च कमी होत असल्याने आणि निविदा प्रक्रियेकामी येणा-या खर्चाचा विचार करता मुदतवाढ देणे योग्य असल्याचा प्रस्ताव आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५९२ **दिनांक : १४/०६/२०२४**

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये तांत्रिक अडचण विचारात घेता नगरपरिषदेच्या आर्थिक हितास्तव पुढील निविदा प्रक्रिया मंजूर होईपर्यंत अथवा सन २०२४-२०२५ च्या आर्थिक वर्षाकरिता भांडार विभागाकडील कामांना प्रशासकीय ठराव क्र.१४१, दिनांक २२/०७/२०२२ अन्वये मंजूरी देण्यात आलेल्या दरानुसार काम करण्यास तयार असल्याने सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये (दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर) त्याच दराने मुदतवाढ देणे व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

सदर कामीचा खर्च अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे,

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

२६८

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय १९ : इस्लामपूर नगरपरिषदेच्या भांडार विभागामार्फत नगरपरिषदेच्या विविध विभागांना आवश्यक त्या मागणीनुसार लाकडी कपाटे, लोखंडी कपाटे, टेबले, खुर्च्या इत्यादी साहित्य खरेदी करणेसाठी दरपत्रक मागणीबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – भांडार विभागाकडील मागणीनुसार करण्यात आलेली कार्यालयीन टिपणी

प्रस्तावः- इस्लामपूर नगरपरिषदेकडील कार्यरत असणा-या नगररचना विभागाकडून ०२ नग लाकडी खुर्च्या, ०३ नग लोखंडी कपाटे आवश्यक असल्याबाबत मागणी अर्ज दाखल केलेला आहे. ०१ खुर्चीची किंमत रू.४५००/- व ०१ लोखंडी कपाटाची किंमत रू.१२०००/- इतकी बाजारभावाचा विचार करता दिसून येत आहे. नगरपरिषदेच्या सर्व विभागाकरिता अभिलेख जतन करणेच्या हेतूने आवश्यक असणारी त्यांचे मागणीनुसार लोखंडी कपाटे व खुर्च्या यांची खरेदी करणे आवश्यक आहे.

याकामी निविदा पत्रक मागवून स्थानिक व्यावसायिकाकडून सदरची खरेदी करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ५९३ **दिनांक : १४/०६/२०२४**

वरीलप्रमाणे करावयाच्या सर्व प्रशासकीय व आर्थिक कार्यवाहीस नगरपरिषदेची मुदत दिनांक ०३/०१/२०२२ रोजी संपुष्टात आलेली असलेने महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९९५ मधील कलम ३१६ (ब) व ३१७ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.एमसीआ-२०२०/प्र.क्र/७१, दिनांक २७/१२/२०२१ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार मी,श्री.राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय इस्लामपूर नगरपरिषदेच्या भांडार विभागामार्फत नगरपरिषदेच्या विविध विभागांना आवश्यक त्या मागणीनुसार लाकडी कपाटे, लोखंडी कपाटे, टेबले, खुर्च्या इत्यादी साहित्य खरेदी करणेसाठी दरपत्रक मागणी करणेच्या कामास व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे.

त्याकामी नगरपरिषद अर्थसंकल्पातील निधीमधून खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली

प्रशासकीय ठराव

विषय ०१ :- नगरपरिषद आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेत काम करणारे पाणी पुरवठा, आरोग्य, अग्निशमन, विद्युत, कर व पाणी पुरवठा वसुली विभागाकडील नगरपरिषद कर्मचा-यांना रेनकोट व गमबुट पुरविणेकामी निर्णय घेणे.

संदर्भः- भांडार विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव - इस्लामपूर नगरपरिषदेमध्ये क्षेत्रिय स्तरावर काम करणारी कर्मचा-यांची संख्या ८४ इतकी असून त्यामध्ये अत्यावश्यक सेवेतील आरोग्य, पाणी पुरवठा, अग्निशमन, उद्यान, विद्युत व बांधकाम विभागांचा समावेश आहे. आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत येणा-या तक्रारींच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर तात्काळ जाऊन त्या तक्रारीचे निराकरण करणे आवश्यक असते. पावसाळ्यामध्ये पावसाचे प्रमाण जास्त असल्याने रात्री अपरात्री काम करणेकामी कर्मचा-यास पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रेनकोट व गमबूट दोन वर्षातून एकदा खरेदी करणेत येतात. गेल्या वेळेस सन २०२१-२०२२ मध्ये रेनकोट व गमबूट कर्मचा-यांना पुरविण्यात आलेले आहेत.

इस्लामपूर नगरपरिषदेमधील खालील विभागांनी त्यांच्या विभागातील कार्यरत कर्मचा-यांकरिता क्षेत्रिय स्तरावर काम करणा-या कर्मचा-यांची संख्या व आवश्यक असणा-या रेनकोट व गमबूटांची संख्या खालीलप्रमाणे विशद केलेली आहे.

अ.क्र.	विभागाचे नांव	क्षेत्रिय स्तरावर काम करणा-या कर्मचा-यांची संख्या	आवश्यक साहित्य	
			रेनकोट	गमबूट
१	पाणी पुरवठा	३७	३७	२६
२	कर वसूली	२४	२४	०
३	आरोग्य विभाग	१७	१७	१७
४	विद्युत	३	३	०
५	बाजार भाडे	३	३	०
६	उद्यान	१४	१४	१५
७	सामान्य प्रशासन, वॉचमन	९	९	०
	एकूण	१०७	१०७	५८

वरील कर्मचा-यांना १०७ रेनकोट व ५८ गमबूट खरेदी करणेकामी बाजारभावातील दराची तुलना केली असता अंदाजित रू.२.०० लक्ष इतका खर्च येणे अपेक्षित आहे. पावसाळा सुरू झाल्याने कर्मचा-यांना तातडीने रेनकोट व गमबूट खरेदी करणेची कार्यवाही कार्योत्तर मंजूरीच्या अधिन राहून प्रस्तावित करणेत आलेली असता दिनांक १२/०६/२०२४ रोजीच्या जाहीर प्रकटनाद्वारे उक्तकामीचे दर मागविले असता विहित मुदतीत पुढीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

अ.क्र.	कामाचे नांव	निविदाकाराचे नांव	निविदाकाराने भरलेले प्रती नगाचे दर	
			रेनकोट	गमबूट
०१	नगरपरिषद कर्मचा-यांना रेनकोट व गमबुट पुरविणे	मे.केदारनाथ एजन्सीज, इस्लामपूर	१५७५/-	६९०/-
०२		मे.आदित्य ऑफसेट, इस्लामपूर	१६४९/-	७३०/-
०३		मे.महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर	१३५०/-	६५०/-

वरीलप्रमाणे दराची तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर यांचे दरा सर्वात कमीचे दर असल्याने त्यांची निविदा मंजूर करणे व पुढील कार्यवाही प्रस्तावित करणेस त्याकामी येणा-या खर्चास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - Yes **दिनांक ०१/०७/२०२४**

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये नगरपरिषद आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेत काम करणारे पाणी पुरवठा, आरोग्य, अग्निशमन, विद्युत, कर व पाणी पुरवठा वसुली विभागाकडील नगरपरिषद कर्मचा-यांना रेनकोट व गमबुट पुरविणेस व त्याकामी येणा-या खर्च रक्कम रू.२.०० लक्षला आर्थिक व प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच निविदेत नमूद केलेले उक्तकामीचे दर मे.महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर यांचे रेनकोटकरिता प्रती नग रू.१३५०/- आणि गमबूटाकरिता रू.६५०/- ला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे आहे.

विभागाने या दराने मे.महालक्ष्मी सेल्स, इस्लामपूर यांना कार्यादेश देणेस त्यांच्याबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अ.क.	कामाचे नांव	अर्थसंकल्पिय लेखाशीर्ष	अर्थसंकल्पिय तरतूद
०१	नगरपरिषद आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेत काम करणारे पाणी पुरवठा, आरोग्य, अग्निशमन, विद्युत, कर व पाणी पुरवठा वसुली विभागाकडील नगरपरिषद कर्मचा-यांना रेनकोट व गमबुट पुरविणे	कर्मचा-यांना गणवेश पुरविणे	५.०० लक्ष

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०२ :- महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियम दिनांक १२ मार्च २०२१ मधील तरतूदीमधील कलम ४ (१) अन्वये मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ:- नगररचना विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव -- महाराष्ट्र शासन असाधारण दि.12 मार्च 2021 रोजीचे राजपत्र व शासन निर्णय आदेश क्र.गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवी/-30 दि.18/10/2021 अन्वये महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियमातील तरतूदीनुसार इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील अनधिकृतपणे पोटविभागणी करुन तयार केलेले भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेबाबत मार्गदर्शक सूचना पारित केलेल्या आहेत त्या अनुषंगीक (SOP) नगरपरिषदेने निश्चित केलेली आहे. तसेच कार्यालयीन टिपण्णी यांचे अवलोकन करणेत आले.

इस्लामपूर नगरपरिषद प्रशासकीय ठराव विषय क्रमांक 04, ठराव क्रमांक 501, दि. 11/12/2023 रोजीच्या प्रशासकीय ठरावान्वये दिनांक 31/12/2023 पर्यंत गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी या कार्यालयाकडे अर्ज सादर करणेस मुदतवाढ देणेत आली होती. तसेच प्रशासकीय ठराव विषय क्रमांक 06 अन्वये ठराव क्रमांक 501 या ठरावास ठराव क्रमांक 565, दि. 13/03/2024 रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये अट क्रमांक 08 मध्ये दुरुस्ती करणेत आली आहे. तथापि, पुढील दिनांक ३१ डिसेंबर २०२४ अखेर गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी या कार्यालयाकडे अर्ज सादर करणेस मुदतवाढ मिळणेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५९५ **दिनांक ०१/०७/२०२४**

सहाय्यक नगर रचनाकार, नगररचना विभागाकडील उक्त कामीच्या प्रस्तावाचे अवलोकन करता, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 व त्यात सुधारणा करणेसाठी अधिनियम दिनांक 12 मार्च 2021 मधील तरतूदीमधील कलम 4 (1) नुसार मुदतवाढ देणे योग्य राहिल.

वरीलप्रमाणे नमूद प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे सर्व कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.एमसीएओ-2020/प्र.क्र. 71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये श्री. राहुल सर्जेराव मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये दि.31/12/2023 ते दि.31/12/2024 अखेर खालील अटी व शर्तीस अधिन राहून गुंठेवारी विकास नियमितीकरणासाठी या कार्यालयाकडे अर्ज सादर करणेस मुदतवाढ देणेत येत आहे.

1) महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (श्रेणीवाढ व नियंत्रण ,नियमाधीन करणे) 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 27 मधील कलम 8 (1) अन्वये कुठल्याही मिळकतीत किंवा इमारतीत प्रवेश करण्याचे अधिकार नियोजन प्राधिकरणाला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला

Scanned with OKEN Scanner

असलेने याव्दारे कुठल्याही मिळकतीत किंवा इमारतीत प्रवेश करण्याचे अधिकार किंवा त्यासाठी प्राधिकृत करण्याचे अधिकार मा.मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना राहतील.

2) महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (श्रेणीवाढ व नियंत्रण ,नियमाधीन करणे) 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 27 मधील कलम 20 अन्वये या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नियोजन प्राधिकरणाचे मुख्य अधिकारी कलम 20 (ब) अन्वये नियोजन प्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करतील आणि त्यांचे कर्तव्ये पार पाडतील.

3) अनधिकृतपणे पोटविभागणी करुन तयार केलेले भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेबाबत मुळ चटई निर्देशांक हा 0.75 ग्राहय धरणेत यावा.

4) शासन निर्णय आदेश क्र.गुंठेवा-1021/प्र.क्र.48/2021/नवी/30, दि.18/10/2021 अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार गुंठेवारी विकास नियमित करताना प्रशमन शुल्क व विकास शुल्क आकारणी करणेस या ठरावाव्दारे मान्यता देणेत येत आहे.

5) दिनांक 31/12/2023 ते दिनांक 31/12/2024 पर्यंत प्राप्त प्रस्तावामध्ये प्रशमन शुल्कामध्ये 5% दंडाची रक्कम भरणा करुन घेऊन कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

6) यापूर्वी मंजूर महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) कार्यप्रणाली (SOP) चा अव्रलंब करुन प्रस्तावांवर नियमानुसार उचित कार्यवाही करणेस याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमातील (श्रेणीवाढ व नियंत्रण नियमाधीन करणे) (1) 4 तरतूदीमधील कलम अन्वये इस्लामपूर नगरपरिषद हद्दीतील गुंठेवारी भागातील अनधिकृतपणे पोटविभागणी करुन तयार केलेले भूखंड व त्यावरील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करणेबाबतच्या एकूण कार्यवाहीस याव्दारे मंजूरी देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०३ :- इस्लामपूर नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे नवीन अत्याधुनिक मशिन तसेच प्रोसेसिंग प्लांटसाठी योग्य क्षमतेची विद्युत व्यवस्था (पॅनल, एमसीबी, वायरींग, आर्थिंग इत्यादी) करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भः- विद्युत विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव -- इस्लामपूर नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे नवीन आत्याधुनिक मशिन कार्यान्वीत करणे बाबत नविन लाईट फिटींग करून विद्युत व्यवस्था करणे आवश्यक आहे तसेच प्रोसेसिंग प्लंटसाठी योग्य क्षमतेची विद्युत व्यवस्था करणेसाठी पॅनल बसविणे, वायरिंग करणे, एमसीबी व आर्थींग करणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. तरी सदर काम करणेसाठी अंदाजे रक्कम रू ३००००००/- एवढी अपेक्षित असून खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५९६ **दिनांक ०१/०७/२०२४**

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे नवीन अत्याधुनिक मशिन तसेच प्रोसेसिंग प्लांटसाठी योग्य क्षमतेची विद्युत व्यवस्था (पॅनल, एमसीबी, वायरींग, आर्थिंग इत्यादी) करणेस व त्याकामी येणा-या अंदाजित रक्कम रू.३.०० लक्षला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच याकामी सक्षम प्राधिकरणाकडील तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

सदरकामीचा खर्च अर्थसंकल्पिय तरतूदीस अधिन राहून करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०४ :- इस्लामपूर नगरपरिषदेस आवश्यक वृक्ष खरेदी करणेसाठी दरपत्रके मागविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भः- १) विद्युत विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव – इस्लामपूर नगरपरिषद कार्यालयाकडील उद्यान विभागासाठी माझी वसुंधरा अभियान, स्वच्छ सर्वेक्षण अभियान या अतंर्गत आवश्यक रोपे खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच घनकचरा डेपो येथे देखील झाडे लावणे आवश्यक आहे. नगरपरिषदेस रोपांची कमतरता भासू नये म्हणून नवीन रोपाची खरेदी करणेसाठी दरपत्रक मागवून वार्षिक निविदा प्रकिया करणे आवश्यक आहे.

सदरच्या रोपे खरेदीकामी खर्च सन २०२४-२०२५ या वर्षात र रू ५००००००/-इतका अपेक्षित आहे. इस्लामपूर नगरपरिषदेस आवश्यक वृक्ष खरेदी करणेसाठी दरपत्रके मागविणे आवश्यक असल्याने याकामी प्रशासकीय ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५९५ **दिनांक** ०१/०७/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेस आवश्यक वृक्ष खरेदी करणेसाठी दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याकामी उद्यान विभागाने जागा निश्चित करून त्यास मान्यता घेण्यात यावी.

आरोग्य विभागाने सदरचे काम करताना झाडाची उंची ६ ते ८ फूट असल्याची खात्री करावी. तसेच सदरची रोपे लावताना ती भविष्यात एखाद्या संरचनेस बाधा करतील अशा प्रकारे लावण्यात येऊ नयेत. शासनाच्या धोरणानुसार सर्व झाडे भारतीय प्रजातीची निवड करणे बंधनकारक राहिल.

सदरकामीचा खर्च नगरपरिषद निधीमधून अंदाजित रक्कम रू.३.०० लक्षच्या मर्यादेत दरपत्रक स्थानिक प्रसिध्दी करणे, बाजारभावाचा विचार करून रितसर दरपत्रक मागवून खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०५ :- इस्लामपूर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये जंतुनाशक, किटकनाशक खरेदी करणे कामाच्या वार्षिक निविदा प्रसिध्दीबाबत निर्णय घेणे.

संदर्भः- १) आरोग्य विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव -- इस्लामपूर नगरपरिषद ही ब वर्ग नगरपरिषद असून शहराची लोकसंख्या सन २०११चे जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येवर आधारित २०२१ सालची लोकसंख्या अंदाजे ८०४७४ इतकी आहे. त्याचे क्षेत्र ४०.४२ चौ.मी. आहे. नगरपिरषद हद्दीतील गटरांची लांबी अंदाजित १५६ किलोमीटर (दुतर्फा) इतकी होत असून रस्त्याची लांबी अंदाजित १५० किलोमीटर इतकी होत आहे. नगरपरिषद हद्दीमध्ये दैनंदिन २८ मे.टन इतका कचरा संकलित होत आहे.

नगरपरिषद हद्दीमधील सर्व रस्त्याच्या कडेला साईडपट्टीवर मोठया प्रमाणात गाजर गवत उगवून आलेले आहे. त्यामुळे रस्ते स्वच्छ केले तरी सदर गाजर गवतामुळे सदरचे रस्ते अस्वच्छ दिसत आहेत. त्यामुळे सदरचे गाजर गवतावरती तृणनाशक मारणे आवश्यक आहे. त्यामुळे गाजर गवत व तृण उगविले जाणार याची दक्षता घेणे शक्य होणार आहे. गटारातील गाळ काढल्यानंतर व कचरा उचलल्यानंतर त्या ठिकाणी जंतुनाशक व दुर्गंधीनाशक पावडर टाकणे आणि त्यामध्ये प्रामुख्याने दुर्गंधीनाशक पावडर, तृणनाशके, मेलेथॉन जंतुनाशके खरेदी नगरपरिषदेमार्फत करणेकामीचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ५९८ **दिनांक** ०१/०७/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये तृणनाशक, दुर्गंधीनाशक पावडर खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजित खर्च रक्कम रू.३.०० लक्षला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याकामी विहीत पध्दतीचा अवलंब करून निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

सदरकामीचा खर्च अर्थसंकल्पिय तरतूदीस अधिन राहून करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०६ :- इस्लामपूर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये डास प्रतिबंधक औषध फवारणी व इतर कामांसाठी औषधे खरेदी करणे कामाच्या वार्षिक निविदा प्रसिध्दीबाबत निर्णय घेणे.

संदर्भः- १) मा.वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा ग्रामीण रूग्णालय, इस्लामपूर यांचे पत्र.
२) आरोग्य विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव -- इस्लामपूर नगरपरिषद ही ब वर्ग नगरपरिषद असून शहराची लोकसंख्या सन २०११चे जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येवर आधारित २०२१ सालची लोकसंख्या अंदाजे ८०४७४ इतकी आहे. त्याचे क्षेत्र ४०.४२ चौ.मी.आहे. इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये १५६ अंदाजित किलोमीटर लांबीचे (दुतर्फा) गटर असून रस्त्याची लांबी अंदाजित १५० किलोमीटर इतकी आहे.

तसेच इस्लामपूर नगरपरिषदेची मंजूर असणारी भुयारी गटर योजनेचे काम सध्या पूर्णत्वास आलेली नाही. त्यामुळे सध्याचे शहरातील अस्थित्वातील गटर हे बंदिस्त नाहीत. शहरामध्ये मिळकतींची संख्या वाढत आहे. त्यामुळे दैनंदिन संकलित होणा-या कच-याचे प्रमाणही वाढत आहे. तसेच सध्या पावसाळा सुरू असल्याने डेंग्यू, चिकुनगुणिया, हिवताप अशा साथरोगांचे व डासांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर असते. याबाबत मा.वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रूग्णालय, मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, व मा.जिल्हा हिवताप अधिकारी यांचेकडील सूचनांच्या अनुषंगाने योग्य त्या उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असते.

शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगल्या प्रकारे राखणे तसेच शहरामध्ये कोणत्याही प्रकारचे साथीचे रोग उदभवू नये व डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी जतुंनाशके खरेदी कामी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने डासांवरील लिक्वीड जंतुनाशके व धुरीकरणा संबंधीत औषधे आणि फवारणीकामी लागणा-या मशीन नग ०६ खरेदी करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ५९९ **दिनांक** ०१/०७/२०२४

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील इस्लामपूर नगरपरिषद हद्दीमध्ये डास प्रतिबंधक औषध फवारणी व इतर कामांसाठी औषधे खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजित खर्च रक्कम रू.१०.०० लक्षला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच आरोग्य विभागाने शासनाने निश्चित केलेल्या मानकानुसार मा.तालुका हिवताप अधिकारी, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर यांच्या मार्गदर्शनानुसार डास प्रतिबंधक उपाययोजना करणेकामी धूरीकरण व फवारणीकामीची MLO ऑईल आवश्यकतेनुसार अशी औषधे खरेदी करणेची कार्यवाही करावी. याकामी विहित पध्दतीचा अवलंब करून निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

सदरकामीचा खर्च अर्थसंकल्पिय तरतूदीस अधिन राहून करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner

इस्लामपूर नगरपरिषद, इस्लामपूर जि.सांगली
प्रशासकीय ठराव

विषय ०७ :- इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे ओल्या कच-यापासून खत निर्मितीकामी आवश्यक कंपोष्टींग कल्चर (लिक्वीड / पावडर) खरेदी करणे कामाच्या निविदा प्रसिध्दीबाबत निर्णय घेणे.

संदर्भः- आरोग्य विभागाकडील कार्यालयीन टिपणी

प्रस्ताव -- इस्लामपूर नगरपरिषद क्षेत्रात २०१५ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत शासनाने नेमुन दिलेले सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी नगरपरिषदेमार्फत केली जात आहे स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नगरपरिषदेच्या घनकचरा प्रक्रिया केंद्र येथील ओल्या कच-यापासून कंपोस्ट खत निर्मिती करणे शासनाने बंधनकारक केलेले आहे.

तदअनुषंगाने ओल्या कच-यावर प्रक्रिया करणेकामी तसेच कच-यापासून दुर्गंधी येऊ नये म्हणून कंपोस्टिंग कल्चर (लिक्विड/पावडर) फवारणी केल्यास खत निर्मितीची प्रक्रिया लवकर होणेस व आजूबाजूच्या वस्तीस दुर्गंधीची समस्या उद्भवणार नाही.

याकामी नगरपरिषदेमार्फत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे ओल्या कच-यापासून खत निर्मिती करणेकामी लिक्वीड व पावडर स्वरूपात कंपोस्टींग कल्चर खरेदी करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - ६०० **दिनांक ०१/०७/२०२४**

उपरोक्त सविस्तर प्रस्तावाची नोंद घेवून कार्यवाहीस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 316 (ब) अन्वये व मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र./71/नवि-14, दि. 27/12/2021 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,श्री.राहुल मर्ढेकर, प्रशासक, इस्लामपूर या प्रशासकीय ठरावान्वये इस्लामपूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे ओल्या कच-यापासून खत निर्मितीकामी आवश्यक कंपोष्टींग कल्चर (लिक्वीड / पावडर) खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजित खर्च रक्कम रू.६.०० लक्षला आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

घनकचरा व्यवस्थापनाकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या जिल्हा दरसूची सन २०२३-२०२४ च्या मानकास अधिन राहून विहित पध्दतीने खरेदी करण्यात यावेत. याकामी सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरकामीचा खर्च अर्थसंकल्पिय तरतूदीस अधिन राहून करणेस मान्यता देणेत येत आहे.

(राहुल मर्ढेकर)
प्रशासक
इस्लामपूर नगरपरिषद

Scanned with OKEN Scanner